CMYK

सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
आसमंतसह

सोलापूर | रविवार, १८ ऑगस्ट २०२४ | युगाब्द ५१२५ | वर्ष ३९ वे अंक २८८ | पाने १२+८ | किंमत रु. ६/-
|RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
ही आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

!! जाहीर सूचना !!

सोलापूर तरुण भारत जाहिराती तसेच सर्व विभागांसाठी ऑनलाईन रिसीट ॲप वापरण्यास सुरुवात केली आहे. ग्राहकांनी याचा लाभ घ्यावा, कोणतेही पैसे जमा करताना ऑनलाईन रिसीटची मागणी करावी. ऑनलाईन रिसीट शेअर करण्याची देखील सोय केली आहे. आमच्या प्रतिनिधीकडून याची माहिती घ्यावी. ऑनलाईन रिसीटची मागणी हक्काने करावी.

सहकार्याबद्दल धन्यवाद.

## विनम्र अभिवादन



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पाचवे सरसंघचालक कुप्प सी. सुदर्शनजी यांचा आज तिथीप्रमाणे स्मृतिदिन

# ‘त्या’ बहिणींना तीन महिन्यांचे ४५०० रुपये देणार : फडणवीस

### लाडकी बहीण योजनेचा औपचारिक शुभारंभ

◆ **पुणे, १७ ऑगस्ट**

ही खटाखटसारखी नाही, फटाफट चालणारी योजना आहे. ज्या बहिणींचे अर्ज रखडले, त्यांना तीन महिन्यांचे ४५०० रुपये एकदम मिळणार आहे, अशी घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे केली.

पुण्यात मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचा राज्यस्तरीय शुभारंभ करण्यात आला. त्यावेळी ते बोलत होते. लाडकी बहीण योजनेचा औपचारिक शुभारंभ झाला. सुरुवात पुण्यापासून का, असे मला विचारण्यात आले. ज्यावेळी परकियांचे आक्रमण झाले, तेव्हा आई जिजाऊंनी स्वराज्याची संकल्पना शिवरायांना दिली. महिलांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेला, त्यावेळी महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी सांगितले की, महिलांना शिक्षणाचा अधिकार आहे. त्यांनी मुलींसाठी पहिली शाळा याच पुण्यात सुरू केली. त्यामुळे पुणे हे महत्त्वाचे शहर आहे, असे फडणवीस म्हणाले.

**देना बँक सरकार**

आमचे देना बँक सरकार आहे. याआधी राज्यात लेना बँक सरकार होते. मागच्या काळातील सरकार वसुली करणारे होते. आताचे सरकार बहिणींना देणारे आहे. योजनेची औपचारिक सुरुवात केली आहे. आतापर्यंत एक कोटी तीन लाख महिलांच्या खात्यात प्रत्येकी तीन हजार रुपये जमा झाले आहेत. आता काही मोजक्याच महिला बाकी आहेत. काळजी करू नका, प्रत्येकाच्या खात्यात पैसे जमा होतील, असे फडणवीस म्हणाले.

**सावत्र भावांच्या पोटात खूप दुखले**

आम्ही या योजनेची घोषणा केली, तेव्हा सावत्र भावांच्या पोटात खूप दुखले. योजना होऊ नये म्हणून ते न्यायालयात गेले. न्यायालयाने त्यांना फटकारल्यानंतर जाणीवपूर्वक अर्ज भरून घेत, त्यावर पुरुषांचे फोटो लावले; जेणेकरून महिलांना सांगता येईल की, तुमचे अर्ज आम्ही सरकारला दिले होते. काही ठिकाणी मोटरसायकलचे फोटो लावले. अशा प्रकारचे फोटो लावून अर्ज नाकारले जातील आणि महिलांना पैसे मिळू नये, असा प्रयत्न करण्यात आला. पोर्टल स्लो व्हावे, असा प्रयत्न करण्यात आला. पोर्टल बंद पडले, असा अपप्रचार केला, असे ते म्हणाले. ◂(तभा वृत्तसेवा)



मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्रिद्वय देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांच्या उपस्थितीत शनिवारी पुणे जिल्ह्यातील बालेवाडी येथे ‘लाडकी बहीण योजने’चा औपचारिक शुभारंभ करण्यात आला. यावेळी माता-भगिनी मोठ्या संख्येत उपस्थित होत्या

## लोकलेखा समितीच्या अध्यक्षपदी वेणुगोपाल

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

विविध संसदीय समित्यांचे आज गठन करण्यात आले असून, महत्त्वाच्या अशा लोकलेखा समितीचे अध्यक्षपद काँग्रेसचे के. सी. वेणुगोपाल यांच्याकडे सोपवण्यात आले आहे. प्राकलन समितीच्या अध्यक्षपदी भाजपाचे डॉ. संजय जायस्वाल यांची नियुक्ती करण्यात आली.

२२ सदस्यीय लोकलेखा समितीत लोकसभेच्या १५ तर राज्यसभेच्या ७ सदस्यांचा समावेश आहे. या समितीत टी. आर. बालू, निशिकांत दुबे, जगदंबिका पाल, जयप्रकाश, रविशंकर प्रसाद, सी. एम. रमेश, एम. श्रीनिवासुलू रेड्डी, प्रो. सौगत रॉय, अपराजिता सारंगी, डॉ. अमरसिंग, तेजस्वी सूर्या, अनुरागसिंह ठाकूर, बालाशोरी वल्लभनेनी, धर्मेंद्र यादव या लोकसभेच्या सदस्यांचा तसेच अशोक चव्हाण, शक्तिसिंह गोहिल, डॉ. के. लक्ष्मण, प्रफुल्ल पटेल आणि सुधांशू त्रिवेदी या राज्यसभा सदस्यांचा समावेश आहे.

**प्राकलन समिती**

प्राकलन समितीचे अध्यक्ष भाजपाचे डॉ. संजय जायस्वाल असून, या समितीत ब्रिजमोहन अग्रवाल, एम. मल्लेश बाबू, कल्याण बॅनर्जी, प्रदान बरुआ, चरणजितसिंग चन्नी, पी. पी. चौधरी, देवुसिंग चौहान, इकरा चौधरी, संगीताकुमारी सिंगदेव, सुधीर गुप्ता, दीपेंदरसिंग हुडा, मनीष जयस्वाल, नवीन जिंदल, जुगलकिशोर आदींचा समावेश आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

# सिद्धरामय्यांवर खटला चालणार

### भ्रष्टाचार प्रकरणी राज्यपालांची परवानगी

◆ **बंगळुरू, १७ ऑगस्ट**

म्हैसूर नगर विकास प्राधिकरणाशी संबंधित जमीन घोटाळाप्रकरणी कर्नाटकचे मुख्यमंत्री सिद्धरामय्या यांच्याविरोधात खटला चालविण्याची परवानगी राज्यपाल थावरचंद गहलोत यांनी शनिवारी दिली. यामुळे राजकीय वादळ उठले असून, काँग्रेस आणि भाजपात आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी सुरू झाल्या आहेत.



या घोटाळा प्रकरणी तीन याचिका दाखल करण्यात आल्या होत्या. त्यांची दखल घेत राज्यपालांनी मुख्यमंत्र्यांवर खटला चालविण्याची परवानगी दिली, अशी माहिती राजभवन सूत्रांनी वृत्तसंस्थेला फोनवरून दिली. सामाजिक कार्यकर्ते टी. जे. अब्राहम, प्रदीपकुमार आणि स्नेहमायी कृष्णा यांनी या याचिका दाखल केल्या होत्या.

भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्याच्या कलम १७ अंतर्गत हा खटला चालविला जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले. दरम्यान, सिद्धरामय्या कायदेशीर लढाई लढण्यास सज्ज असल्याचे काँग्रेसने म्हटले आहे. राज्यपालांनी आपला निर्णय आणि बजावलेली कारणे दाखवा नोटीस मागे घ्यावी, अन्यथा कायद्याच्या चौकटीसोबतच राजकीय लढा लढण्याचीही आमची तयारी आहे, असे काँग्रेसने जाहीर केले.

या भ्रष्टाचार प्रकरणी राज्यपालांनी २६ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांना नोटीस बजावून सात दिवसांत उत्तर मागितले होते. १ ऑगस्ट रोजी सरकारने राज्यपालांना नोटीस मागे घेण्याचा सल्ला दिला आणि त्यांच्यावर घटनात्मक अधिकारांचा गैरवापर केल्याचा आरोप केला. या प्रकरणी मुख्यमंत्री सिद्धरामय्या, पत्नी, मेहुणा आणि काही अधिकाऱ्यांविरोधात तक्रार दाखल करण्यात आली. यात असा आरोप करण्यात आला की, मुख्यमंत्र्यांनी म्हैसूर नगर विकास प्राधिकरण अधिकाऱ्यांच्या संगनमताने बनावट कागदपत्रे तयार करून महागड्या जमिनी बळकावल्या.

१९९२ मध्ये म्हैसूर नगर विकास प्राधिकरणाने शेतकऱ्यांकडून काही जमिनी निवासी क्षेत्रात विकसित करण्यासाठी घेतल्या. त्या बदल्यात जमीन मालकांना प्राधिकरणाच्या प्रोत्साहनात्मक ५०:५० योजनेंतर्गत लेआऊट विकसित करण्यासाठी ५० टक्के जमीन किंवा पर्यायी जागा देण्यात आली होती. ◂(वृत्तसंस्था)

## महत्त्वाचे

### आयएमएफसोबत सहकार्य वाढवण्याचे मार्ग शोधणार



**नवी दिल्ली** : आंतरराष्ट्रीय नाणेनिधी अर्थात् आयएमएफसोबत सहकार्य वाढवण्याचे मार्ग शोधण्यावर भर दिला जात आहे, असे केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन् यांनी शनिवारी आयएमएफच्या प्रथम उपव्यवस्थापकीय संचालक गीता गोपीनाथ यांच्याशी झालेल्या बैठकीत सांगितले. बैठकीत गोपीनाथ यांनी भारत सरकारच्या वित्तीय एकत्रीकरणाच्या मार्गात धोरणात्मक सातत्य राखल्याबद्दल अर्थमंत्र्यांचे अभिनंदन केले. सीतारामन् यांनी सांगितले की, भारत आयएमएफसोबत आपले संबंध आणि सातत्यपूर्ण प्रतिबद्धतेला खूप महत्त्व देतो आणि पुढे पाहता भारत सरकार आयएमएफसोबत भारताचे सहकार्य वाढवण्याचे आणखी मार्ग शोधण्यास तयार आहे, असे अर्थ मंत्रालयाने एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. ■

### भाजपाला १०५, उद्धव ठाकरेंना ३१ जागांचा अंदाज

**मुंबई** : निवडणूक आयोगाने हरयाणा आणि जम्मू-काश्मीरमध्ये विधानसभा निवडणुकांची घोषणा केली. महाराष्ट्रातील विधानसभा निवडणुकांची घोषणा झाली नसली, तरी टाईम्स-मॅट्रिझचा सर्व्हे समोर आला आहे. भाजपाला ९५ ते १०५ आणि उद्धव ठाकरेंना २६ ते ३१ जागा मिळू शकतात, असे या धाकधूक वाढवणाऱ्या सर्वेक्षणात म्हटले आहे. शिवसेनेच्या १९ ते २४ जागा येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादी काँग्रेसच्या ७ ते १२ जागा, तर लोकसभा निवडणुकीनंतर प्रचंड उत्साहात असलेल्या काँग्रेस पक्षाला ४२ ते ४७ जागा मिळू शकतील, असे या सर्वेक्षणात म्हटले आहे. याशिवाय, इतर पक्षांचा आणि अपक्षांचा ११ ते १६ जागा जागांवर विजय होईल, असा दावा ओपिनियन पोलमध्ये करण्यात आला. टाईम्स-मॅट्रिझच्या सर्व्हेनुसार भाजपाला २५.८ टक्के, शिवसेनेला १४.२ टक्के मते पडू शकतात. राकाँला ५.२ टक्के मते मिळणार असल्याचा अंदाज आहे. काँग्रेसला १८.६ टक्के, तर उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाला १७.६ टक्के मते मिळू शकतात. ■

### जशपूर जिल्ह्यात वीज कोसळून तीन महिला ठार

**जशपूर** : छत्तीसगढच्या जशपूर जिल्ह्यातील चंडामुडा येथे वीज कोसळून तीन महिलांचा मृत्यू झाला असून, सात जण जखमी झाले. मुख्यमंत्री विष्णू देव साय यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केले असून, जखमींना शक्य तितकी मदत करण्याचा निर्देश प्रशासनाला दिला आहे.

## राज्यात कायदा-सुव्यवस्था, सामाजिक सलोखा राखण्याचे मुख्यमंत्र्यांचे आवाहन

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ ऑगस्ट :**

राज्यात कायदा आणि सुव्यवस्थेची परिस्थिती अबाधित राखण्यासाठी सर्व नागरिकांनी दक्षता घेण्याचे आवाहन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले आहे. सर्व समाज घटकांना शांतता राखण्याचे आणि आगामी सण व उत्सव एकोप्याने साजरे करण्याचे आवाहन केले आहे.

नाशिक शहरातील काही भागांमध्ये काल निर्माण झालेल्या तणावपूर्ण परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्र्यांनी आवाहन केले आहे. स्थानिक प्रशासन आणि पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे परिस्थिती आटोक्यात आली असली तरी अशा घटना भविष्यात घडू नयेत यासाठी सर्वांनी जागरूक राहण्याची गरज आहे. महाराष्ट्र हे सामाजिक सलोख्याचे राज्य आहे. राज्याच्या या समृद्ध परंपरेला धक्का लावणारे कोणतेही कृत्य सहन केले जाणार नाही. कोणत्याही समाज घटकाने कायदा हातात घेऊ नये. काही समस्या असल्यास त्या संवादाच्या माध्यमातून सोडविण्यात याव्यात. येत्या काळात विविध सण येत असून या सर्व उत्सवांमध्ये सर्व समाजांनी सहभागी होऊन ते आनंदाने साजरे करावेत. सण हे आपल्या सांस्कृतिक वैविध्याचे प्रतीक आहेत. त्यामुळे प्रत्येक समुदायाने इतरांच्या भावना लक्षात घेऊन सण साजरे करावेत, राज्य सरकारने सर्व जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्त, अधीक्षकांना सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या.

# गंभीर आव्हानांचा सामना एकजुटीने करू

### पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आवाहन ● जागतिक दक्षिण परिषदेला केले संबोधित

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

जगात निर्माण झालेल्या अनिश्चिततेच्या परिणामांवर चिंता व्यक्त करताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी, खाद्य आणि ऊर्जा संकट तसेच दहशतवादाच्या आव्हानाचा एकजुटीने मुकाबला करू, असे आवाहन जागतिक दक्षिणेतील देशांना केले.



जागतिक दक्षिणेत डिजिटल सार्वजनिक पायाभूत सुविधा निर्माण करण्याच्या उद्देशाने स्थापन केलेल्या ‘सोशल इम्पॅक्ट’ निधीसाठी भारत सुरुवातीला अडीच कोटी डॉलर्सचे योगदान देईल, असे नरेंद्र मोदी यांनी भारताने आभासी स्वरूपात आयोजित जागतिक दक्षिण परिषदेच्या उद्घाटनावेळी सांगितले.

परस्पर व्यापार, सर्वसमावेशक विकास आणि शाश्वत विकास □उद्दिष्टे साध्य करण्यासाठी जागतिक दक्षिण किंवा विकसनशील देशांसोबत आपली क्षमता सामायिक करण्याच्या भारताच्या वचनबद्धतेचा नरेंद्र मोदी यांनी पुनरुच्चार केला.

जगात सध्या अनिश्चिततेचे वातावरण आहे आणि कोरोना महामारीच्या प्रभावातून आपण आतापर्यंत पूर्णतः बाहेर निघालो नाही. त्यात युद्धांमुळे आव्हान निर्माण झाले आहे. आपण अगोदरच वातावरण बदलाच्या आव्हानांचा सामना करीत आहोत. आता आरोग्य, अन्न आणि ऊर्जा सुरक्षेचे आव्हान निर्माण झाले आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

**भारत जागतिक दक्षिणेचा आवाज**

चला आपल्या क्षमता सामायिक करूया. आपण सर्व मिळून आपले संकल्प पूर्णत्वास नेऊया. आपण मिळून दोन तृतीयांश समानवतेची ओळख मिळवूया, असे आवाहन मोदींनी केले. मागील काही वर्षांत जागतिक दक्षिण किंवा विकसनशील देशांच्या विशेषतः आफ्रिकन खंडाच्या चिंता, आव्हाने आणि आकांक्षांना भारत आवाज देत आहे, असे नरेंद्र मोदी यांनी सांगितले. ■

# रशियात सापडला मॅमथच्या हाडांचा ‘महाल’!

### संशोधकांना लागला अनोखा शोध

◆ **मॉस्को, १७ ऑगस्ट**

रशियाची राजधानी मॉस्कोच्या दक्षिणेस संशोधकांना एक अनोखा शोध लागला आहे. याठिकाणी ४० हजार वर्षांपूर्वीच्या वुली मॅमथच्या हाडांचा एक जणू ‘महाल’च सापडला आहे. वुली मॅमथ हे प्रागैतिहासिक काळातील केसाळ हत्ती होते, जे दहा हजार वर्षांपूर्वी लुप्त झाले.

एकेकाळी युरेशिया आणि उत्तर अमेरिकेच्या अनेक भागांमध्ये ते वावरत होते. ते नेमके कशामुळे लुप्त झाले, हा अद्याप संशोधनाचा विषय आहे. बेसुमार शिकारीचे ते बळी ठरले, असे मानले जाते. रशियात इतक्या मोठ्या संख्येने त्यांची हाडे एकाच ठिकाणी सुरक्षित पद्धतीने झाले होते. त्यावेळी तिथे काही छोटे अवशेष सापडले होते. मात्र, आता मॅमथच्या वेगवेगळ्या हाडांपासून बनवलेली आहे. ती हिमयुगाच्या ११’ या कठोर वातावरणात राहणाऱ्या प्रागैतिहासिक काळातील शिकारी व संग्रहकर्त्यांचे दुर्लभ उदाहरण सादर करते. याठिकाणी एक नैसर्गिक झरा होता, जो हिवाळ्यात संपूर्ण गोठून न जाता पाणी देत असे. त्यामुळे याठिकाणी मनुष्य व मॅमथ हे दोन्ही पाण्याच्या आशेने आले असावेत. याठिकाणी आढळलेली हाडे ही माणसाने शिकार केलेल्या मॅमथची आहेत की नैसर्गिकरीत्या मृत्युमुखी पडलेल्या मॅमथची, हे समजले नाही. त्याबाबतचे संशोधन अद्याप बाकी आहे. यापूर्वी मेक्सिको सिटीजवळ मानवनिर्मिती ‘जाळ्या’त वुली मॅमथचे एक डझनपेक्षाही अधिक सांगाडे आढळून आले होते. मेक्सिकोच्या या राजधानीपासून उत्तरेत ट्ल्टेपेकमध्ये दोन खड्ड्यांत हे



# तहव्वूर राणाला भारताकडे सोपविणे शक्य

### अमेरिकी कोर्टाचा झटका

**वॉशिंग्टन, १७ ऑगस्ट**

२००८ मध्ये मुंबईत झालेल्या दहशतवादी हल्ला प्रकरणात भारताला हवा असलेला पाकिस्तानी वंशाचा कॅनडातील नागरिक तहव्वूर राणाला अमेरिकी न्यायालयाने मोठा झटका दिला आहे. भारत व अमेरिकेतील प्रत्यार्पण करारानुसार राणाचे प्रत्यार्पण शक्य असल्याचा निर्णय कॅलिफोर्नियातील न्यायालयाने दिला आहे.

भारतासोबत असलेला करार तहव्वूर राणाच्या प्रत्यार्पणाची परवानगी देतो, असा निर्णय न्यायालयाने गुरुवारी दिला. दंडाधिकारी न्यायालयाने भारताला प्रत्यार्पित करण्यासाठी दिलेल्या प्रमाणनाच्या विरोधात कॅलिफोर्निया जिल्हा न्यायालयात राणाने हॅबिअस कॉर्प्स याचिका दाखल केली होती, ती फेटाळण्यात आली. या निर्णयाविरोधात त्याने नाईन्थ सर्किट कोर्ट ऑफ अपिल्समध्ये आव्हान दिले होते. मात्र, न्यायालयाने त्याच्या विरोधात निर्णय दिला.

मुंबईवर २६/११ रोजी झालेल्या हल्ल्यात भूमिका असल्याच्या तसेच या हल्ल्याच्या कटकर्त्यांपैकी एक लष्कर-ए-तोयबाचा पाकिस्तानी-अमेरिकी दहशतवादी डेव्हिड कोलमन हेडलीचा साथीदार असल्याच्या आरोपाखाली तहव्वूर राणाला सध्या लॉस एंजलिस येथील तुरुंगात ठेवण्यात आले आहे.

# जनतेच्या प्रश्नांवर राज्यात तिसरा मोर्चा उभारणार

### कपिल पाटील यांचा निर्धार

**तभा वृत्तसेवा/ विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि.१७ ऑगस्ट :**

महाआघाडी असो की महायुती या दोघांनाही महाराष्ट्रातील जनतेच्या प्रश्नांविषयी देणेघेणे नाही. कोण गद्दार? कोण खुद्दार? कोण मुख्यमंत्री होणार ? एकमेकाला संपवण्याची भाषा, शिवराळ आरोपबाजी, मराठा विरुद्ध ओबीसी भांडणतंटे, लाडके आणि सावत्र यात दोघांनाही रस आहे. सत्ता मिळवणं हेच त्यांचे राजकारण आहे. म्हणून लोकांच्या कळीच्या प्रश्नांवर राज्यात तिसरा मोर्चा उभा करण्याचा निर्धार समाजवादी गणराज्य पार्टीचे अध्यक्ष कपिल पाटील यांनी आज केला.

गोरेगावच्या केशव गोरे स्मारक येथे समाजवादी गणराज्य पार्टीच्या राज्य कार्यकारिणीची विस्तारीत बैठक पार पडली. त्यावेळी मुंबईसह राज्यातील प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. गोरेगावमधील राजकीय कार्यकर्त्यांची उपस्थितीही लक्षणीय होती. यावेळी पक्षाच्या गोरेगाव कार्यालयाचे उद्घाटनही झाले. बैठकीला पार्टीचे नेते आणि प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ डॉ. नीरज हातेकर, जेष्ठ नेते विजय लालवाणी, मलविंदरसिंह खुराणा, सच्चिदानंद शेट्टी, डॉ. कैलास गौड, शिक्षक भारतीचे अध्यक्ष अशोक बेलसरे, महासचिव अतुल देशमुख, प्रदेशाध्यक्ष अजित शिंदे, मुंबई अध्यक्ष अमित झा, कामगार नेते रमाकांत बने, रंगा सातवसे, प्रफुल्ल म्हात्रे, पार्टीचे उपाध्यक्ष अरविंद सावला आदी पदाधिकारी उपस्थित होते.

**बॅटरी टॉर्च निवडणूक चिन्ह**

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी निवडणुक आयोगाने समाजवादी गणराज्य पार्टीला बॅटरी टॉर्च हे निवडणुक चिन्ह दिले आहे. कपिल पाटील यांनी बॅटरी टॉर्च लावत त्याची आज घोषणा केली. यावेळी प्रो गोविंदा आणि प्रो कबड्डीत नावाजलेले अजय बारी यांना गोरेगाव अध्यक्षपदी नेमणूक देण्यात आली. सोबत नंदा कांबळे यांना राज्य सचिव, सुदेश सावंत यांना मुंबई सचिव, अनिकेत पडवळ, कमलेश यादव यांना गोरेगाव उपाध्यक्ष तर हितेश भानूशाली आणि चेतन बनसोडे यांना गोरेगाव सचिवपदी नियुक्ती देण्यात आली.

**बैठकीतील प्रमुख ठराव**

शेतीमालाला हमीभाव मिळावा, जिरायत शेतकऱ्यांना शेतीसाठी भांडवल, बी-बियाणे, खते यांची सुविधा स्वस्त दरात उपलब्ध करून द्यावी, कंत्राटीकरण रद्द करावे, शिक्षण आणि आरोग्याच्या सुविधा दर्जेदार आणि मोफत सरकारने द्याव्यात, मुंबईची बेस्ट वाचली पाहिजे, कोकण रेल्वेने कोकणात जाण्यासाठी कसारा कर्जत धर्तीवर शटल सुरू करावी, छोट्या उद्योगांना भांडवल, मार्केटिंग, कच्चा माल मिळण्याची सुविधा सरकारने उपलब्ध करून द्यावी ,हे ठराव करण्यात आले.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## स्वातंत्र्य दिन उत्साहात



### लालबहाद्दूर शास्त्री प्रशाला, दिंडूर

दिंडूर (ता. दक्षिण सोलापूर) येथील लालबहाद्दूर शास्त्री प्रशालेत स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी संस्थाध्यक्ष नागय्या स्वामी होते. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विठ्ठल हुच्चे, संचालक राहुल स्वामी, उपाध्यक्ष शिवराज स्वामी, शांतय्या हिरेमठ, कांदे, सरपंच लक्ष्मण मिरजे, फ्रीडम् ग्रुपचे सदस्य नागेश बिदरी, अंबरिश मिसे, गिरीधर थळंगे उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, देशभक्तीपर भाषणे, नृत्य सादर केले. याप्रसंगी फ्रीडम ग्रुपने पाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य देण्यासाठी दत्तक घेतले. शाळेचा माजी विद्यार्थी परशुराम वाघमारे, शिक्षक घोडके व स्वामी यांच्या प्रयत्नातून झाडे लावा झाडे जगवा या सोलापूरच्या संघटनेच्या माध्यमातून शाळेत ५० झाडे लावण्यात आले. सूत्रसंचालन कामरय्या स्वामी यांनी केले तर आभार मुख्याध्यापक गणेश बंडगर यांनी मानले. कार्यक्रमासाठी घोडके, स्वामी, शिवयोगी, नारायणकर, राणी बिराजदार, स्नेहल बिराजदार, मिरजे, पाकणीकर, लक्ष्मण शिवानंद घोडके यांनी परिश्रम घेतले.



### संत दामाजी साखर कारखाना, मंगळवेढा

मंगळवेढा तालुक्यातील श्री संत दामाजी सहकारी साखर कारखाना कार्यस्थळावर स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने चेअरमन शिवानंद यशवंत पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी संचालक मुरलीधर दत्तू, गौरीशंकर बुरकूल, गोपाळ भगरे, राजेंद्र पाटील, भारत बेदरे, दयानंद सोनगे, औदुंबर वाडदेकर, रेवणसिध्द लिगाडे, भिवा दोलतडे, बसवराज पाटील, गौडाप्पा बिराजदार, दिगंबर भाकरे, महादेव लुगडे, तानाजी कांबळे, निर्मला तानाजी काकडे, लता सुरेश कोळेकर, विलासराव देशमुख, चिफ इंजिनिअर सचिन गुंड, चिफ केमिस्ट रमेश जायभाय, चिफ अकौंटंट रमेश गणेशकर, मुख्य शेती अधिकारी कृष्णात ठवरे, कार्यालयीन अधीक्षक दगडू फटे, आप्पासोा शिनगारे, उत्तम भुसे, संदिप इंगोले, मनोज चेळेकर, प्रकाश पाटील, लक्ष्मण बेदरे, कामगार संघटना अध्यक्ष विठ्ठल गायकवाड, कामगार पतसंस्था चेअरमन विश्वास सावंजी उपस्थित होते. सूत्रसंचलन अशोक उन्हाळे यांनी केले.



### जि. प. प्राथमिक शाळा, वाफळकर वस्ती

वाफळकर वस्ती, बार्डी येथील जि. प. प्राथमिक शाळा वाफळकरवस्ती, बार्डी येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष प्रवीण कवडे, मुख्याध्यापक किरण ढोबळे, ज्ञानेश्वर दुधाणे, शालन खारे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मार्गदर्शन केले. पालक आणि ग्रामपंचायतीच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करण्यात आला.

## झोपलेल्या प्रवाशाच्या गळ्यातील चैन, खिशातील रक्कम लंपास

**बार्शी, दि. १७ ऑगस्ट-**

झोपलेल्या प्रवाशांच्या गळ्यातील २ तोळे वजनाची सोन्याची चैन व सहप्रवाशाच्या खिशातील ४ हजार रुपये चोरीला गेल्याचा प्रकार बार्शी बसस्थानकावर घडला. शहाजी अण्णा लटके (वय ४१, रा. राजुरी, ता. परांडा) यांनी याबाबत शहर पोलिसात फिर्याद दिली आहे. शेती कामासाठी ठेवलेल्या कामगाराने पलायन केल्यामुळे फिर्यादी व त्यांचे मित्र लक्ष्मण भिमराव घोरपडे (रा. घारगांव, ता. परांडा) त्याचा शोध घेत बार्शीत आले. शोध घेताना उशीर झाल्यामुळे रात्री १ चे सुमारास बार्शीच्या बसस्थानकावर ते दोघे झोपी गेले. झोपेत असताना पहाटे चारच्या सुमारास कुणीतरी अंगाला झटत असल्याचे जाणवल्याने फिर्यादी जागे झाले, त्यावेळी एक इसम त्यांच्या गळ्यातील सोन्याची चेन ओढताना दिसला. फिर्यादी जागे झालेले पाहून चोरट्याने गळ्यातील २ तोळे वजनाची सोन्याची चेन जोरात खेचून पळ काढला. मित्राला उठवून दोघांनी चोरट्याचा पाठलाग केला, परंतु तो अंधाराचा फायदा घेत पसार झाला. त्यामुळे लक्ष्मण घोरपडे यांनीही खिशातील पैसे तपासून पाहिले असता, त्यांच्याही खिशातील ५०० रुपयांच्या ८ नोटा याप्रमाणे ४ हजार रुपये चोरीला गेल्याचे दिसून आले. ही घटना १५ ऑगस्टच्या पहाटे ४ चे सुमारास घडली. बार्शी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुध्द गुन्हा नोंद झाला आहे.

# लाडक्या बहिणींसाठी मंद्रुपमध्ये पोलिसांचा ताफा

## पैसे काढण्यासाठी झुंबड; अफवांमुळे बँकांमधील महिलांची गर्दी हटता हटेना

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १७ ऑगस्ट-**

राज्य सरकारने पात्र लाडक्या बहिणींच्या खात्यावर दोन महिन्यांचे तीन हजार रूपये रक्षाबंधनाच्या आधी जमा केले. अशात अफवा पसरल्याने पैसे काढण्यासाठी मंद्रुप बँक ऑफ इंडियामध्ये लाडक्या बहिणींची झुंबड उडाली आहे. कर्मचाऱ्यांना काम करण्यासाठी व्यत्यय येत असल्याने वारंवार काम बंद करावे लागत आहे. गर्दी वाढल्याने पोलिस बंदोबस्तात पैसे देण्याची वेळ आली आहे.



दोन दिवसांपासून राज्य सरकारने लाडक्या बहिणींसाठी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत पात्र महिलांच्या खात्यावर दोन महिन्यांचे तीन हजार रूपये जमा केले आहेत. पैसे जमा केलेले मोबाईलवरून संदेश मिळताच महिला पैसे काढण्यासाठी बँकेकडे रांगा लावत आहेत. मंद्रुपच्या बँक ऑफ इंडिया शाखेत दररोज क्रमांकाचे कुपन वाटप करून ३०० ते ४०० महिलांना पैसे देण्यात येत आहे. मात्र महिलांची गर्दी वाढत असून अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे बँकेला महिलांचा मनस्ताप सहन करावा लागत आहे. महिला कर्मचाऱ्यांच्या सूचनांचे पालन करीत नसल्यामुळे बँकेत गोंधळ होऊन वारंवार काही काळ कामकाज बंद करावा लागत आहे. मंद्रुप पोलिसांच्या उपस्थितीत महिलांना कुपन देऊन पैसे देण्यात येत आहे.

पैसे काढण्यासाठी बँकेत गर्दी करीत असताना अनेक महिला चौकशी करण्यासाठी व बँक खात्याला मोबाईल नंबर लिंक करण्यासाठी मोठ्या प्रमाणात गर्दी करीत आहेत. खात्यावर जमा झालेले पैसे परत जाणार असल्याच्या अफवांमुळे महिला बँकेतील पैसे काढण्यासाठी धावपळ करीत आहेत. मात्र अपुऱ्या कर्मचाऱ्यांमुळे बँकेची यंत्रणा विस्कळीत होत आहे. रक्षाबंधनापूर्वी खात्यावरील पैसे काढण्यासाठी महिला बँकेत गर्दी करीत असल्याचे सांगण्यात येते. राज्य सरकारने लाडक्या बहिण योजनेची अर्ज करण्याची मुदत वाढवली असतानाही महिलांच्या गर्दीमुळे बँकेत कर्मचाऱ्यांची डोकेदुखी वाढत आहे. महिलांच्या गर्दीमुळे दैनंदिन खातेधारकांची मात्र गैरसोय होत असून आर्थिक व्यवहार करताना गैरसोय होत आहे. त्यामुळे ग्राहकांना बँकेबाहेर ताटकळत बसण्याची वेळ आली आहे.

### राजकीय वक्तव्यांचा परिणाम

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या पैशांवर विरोधी व सत्ताधारी पक्षाचे आमदार परस्परविरोधी वक्तव्य करीत असल्याने खात्यावरील पैसे काढण्यासाठी महिलांची बँकेत गर्दी दिसून येत आहे. खात्यावरील पैसै सरकार परत घेणार असल्याची अफवा असल्याने महिला गर्दी करीत असल्याची चर्चा सुरू आहे. त्यामुळे पात्र व अपात्र महिला बँकेत गर्दी करीत आहेत.

> मंद्रुप बँक ऑफ इंडिया शाखेत दोन दिवसांपासून लाडकी बहीण योजनेचे खात्यावरील पैसे देण्याचे काम सुरु आहे. मात्र महिला गर्दी करून कामकाजात व्यत्यय करीत असल्यामुळे क्रमांकाचे कुपन देऊन गर्दी कमी करण्यासाठी पोलिसांच्या उपस्थितीत महिलांना पैसे देण्यात येत आहे.
>
> - **सिद्धाराम कट्टे,** व्यवस्थापक, बँक ऑफ इंडिया, मंद्रुप

## आमच्या समाजाला भाजपाच न्याय देऊ शकेल : आ. अमित गोरखे

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ ऑगस्ट-**

काँग्रेस असो महाविकास आघाडी सरकार असो दोघांनीही आमच्या समाजाचा वापर केला. मात्र विधानपरिषद, राज्यसभा देण्याची ताकद दाखविली नाही. भाजपाच आमच्या समाजाला न्याय देऊ शकेल, असा विश्वास आ. अमित गोरखे यांनी व्यक्त केला.



बहुजन संवाद यात्रेनिमित्त अक्कलकोट येथे आले असता ते बोलत होते. लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांचे सातासमुद्रापार स्मारक असो, लहुजी वस्तादचे स्मारक भाजपामुळे झाले. बंद आर्थिक विकास महामंडळ चालू करून अर्थ सहाय्य उपलब्ध करून देण्याचे काम शिंदे, देवेंद्र फडवणीस सरकारने केले. डॉ. बाबासाहेबांचे लंडनमधील घर असेल वा संविधान दिन पाळण्याचे कार्य भाजपाने सुरु केले. दलित, वंचित सगळी मंडळी भारतीय जनता पार्टीकडे आकर्षित होत आहेत. येणाऱ्या काळात सर्व समावेशक, सर्व समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक अपेक्षा भारतीय जनता पार्टीच ूर्ण करू शकते असे आ. अमित गोरखे यांनी सांगितले. याप्रसंगी अमोल कुचेकर, माजी नगरसेवक मीलन कल्याणशेट्टी, नामदेव क्षीरसागर, अनिल गवळी, दगडू पारखे, सुनिल खवळे, अंबादास कांबळे, विकास मोरे, दत्ता केंदळे, महेश भिसे, सुभाष रणदिवे उपस्थित होते.

## कालव्याचे पाणी सीतामाई तलावात

### एमके फाउंडेशनचे कोगनुरे यांच्या मागणीला यश

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १७ ऑगस्ट-**



उजनी धरणातून कालव्याद्वारे सोडण्यात आलेले पाणी मंद्रुपच्या सीतामाई तलावात सोडण्यासाठी एमके फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव कोगनुरे यांनी पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश येऊन गुरूवारपासून सीतामाय तलावात पाणी सोडण्यात आले आहे.

उजनी धरणातून अतिरिक्त पाणी कालव्याद्वारे सोडण्यात येत आहे. पावसाळा असल्याने शेतकरी पिकांसाठी पाणी घेत नाहीत म्हणून पाटबंधारे विभागाने कालव्यातील पाणी सीतामाय तलावात सोडून तलाव भरण्यासाठी प्रयत्न करावे, अशी मागणी केली होती. कालव्यातील पाणी सीतामाई तलावात सोडल्यास तलाव भरून विहीर व कुपनलिकांना पाझर सुटण्यास मदत होते म्हणून शेतकऱ्यांच्या मागणीनुसार सीतामाई तलावात पाणी सोडून तलाव भरून देण्यासाठी पाठपुरावा केल्यानंतर त्यांच्या मागणीला यश आला आहे म्हणून महादेव कोगनुरे यांचे शेतकरी वर्गांतून आभार व्यक्त करण्यात येत आहे.

## श्रावणमास प्रवचनमाला - ११

# विषयाचा आनंद ज्याला होतो, तो प्रापंचिक मनुष्य समजावा

**● डॉ. जयवंत बोधले महाराज ●**



**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑगस्ट-**

आनंदाच्या अनुभूतीने युक्त आहेत. त्यांना संत म्हणावे. तसेच आनंदाची परिपूर्णता ज्यांच्याकडे आहे, ते संत होय. शांतीब्रह्म संत एकनाथ महाराज हे आनंदमूर्ती होते, असे पूज्य डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज बोधले यांनी सांगितले. प्रवचनमालेच्या आजच्या ११ व्या सत्राच्या चिंतनाचे निरुपण महाराज त्यांच्या अमृतवाणीतून करीत होते.

अपूर्ण, पूर्ण आणि परिपूर्ण या तीन शब्दांचे स्वरुप सांगताना डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज म्हणतात, अपूर्णाच्या विरुद्ध जे आहे, ते पूर्ण होय. एकंदरीत आनंदाची पूर्णता, आनंदाची अपूर्णता आणि आनंदाची परिपूर्णता या मानवी जीवनात तीन अवस्था सांगितल्या जातात. नाथ महाराज हे आनंदाच्या परिपूर्ण अवस्थेमधून संत आहेत. अपूर्णता ही प्रापंचिक माणसामध्ये असते. म्हणजेच, विषयाचा आनंद ज्याला होतो, तो प्रापंचिक मनुष्य समजावा. विषयाचा आनंद क्षणिक असतो. तो कायम टिकत नाही.

उदाहरणार्थ एखादी वस्तू नवीन घेतली तर त्या वस्तूचा आनंद हा एका ठराविक कालावधी पुरताच टिकतो. कालांतराने वस्तूचा आनंद नाहीसा होतो. म्हणजेच एकदा आलेला आनंदाचा क्षण तो कायम टिकत नाही. यालाच प्रपंच म्हणतात. उलटपक्षी एकदा आलेला आनंदाचा क्षण जो कायम टिकतो तो परमार्थ होय, असे डॉ. श्रीगुरु जयवंत महाराज स्पष्ट करतात.

आनंदाची अनुभूती ज्याला आली, तो ज्ञानी व्यक्ती समजावा आणि आनंदाची परिपूर्णता ज्यांच्याकडे आहे, त्यांना संत म्हणतात. संत एकनाथ महाराजांच्या अंगी आनंदाची परिपूर्णता होती, म्हणून ते संत आहेत. ब्रह्म आहेत. नाथबाबा गृहस्थाश्रमी असल्याने ते प्रापंचिक आहेत. त्यांना संसार करावा लागत आहे. ल. रा. पांगारकरांनी नाथांचा प्रपंच विवेकावर आधारलेला आहे, असा उल्लेख केला आहे. विवेकाचे अधिष्ठान असलेला प्रपंच, तो खरा परमार्थ होय. ज्यांचे विचार चांगले आहेत. त्यांना विवेकस्वरुप म्हणतात. आचार हा विचारावर अवलंबून असतो. म्हणून ज्यांचे विचार शुद्ध आहेत, त्यांचे उच्चार आणि आचारही शुध्द असतात, असा व्यक्ती प्रापंचिक असूनही पारमार्थिक असतो.

श्रीगुरु जयवंत महाराज पुढे, संत एकनाथांचा प्रपंच लौकिकाच्या दृष्टीने सांगताना, त्यांनी महाभारतातील काही उदाहरणे सांगितली. यामध्ये तीन गोष्टी महत्त्वाच्या आहेत. जी अनावश्यक गोष्ट आहे, तिची मनात इच्छा न बाळगणे, जे घडून गेले आहे त्याबद्दल शोक किंवा दुःख न करणे. कितीही कठीण प्रसंग आला तरी त्यास न डगमगता; न घाबरता सामोरे जाणे. नाथ महाराज या तीन अवस्थेमधून गेले आहेत, म्हणून ते संत आहेत, ते ब्रह्मस्वरुप आहेत. ज्ञानोबारायांनी हरिपाठामध्ये म्हटल्याप्रमाणे-

त्रिगुण असार। निर्गुण हे सार।। निर्गुण म्हणजे रज, तम, सत्व ; अर्थात माया होय. हे जगत मायास्वरुप आहे आणि निर्गुण हा सार आहे. सार म्हणजे निवडक होय. सार आणि असार ज्यांना कळते ते विचारी असतात. प्रपंचामधील आसक्ती निघून गेली की, जे शिल्लक राहते, तेच सार असते. ते तत्व असते. ते ज्ञान असते. अशा तत्व आणि ज्ञानावर आधारित संत एकनाथांचा प्रपंच सुरु आहे. रविंद्रनाथ टागोरांनी सांगितलेप्रमाणे, जिथे अहंपणा संपलेला असतो. तो ईश्वरी तत्वाकडे घेवून जाणारा मार्ग असतो. मानवी जीवनात समाधान हे विचारावर अवलंबून असते, असे डॉ.श्रीगुरु जयवंत महाराज मार्गदर्शन करतात. नाथांच्या घरी सांप्रदायिक उत्सव होत आहेत. गोकुळाष्टमीला जनार्दन स्वामींना घरी घेवून आल्यावर पूजन होते. त्या दिवशी कीर्तनात ज्ञान, भक्ती व वैराग्याच्या गोष्टी सांगतात. पुढे जनार्दन स्वामी निघून जातात. नाथबाबा पुढे पंढरपूरची एकादशीची वारी करण्याचे ठरवतात.

## अन्नछत्र मंडळाची अन्नदान सेवा कौतुकास्पद: पोलीस अधीक्षक कुलकर्णी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ ऑगस्ट-**

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली अखंडपणे सुरू असलेले अन्नदान सेवा, नियोजित महाप्रसाद गृह, पार्किंगची व्यवस्था आणि येणाऱ्या भाविकांसाठी न्यासाचा पुढील मास्टर प्लॅनदेखील अतिशय सुनियोजित असल्याचे मनोगत सोलापूर ग्रामीणचे नूतन पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी व्यक्त केले.

श्रीक्षेत्र अक्कलकोट येथील श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात आले असता, मंडळाचे प्रमुख कार्यकारी विश्वस्त अमोलराजे भोसले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला, यावेळी ते बोलत होते. त्यांच्या समवेत उत्तर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेंद्र टाकणे, चिदानंद उपद्य, पीएसआय खापरे, न्यासाचे सचिव शामराव मोरे, विश्वस्त संतोष भोसले, मनोज निकम, निखिल पाटील, गोटू माने, प्रवीण घाडगे, एस. के. स्वामी, सिध्दाराम कल्याणी, सतिश महिंद्रकर, शहाजीबाप यादव, नामा भोसले, अभियंता अमित थोरात, बाळासाहेब पोळ, सूरज सावंत, दत्ता माने, महांतेश स्वामी, समर्थ घाडगे, धनंजय निंबाळकर, विठ्ठल रेड्डी व पदाधिकारी उपस्थित होते.




## अक्कलकोटमध्ये व्यंकटेश्वरांचा पालखी सोहळा भक्तिभावात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि.१७ ऑगस्ट-**

नामधारी क्षत्रिय गवंडी समाजाच्या श्री व्यंकटेश्वर देवस्थानच्या ८३ व्या वर्धापन दिनानिमित्त सजविलेल्या पालखीचे पूजन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांच्या हस्ते झाल्यानंतर पालखी निघाली.



मंगळवारी पहाटे ५ वाजता पारंपरिक पद्धतीने देवस्थानचे पुजारी पवन देसाई यांनी काकडआरती केली. लातूर येथून भजन व दिंडी मंडळांना आमंत्रित करण्यात आले होते. सकाळी १० वाजता श्रींच्या सजविलेल्या पालखीचे पूजन अक्कलकोट एज्युकेशन सोसायटीचे चेअरमन बसलिंगप्पा खेडगी यांनी केल्यानंतर पालखी मार्गस्थ झाली. या पालखी मिरवणुकीत वाजंत्री, भजन, दिंडीचा सहभाग होता. बसलिंगप्पा खेडगी यांचा सत्कार देवस्थानचे अध्यक्ष चंद्रकांत गवंडी, सचिव अप्पाशा गवंडी, बसवराज गवंडी यांनी केला. यावेळी व्यंकटेश मंदिराचे पुरोहीत पवन देसाई, विश्वस्त श्रीशैल गवंडी, श्रीमंत चेंडके, भीमाशंकर गवंडी, अशोक गवंडी, सुनील गवंडी, विजय गवंडी, बसवराज गवंडी, देविदास गवंडी, महेश गोगी, परतरेड्डी गवंडी, श्रीशैल गवंडी, अंबादास गवंडी, भिमशा गवंडी, भीमाशंकर दुधनीकर, बाबुराव गवंडी, सचिन पेठकर, मल्लिकार्जून गवंडी, यलप्पा गवंडी, श्रीनिवास बहिरेवार, गोकुळ गवंडी, अमोल गवंडी, रमाकांत राजापुरे, राजू राजापुरे, राजू गवंडी, सन्मुख गवंडी, पप्पू गवंडी, मनोज गोगी, विजयकुमार गोगी, अभिषेक गोगी, संदीप दुधनीकर, श्रीशैल गवंडी, संदीप आमले, काशिनाथ गवंडी, गोविंद गवंडी, संजय गवंडी, दौलप्पा गवंडी, परमेश्वर गवंडी, श्रीशैल राजापुरे, सिद्धलिंग गवंडी, रमेश डण्णुरे, सुभाष तारापुरे, श्रीकांत गवंडी, पंढरीनाथ गवंडी, व्यंकटेश धोत्रीकर, मेश गवंडी, गणेश चेंडके उपस्थित होते.

# अखेर न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा मिळाला अहवाल

## माजी खा. डॉ. जयसिद्धेश्वर शिवाचार्य महास्वामी बनावट दाखला प्रकरण; २१ ऑगस्टला सुनावणी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. १७ ऑगस्ट-**

माजी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या जात प्रमाणपत्रावरील सुनावणी आता अंतिम टप्प्यावर आला असून तहसीलदारांकडून डॉ. महास्वामींच्या वडिलांची १९१५ मधील जन्म-मृत्यू नोंदीचा न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीला प्राप्त झाला आहे. त्यावर आता बुधवारी २१ रोजी सुनावणी होणार आहे.

लोकसभा निवडणुकीवेळी डॉ. महास्वामी यांनी जात प्रमाणपत्र बनावट जोडल्याची तक्रार प्रमोद गायकवाड, मिलिंद मुळे, विनायक कंदकुरे यांनी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीकडे केली होती. २०१९ च्या निवडणूक निकालानंतर सुरू झालेला हा जात प्रमाणपत्राचा तिढा पाच वर्षांनंतरही सुटलेला नाही. तत्पूर्वी, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने डॉ. महास्वामींकडील प्रमाणपत्र बनावट असल्याचा निकाल दिला होता. त्याविरोधात महास्वामींनी उच्च न्यायालयात धाव घेतली होती. न्यायालयाच्या आदेशानुसार त्यांच्या जात प्रमाणपत्रावर पुन्हा सुनावणी सुरू झाली. नैसर्गिक न्याय तत्त्वानुसार समितीने डॉ. महास्वामींच्या वकिलांची मागणी मान्य करत त्यांच्या वडिलांची गौडगाव



ग्रामपंचायतीतील १९१५ मधील जन्म-मृत्यू नोंदीची तपासणी परराज्यातील न्यायवैद्यक प्रयोगशाळेकडून करण्याचा निर्णय दिला. त्यानंतर अक्कलकोट तहसीलदारांच्या माध्यमातून ती नोंदवही परराज्यातील न्यायवैद्यक प्रयोगशाळेला पाठविण्यात आली. आता त्यांचा अहवाल समितीकडे प्राप्त झाला असून त्याची एक प्रत तक्रारदारांनाही देण्यात आली आहे. माजी खा. डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या जात दोन प्रमाणपत्रांची फेरचौकशी सुरू आहे. त्यासाठी जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने दक्षता पथकाला डॉ. महास्वामींच्या जात प्रमाणपत्रासंबंधीचा अहवाल विविध मुद्यांवर मागितला आहे. या पथकाचा अहवाल प्राप्त झाल्यावर समितीला निर्णय घेणे सोयीचे होणार आहे. पाच वर्षांपूर्वी सुरू झालेले हे प्रकरण आता अंतिम टप्प्यावर आले आहे. बुधवारच्या सुनावणीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

> डॉ. जयसिद्धेश्वर महास्वामी यांच्या वडिलांच्या गौडगाव ग्रामपंचायतीकडील जन्म-मृत्यू नोंदीचा न्यायवैद्यक प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्याची प्रत तक्रारदारालाही देण्यात आली आहे. दक्षता पथकाचाही अहवाल काही दिवसांत येईल. या प्रकरणाची आता बुधवारी सुनावणी होईल.
>
> **-बी. जी. पवार**, अध्यक्ष, जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# एफआरपी न दिलेल्या कारखान्यांवर कारवाई करा

## अन्यथा आंदोलन करणार : राष्ट्रवादी शरद पवार गटाचे गणेश मोरे यांचा इशारा

**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. १७ ऑगस्ट-**

जिल्ह्यातील ज्या साखर कारखान्यांनी १४ दिवसांत एफआरपीप्रमाणे उसाची देयके अदा केली नाहीत, अशा सर्व साखर कारखान्यांविरुद्ध कारवाई करून कारखान्यांच्या व्यवस्थापनावर तात्काळ कारवाई झाली नाही तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाकडून प्रादेशिक सहसंचालक सोलापूर विभागाच्या कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल, असा इशारा प्रादेशिक साखर सहसंचालकांना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे कार्याध्यक्ष गणेश मोरे यांनी दिला आहे.



जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांनी वर्ष २०२३-२४ मध्ये ऊस गाळप केलेले आहे. सोलापूर जिल्ह्यातील काही साखर कारखान्यांनी एफआरपीप्रमाणे उसाची बिले शेतकऱ्यांना वेळेत दिली आहेत. उसाचा हंगाम संपला तरी अद्याप काही साखर कारखान्यांनी ऊसाची बिले दिली नाहीत. साखर कारखान्यांना उसाच्या बिला संदर्भात जाब विचारला असता शेतकऱ्यांना उडवाउडवीची उत्तरे दिली जात आहेत. महाराष्ट्रातील शेतकरी सध्या आर्थिक संकटात सापडलेला आहे. पिकवलेल्या शेतीमालाला कवडीचासुध्दा मोबदला मिळाला नाही. सध्या शेतकरीवर्गाला बी-बियाणे, खते घेण्यासाठी, मंजुरी देण्यासाठी आणि स्वत:चा उदरनिर्वाह करण्यासाठी पैशाची अत्यंत गरज आहे. तरीदेखील साखर कारखान्यांकडून ऊसाची बिले दिली जात नाहीत. तीन ते चार महिन्यांपासून उसाची बिले थकित पडली आहेत.साखर कारखान्यांना दिलेल्या गाळप परवानामधील अटीनुसार गाळपासाठी उसाचा पुरवठा केलेल्या तारखेपासून १४ दिवसात एफआरपीप्रमाणे उसाची देयके अदा करायची आहेत. ही तरतूद जिल्ह्यातील सर्व साखर कारखान्यांना ज्ञात असूनदेखील याचे उलंघन झालेले आहे. ऊस नियंत्रण आदेशमधील तरतुदीनुसार हंगामात गाळप केलेल्या ऊसाचे १४ दिवसांत किमान एफआरपीप्रमाणे ऊस किंमत ऊस पुरवठादारांना अदा करणे प्रत्येक कारखान्यांना बंधनकारक आहे. तसेच विहित कालावधीत एफआरपी देयक अदा न केल्यास कलमानुसार विलंब कालावधीकरता १५ टक्के व्याज आकारण्याची तरतूद आहे, असे असूनदेखील सोलापूर जिल्ह्यातील अनेक साखर कारखान्यांनी कोटीच्या कोटी रुपये थकित ठेवली आहेत आणि ऊस नियंत्रण कायदा १९६६ मधील तरतुदीचे उल्लंघन केले आहे.

### कारखाना व्यवस्थापन कारवाईस पात्र

ज्या अर्थी साखर कारखान्यांने ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार विहित कालावधीत एफआरपीची रक्कम ऊस उत्पादक शेतकरी बांधवांना १५ टक्के व्याजासह अदा करण्यास कसूर केला असून कारखान्याचे व्यवस्थापन कलमनुसार कारवाईस पात्र आहेत.

# आयबीपीएसच्या परीक्षेदिवशी एमपीएससी पेपर रद्द न झाल्यास न्यायालयात जाणार : लोंढे

**तभा वृत्तसेवा/विशेष प्रतिनिधी**
**मुंबई, दि. १७ ऑगस्ट:**

महाराष्ट्र लोकसेवा आयोग युवकांचे आयुष्य घडवणारे आहे की त्यांची कत्तल करणारा जनावरांसारखा कत्तलखाना आहे. १८ व २५ ऑगस्टला आयबीपीएसने देशपातळीवर परीक्षा आयोजित केलेला असताना त्याच तारखांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगानेही परीक्षा घेत आहे., त्यामुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. एमपीएससीने परिक्षांच्या तारखांमध्ये बदल करुन दोन, तीन दिवसांनी परीक्षा घेऊन विद्यार्थ्यांना न्याय द्यावा अन्यथा हायकोर्टात दाद मागू, असा इशारा महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी दिला आहे.

टिळक भवनमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलताना अतुल ते म्हणाले की, राज्य आयोग परिक्षांच्या तारखा ठरवताना यूपीएससी, आयबीपीएस, स्टाफ सिलेक्शन कमिशनच्या परिक्षांच्या तारख्यांचा अंदाज घेऊन ओव्हरलॅप होणार नाहीत, अशा पद्धतीने तारखा ठरवण्याचा प्रघात आहे.. पण महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने त्याची दखल यावेळी घेतलेली दिसत नाही. एमपीएससी विद्यार्थ्यांवर सुड उगवण्याचे काम करत आहे. एकतर जागा निघत नाहीत आणि निघाल्या तर त्याचे नियोजन व्यवस्थित नसते ,परीक्षा फक्त रविवारीच घ्यावी असा काही नियम नाही, कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांनी तातडीने या प्रकरणी लक्ष घालून परिक्षांच्या तारखा ओव्हरलॅप होत असल्याचे दिसताच विद्यार्थ्यांचे हित पाहून आयोगाच्या परिक्षांची तारिख बदलण्याचे निर्देश दिले. जे कर्नाटक सरकार करू शकते ते महाराष्ट्र सरकार का करु शकत नाही.? सर्वसामान्यांचे सरकार आहे असा दावा करणाऱ्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नाकाखाली एमपीएससी मनमानी कारभार करते त्यात लक्ष लागण्याची गरज आहे. ॲग्रिकल्चर संवर्गातील २०२ जागांवर विद्यार्थ्यांची निवड झाली असताना अद्याप त्यांना नियुक्त्या दिलेल्या नाहीत, त्याच कृषी संवर्गातील २५८ जागांची मागणी सरकारने एमपीएससीकडे केलेली आहे पण एमपीएससीने त्या संवर्गाची लिंकच ओपन केलेली नाही, त्यामुळे २५ तारखेला जी परिक्षा होत आहे ती होऊ नये अशी आमची मागणी आहे. ती लिंक ओपन करण्यासंर्भात एमपीएससीकडून काहीही हालचाल होत नाही आणि मुख्यमंत्री शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार व फडणवीस या प्रकरणी लक्ष घालण्यास तयार नाहीत असेही लोंढे म्हणाले.

एमपीएससी आडमुठी भूमिका घेऊन त्यांच्या स्वप्नाचा चुराडा करण्याचे पाप करत आहे. आयोगाच्या या भोंगळ कारभाराला विद्यार्थी कंटाळले आहेत, त्यांना नैराश्य आले असून ते प्रचंड मानसिक ताणात आहेत. सरकारने लाडकी बहिण योजना काढली आहे तशीच लाडका भाचा स्पर्धा परिक्षा योजनाही काढावी, असा टोलाही लोंढे यांनी लगावला आहे. आता महाराष्ट्र लोकसेवा आयोग काय निर्णय घेणार, याकडे राज्यातील परीक्षार्थ्यांचे लक्ष लागले आहे.



# पंढरपुरात संविधान जागर यात्रा

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑगस्ट-**

संविधान अमृत महोत्सवाच्या निमित्ताने काढण्यात आलेली संविधान जागर यात्रा शनिवारी पंढरपुरात आली आहे.

संविधानाबाबत विरोधी पक्षाने खोटा नेरिटिव पसरवला जात आहे. लोकांमध्ये संविधानाविषयी जनजागृती व्हावी यासाठी संविधान जागर समितीच्या वतीने ही यात्रा काढण्यात आली आहे. येत्या ६ सप्टेंबर रोजी चैत्य भूमी, दादर येथे संविधान जागर यात्रेचा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत समारोप होणार आहे, अशी माहिती डॉ. बाबासाहेब आंबेडकर फाऊंडेशनच्या संचालिका योजना ठोकळे यांनी दिली. यावेळी भाजप प्रदेश उपाध्यक्ष ॲड. वाल्मिक निकाळजे, भीम आर्मीचे संस्थापक अध्यक्ष नितीन मोरे, कर्मवीर दादासाहेब गायकवाड यांचे नातू राजेंद्र गायकवाड यांच्यासह शेकडो पदाधिकारी, आंबेडकरवादी कार्यकर्ते उपस्थित होते.

# महापुरुषांच्या पुतळ्यांचे अनावरण; तबबल १०० फूट स्तंभावर ध्वजारोहण

### आळंद तालुक्यात देशभक्तीचा माहोल

### राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराजांची उपस्थिती

**अक्कलकोट दि.१७ ऑगस्ट**

बोलो भारत माता की जय, वंदे मातरम, राष्ट्रीय संत हवा मल्लिनाथ महाराज की जयचा जयघोष करीत लाडचिंचोली, ढोगी बना (ता. आळंद) येथील जय भारत माता देवस्थान येथे स्वातंत्र्यदिनी भारत माता देवस्थान येथे थोर क्रांतीकारक भगतसिंह, संगोळी रायण्णा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या अर्धपुतळ्याचे अनावरण करून शंभर फूट उंच स्तंभावर तिरंगा राष्ट्रध्वज मोठ्या जल्लोषात फडकावण्यात आला.



जय भारतमाता सेवा समिती नवी दिल्लीचे संस्थापक अध्यक्ष राष्ट्रीय संत पपू श्री हवा मल्लिनाथ महाराजांच्या सानिध्यात सकाळी कर्नाटकच्या मुख्यमंत्र्यांचे सल्लागार आ. बी. आर. पाटील यांच्या हस्ते १०० फूट उंच स्तंभार राष्ट्रध्वज फडकावण्यात आला. दिवसभर देशभक्तीपर कार्यक्रम पार पडले. समितीचे प्रवक्ते ॲड. वैजनाथ झळकी यांनी स्वागत केले. जय भारत माता सेवा समितीचे लातूर जिल्हाध्यक्ष बालाजी बिराजदार यानी सूत्रसंचलन केले. हवा मल्लिनाथ महाराजांचे दर्शन घेऊन भाविकांनी खीर, पुरण पोळी, चपाती, कडक भाकरी, गरगट्टा महाप्रसादाचा लाभ घेतला.

# आ. राऊतांची अंगणवाडी सेविकांच्या पाठीवर थाप

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. १७ ऑगस्ट-**

शहरातील लिंगायत बोर्डिंग येथे मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना समितीच्यावतीने आ. राजेंद्र राऊत यांच्या उपस्थितीत लाभार्थी शिबीर पार पडले. याप्रसंगी अंगणवाडी सेविकांच्या पाठीवर त्यांनी शाबासकीची थाप दिली.



या शिबिरामध्य स्वागत व सत्कार करुन नवीन लाभार्थी नोंदणी अर्ज स्वीकृती, मार्गदर्शन, आधार कार्ड बँकेशी संलग्न करण्यावर मार्गदर्शन, अंगणवाडी सेविकांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी आ. राऊत व ॲड. रणवीर राऊत यांना महिला भगिनींनी राखी बांधून आभार व्यक्त केले. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना समितीचे अध्यक्ष ॲड. रणवीर राजेंद्र राऊत यांनी अंगणवाडी सेविकांच्या कार्याचे कौतुक केले. यावेळी तहसीलदार एफ. आर. शेख, गटविकास अधिकारी सुळे, मुख्याधिकारी बाळासाहेब चव्हाण, महिला व बालविकास प्रकल्प अधिकारी रेश्मा पठाण, शैलेश सदाफुले, भैय्या बारंगुळे उपस्थित होते.



सोलापूर तरुण भारत
https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com

कटाक्ष

गजानन निमदेव

# बांगलादेशातील हिंदूंना वाऱ्यावर सोडून कसे चालेल?

शेजारच्या बांगलादेशात अल्पसंख्यक हिंदूंवर अतोनात अत्याचार झालेत. त्यांची घरे जाळण्यात आली. संपत्ती लुटण्यात आली. महिलांवर अत्याचार करण्यात आले. हिंदू मंदिरांची तोडफोड करण्यात आली. एवढे सगळे होऊनही पीडित हिंदूंच्या समर्थनार्थ कुठेही 'मेणबत्ती' मार्च निघाल्याचे दिसले नाही. एरवी जराही कुठे खुट्ट वाजले की आकाशपाताळ एक करत केंद्रातील मोदी सरकारला, भारतीय जनता पार्टीला आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाला सरसकट आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करणारे स्वयंघोषित पुरोगामी बांगलादेशात हिंदूंवर झालेल्या अत्याचाराबाबत काहीही बोलताना दिसले नाहीत.

कोलकात्याचेच उदाहरण घ्या ना! एका महिला डॉक्टरवर अत्याचार करून तिची हत्या झाल्याच्या घटनेविरुद्धही स्वयंघोषित पुरोगामी मंडळी काही उद्रेक करताना दिसली नाहीत. हीच घटना भाजपाशासित राज्यात घडली असती तर राहुल गांधींपासून अखिलेश यादवपर्यंत असंख्य नेत्यांनी अकांडतांडव केले असते. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांचा राजीनामा मागितला असता. पंतप्रधान मोदींवर शरसंधान साधले असते. पीडितांच्या कुटुंबीयांना भेटण्यासाठी जाण्याची स्पर्धा लागली असती. पण, इथे बंगालमध्ये, भाजपेतर पक्षाचे म्हणजे ममता बॅनर्जींचे शासन आहे. भाजपेतर राज्यांमध्ये कितीही गंभीर घटना घडली तरी काहीच बोलायचे नाही आणि भाजपाशासित राज्यात छोटीशी घटना घडली तरीही आगडोंब उसळवायचा, ही विरोधी पक्षांची विशेषतः काँग्रेस आणि त्यांचे नेते राहुल गांधी यांची कार्यपद्धती झाली आहे. असो. चर्चेचा विषय बांगलादेश आणि तिथे हिंदूंवर झालेल्या अत्याचाराचा आहे.

सगळ्यांना केंद्रातील मोदी सरकारकडून अपेक्षा आहेत. मोदी हिंदूंना न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न करत आहेतच. पण, ठोस प्रयत्न होऊन त्याचे चांगले परिणाम मिळावेत यासाठी देशातील तमाम हिंदू नेत्यांनी त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायला नको? शरद पवार, अखिलेश यादव, लालूप्रसाद यादव, अरविंद केजरीवाल, ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे यांच्यासारख्या हिंदू नेत्यांनी बांगलादेशातील घटनांचा निषेध करायला नको? या नेत्यांनी मोदींना भेटून निवेदन देत बांगलादेशातील हिंदूंना संरक्षण देण्याची आग्रही मागणी करायला नको? निश्चितपणे करायला पाहिजे. पण, हिंदूंच्या संरक्षणासाठी पुढाकार घेतला तर इथले मुसलमान मतदार नाराज होतील, या भीतीने यांच्यापैकी कुणीही हिंदुहिताची चर्चा करणार नाही, याची खात्री आहे. खरे तर संपूर्ण जगात मुस्लिम सुरक्षित कुठे असतील तर ते भारतात आहेत. ही बाब लक्षात घेत मुस्लिम बांधवांनीही शेजारी देशातील हिंदू बांधवांवर होत असलेल्या अत्याचाराविरोधात आवाज उठवला पाहिजे. पण, इथे तर उलटीच चर्चा होताना दिसत आहे. काही वर्षांनी भारताचाही बांगलादेश होईल, अशी भीती पसरवून दहशत माजवण्याचा प्रयत्न काही टोळक्यांनी चालविला आहे. वेळ गेलेली नाही. प्रत्येक राष्ट्रभक्त नागरिकाने सतर्क होत स्वसंरक्षणासाठी स्वतःला सिद्ध करणे, ही काळाची गरज आहे.

परवा, शुक्रवारी बांगलादेशातील अंतरिम सरकारचे प्रमुख मोहम्मद युनूस यांनी दूरध्वनीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी संपर्क साधला आणि हिंदूंच्या संरक्षणाची हमी दिली. मोहम्मद युनूस हे नोबेल शांतता पुरस्कार विजेते आहेत. त्यांच्याकडून शांतता प्रस्थापित केली जाईल आणि बांगलादेशातील अल्पसंख्य हिंदूंच्या जीविताची तसेच संपत्तीची सुरक्षा केली जाईल, अशी अपेक्षा करणे चुकीचे नाही. बांगलादेशात जो हिंसाचार झाला, त्यात हिंदूंचे जे अतोनात नुकसान झाले, ते तर आता कुणीही भरून देऊ शकणार नाही. पण, या हिंसाचारामागे अमेरिका, चीन आणि पाकिस्तानची चिथावणी असेल तर भारताने अतिदक्ष राहणे आवश्यक ठरते. जगभर भिकेचा कटोरा घेऊन फिरणाऱ्या पाकिस्तानला भारतात शांतता नकोच आहे. शेजारच्या विस्तारवादी चीनला भारताची प्रगती खुपते आहेच, आपल्या वर्चस्वाला धक्का तर लागणार नाही ना ही भीतीसुद्धा सतावते आहे. त्यामुळे चीनकडून सातत्याने भारतात अस्थिरता निर्माण करण्याचाच प्रयत्न केला जात आहे. अमेरिकेला तर आशिया खंडात वर्चस्व हवेच आहे. आपल्या इच्छा पूर्ण न करणाऱ्या देशांना त्रास देण्याचे आणि मनमानी करण्याचे अमेरिकेचे धोरण जुनेच आहे. एकीकडे मानवाधिकार संरक्षणाच्या बाता मारायच्या आणि दुसरीकडे स्वतःच्या संकुचित स्वार्थासाठी मानवाधिकाराचे हनन करायचे, ही अमेरिकेची दुटप्पी भूमिका ओळखून भारत सरकारने अतिसतर्कता बाळगत आपल्या परराष्ट्र धोरणात बदल करणे क्रमप्राप्त ठरते.

बांगलादेशी हिंदू सर्वांत दुर्दैवी आहेत. बांगलादेशाची निर्मिती १९७१ साली झाली त्यावेळीसुद्धा जो प्रचंड हिंसाचार झाला त्यात २० लाखांपेक्षा जास्त हिंदू मारले गेले होते. १९८९ आणि १९९३ साली झालेल्या नरसंहाराचा मोठा फटका बांगलादेशी हिंदूंनाच बसला होता, हे कसे विसरता येईल? आज पुन्हा २०२४ साली झालेल्या हिंसाचारात हिंदूच होरपळून निघाला आहे, निघत आहे. त्यामुळे बांगलादेशी हिंदू कसा दुर्दैवी आहे, हे स्पष्ट होते. भारत हा हिंदू बहुसंख्य असलेला शेजारी देश असूनही बांगलादेश आणि पाकिस्तानातील हिंदूंवर होणारे अत्याचार रोखू शकत नाही, हीसुद्धा शोकांतिकाच आहे. हिंदुहितावर हातोडा मारला जात असताना स्वतःला बुद्धिजीवी समजणारे, पुरोगामित्वाचा ढोल बडविणारे, मानवाधिकाराचे धडे देणारे लोक सध्या कुठे गायब झाले आहेत, हे कळायला मार्ग नाही. राजकारणात शुचिता असली पाहिजे, जातिपातीवरून कुणावर अन्याय व्हायला नको, राजकारणात धर्माला स्थान नाही, असा ढोल बडविणारे तमाम राजकीय नेते बांगलादेशातील हिंदूंवरील अत्याचार मुकाटपणे का पाहात आहेत? एरवी आपल्या शरद पवारांच्या कन्या सुप्रिया सुळे मोदी सरकारला आणि राज्यातल्या फडणवीसांना जाब विचारताना मागेपुढे पाहात नाहीत. पण, आता बांगलादेशात राहणाऱ्या आपल्या हिंदू बांधवांवर अत्याचार होत असताना त्याचा साधा निषेध करणारे वक्तव्यही त्यांच्याकडून आले नाही. जमावाकडून होणारी मारहाण निषिद्धच. भारतात मॉब लिंचिंगची अर्थात जमावाकडून मारहाणीची घटना घडते तेव्हा ती संघाशी संबंधित संघटना वा भाजपा समर्थकांकडूनच केली जाते, अशी आवई उठवत उजव्या म्हणून हिणवल्या जाणाऱ्या संघ-भाजपाला धारेवर धरण्यात कोणतीही कसर न सोडणारे कथित बुद्धिजीवी आणि स्वयंघोषित पुरोगामी सध्या शांत का आहेत, हे त्यांनी पुढे येऊन स्पष्ट केले पाहिजे. भाजपाशासित राज्यांत




घडणाऱ्या एखाद्या घटनेविरुद्ध जेवढ्या ताकदीने ही मंडळी आवाज उठवितात, तेवढ्याच किंवा त्यापेक्षा जास्त मजबुतीने बांगलादेशात घडत असलेल्या मानवतेला काळिमा फासणाऱ्या हिंसाचाराविरुद्ध ओरड करताना का दिसत नाहीत? बांगलादेशात मरणारे हिंदू माणसं नाहीत की हिंदुहिताशी यांना काहीच देणेघेणे नाही?

ब्रिटिशांनी सत्ता सोडताना भारताचे विभाजन केले. भारताचे दोन तुकडे झाले. पाकिस्तान नावाचा नवा देश अस्तित्वात आला. विभाजनाच्यावेळी पाकिस्तानातील हिंदूंवर प्रचंड अत्याचार झालेत. तिथल्या दमनकारी शासनकर्त्यांनी हिंदूंना अक्षरशः चिरडून टाकले. कालांतराने बांगलादेशाची निर्मिती झाली त्यावेळी अशी आशा निर्माण झाली होती की आता तरी हिंदूंना सुरक्षित जीवन जगता येईल. पण, काळाच्या ओघात ही आशाही मावळली. जे हिंदू बांगलादेश सोडून गेलेत अथवा बांगलादेशच्या सरकारने ज्या हिंदूंना शत्रू घोषित केले, अशा हिंदूंची संपत्ती जप्त करण्याचा अधिकार असलेला कायदा १९७४ साली तेथील सरकारने केला आणि हिंदूंची जप्त केलेली संपत्ती मुस्लिमांना वाटण्याचा सपाटा लावला. या कायद्याचा गैरवापरही मोठ्या प्रमाणात झाला. हिंदू व्यक्तीला वा कुटुंबाला मारहाण करायची, त्याला जबरदस्तीने पळवून लावायचे, शत्रू ठरवायचे अन् त्याची संपत्ती जप्त करून ती मुस्लिमांना देऊन टाकायची, असले गैरप्रकार वाढीस लागले अन् हिंदूंमध्ये प्रचंड दहशत पसरली. 'ए क्वाएट केस ऑफ एथनिक क्लिंजिंग : द मर्डर ऑफ बांगलादेश हिंदूज' असे शीर्षक असलेले एक पुस्तक अमेरिकी विचारवंत डॉ. रिचर्ड बेंकिन यांनी लिहिले आहे. बांगलादेशात जाऊन, अभ्यास करून त्यांनी हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकातील तपशील वाचणारा भारतीय हिंदू विचलित होऊ शकतो, चिंतित होऊ शकतो, निराशही होऊ शकतो. कारण, बांगलादेशी जिहाद्यांनी, कट्टरपंथीयांनी तेथील हिंदूंवर अनन्वित अत्याचार केले आहेत. हे पुस्तक लिहिण्यापूर्वी दहा वर्षे त्यांनी बांगलादेशात जाऊन हिंदूंसाठी संघर्ष केला. प्रसंगी त्यांच्या जीविताला धोकाही निर्माण झाला. मात्र, त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत. ते दटून राहिले. हिंदुहितासाठी झगडत राहिले. एक अमेरिकी विचारवंत बांगलादेशात जाऊन हिंदूंवरील अन्यायाचा अभ्यास करतो, बांगलादेश सरकार आणि अमेरिकी संसदेलाही ही बाब लक्षात आणून देतो आणि इकडे स्वतःला बुद्धिजीवी मानणारा भारतातील ढोंग्यांचा वर्ग गपगुमान डोळे मिटून बसतो, याला काय म्हणायचे?

तिथला हिंदू सुरक्षित राहिला पाहिजे, त्याला संरक्षण मिळाले पाहिजे, त्याच्या हिताआड कुणी येऊ नये यासाठी या अमेरिकन विचारवंताने संघर्ष करावा आणि आपल्या भारतातील पवार, उद्धव ठाकरेंसारख्या नेत्यांनी तिथल्या हिंदूंवरील अत्याचाराची साधी दखलही घेऊ नये, याचे आश्चर्यही आता वाटेनासे झाले आहे. कारण, गठ्ठा मतांसाठी हे नेते किती लाचार झाले आहेत, याची अनुभूती भारतीयांनी वेळोवेळी घेतली आहे. मोदी, संघ यांच्यापैकी कुणी बांगलादेशी वा पाकिस्तानी हिंदूंच्या हितासाठी पुढाकार घेतला तर त्यांना सांप्रदायिक ठरविले जाते, इस्लामिक देशात छळ सहन करणाऱ्या अल्पसंख्य हिंदूंना, शीख बांधवांना, बौद्ध बांधवांना भारतात आश्रयासह नागरिकत्व देण्यासाठी कायदा केला तर जातीयवादी ठरविले जाते, ही भारतीय लोकशाहीची, मानवतेची विडंबनाच म्हटली पाहिजे. शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे हे हिंदुत्वाचे प्रखर पुरस्कर्ते होते. पण, त्यांचे सुपुत्र उद्धव ठाकरे हे आज काय करताहेत, कसे कुर्निसात घालताहेत, हे संपूर्ण देश पाहतो आहे. आमचे हिंदुत्व असे नाही, तसे नाही म्हणत गरीब ब्राह्मणांची टिंगलटवाळी करणाऱ्या उद्धव ठाकरे यांनी हिंमत असेल तर बांगलादेशातील हिंदूंच्या हक्कांसाठी लढा देऊनच दाखवावा आणि आजन्म जहाल हिंदुत्ववादी राहिलेल्या आपल्या पित्याचे ऋण फेडावे.

एक काळ होता की बांगलादेशात मोठ्या संख्येत हिंदू राहात होते. हिंदूंची संख्या लक्षणीय होती. पण, हळूहळू करत पद्धतशीरपणे हिंदूंची संख्या कमी करण्यात आली. पळवून लावण्यात आले, कत्तली करण्यात आल्या. आता ताज्या हिंसाचारामुळे तर तिथल्या हिंदूंच्या अस्तित्वावरच प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. जेवढ्या संख्येत बांगलादेश आणि पाकिस्तानातील हिंदू मारले गेले आहेत, तेवढ्या संख्येत तर जगातल्या कुठल्याही देशात अन्य धर्मीय लोक मारले गेले नाहीत. हुकूमशहा हिटलरने ६० लाख ज्यू नागरिकांना ठार मारले होते, हे संपूर्ण जगाला माहिती आहे. मात्र, पूर्व पाकिस्तान म्हणा वा बांगलादेश, १९५१ ते २००८ या कालावधीत पाच कोटींपेक्षा जास्त हिंदू मारले गेले आहेत, याबाबत कुणीही काहीही बोलायला तयार नाही. भारतात एखाद्या अहिंदूची अन्य कुठल्या कारणाने हत्या झाली तरी हिंदुत्ववाद्यांना फासावर लटकवण्याची मागणी जोर धरू लागते. मात्र, बांगलादेशात ठरवून हिंदूंची जनावरांपेक्षाही भयानक पद्धतीने कत्तल केली जाते, त्याविरुद्ध स्वयंघोषित बुद्धिजीवी, पुरोगामी काहीच बोलत नाहीत. त्यामुळे हे षंढ आहेत, ढोंगी आहेत, डरपोक आहेत की आणखी कोण आहेत, हे ओळखून यांच्याशी व्यवहार करण्याची वेळ आली आहे. राष्ट्रभक्त नागरिकांनी हे ढोंग ओळखून यांना आताच धडा शिकवला नाही तर उद्या बांगलादेशातील हिंदूंसारखीच आपलीही स्थिती होईल, हे आताच लक्षात घेतले पाहिजे.

बांगलादेश सरकारने १९८८ साली इस्लामला राजकीय धर्म म्हणून दर्जा दिला अन् तिथूनच हिंदूंच्या हालअपेष्टांना सुरुवात झाली. हिंदूंची अवस्था दयनीय होत गेली. हिंदूंवर अन्याय सुरू झाला. त्यांच्यावर अत्याचार होऊ लागले. हिंदू महिलांची अब्रू लुटली जाऊ लागली. संपत्तीवर तिथल्या मुस्लिमांनी जबरदस्तीने ताबा मिळवण्यास प्रारंभ केला. जबरदस्तीने धर्मांतरणही होऊ लागले. हिंदू मुली आणि महिलांना लक्ष्य बनवून, त्यांना भीती दाखवून हिंदूंची संपत्ती लुटणे, त्यांचे धर्मांतरण घडवून आणणे ही सामान्य बाब झाली. बांगलादेशी लेखिका तस्लिमा नसरीन यांनी 'लज्जा' नावाची कादंबरी लिहिल्याचे आपल्या सर्वांनाच ठावूक आहे. या कादंबरीत त्यांनी हिंदूंवर होत असलेल्या अत्याचाराचे सत्यचित्रण केले आहे. त्यामुळे या पुस्तकाच्या प्रकाशनानंतर कट्टरपंथीयांनी त्यांच्या हत्येचा फतवाही जारी केला होता, हेही आपल्याला स्मरत असेल. भारत सरकारने त्यांना आश्रय दिला, हेही सगळ्यांना माहिती आहे. एक मुस्लिम महिला असूनही जर तस्लिमांचे हे हाल झाले, तर हिंदू मुली आणि महिलांनी काय काय सहन केले असेल याची कल्पनाही न केलेली बरी!

बांगलादेशातील घटनांबाबत शरद पवार, उद्धव ठाकरे, अखिलेश यादव, लालूप्रसाद यादव, ममता बॅनर्जी, काँग्रेसचे देशभरातील तमाम हिंदू नेते काही भाष्य करून हिंदूंना न्याय मिळवून देण्याची भाषा बोलतील, याची कोणतीही आशा उरलेली नाही. असे असले तरी भारतातल्या हिंदू बांधवांनी हा मुद्दा उचलून धरत बांगलादेश आणि अन्य शेजारी देशांवर दबाव आणला पाहिजे. बांगलादेश आणि पाकिस्तानातील ज्या हिंदू बांधवांना भारतात आश्रयास यायचे आहे, त्या सर्वांना सहज प्रवेश करता येईल, यासाठी ज्या ज्या प्रकारे दबावतंत्र वापरायची आवश्यकता आहे, ते वापरले पाहिजे. आज देशात हिंदू बहुसंख्य आहेत आणि असे असतानाही अल्पसंख्यक सुरक्षित आहेत. अल्पसंख्यक असलेल्यांनीही बांगलादेशातील हिंदू बांधवांवर होत असलेल्या अन्यायाविरुद्ध आवाज उठवायला काय हरकत आहे? एरवी कॅण्डल मार्च काढणारे आज हिंदूंच्या सामूहिक हत्याकांडाविरुद्ध साधा ब्र काढायला तयार नाहीत, हे काय दर्शविते? ▮

## रविवारची पत्रे

### वाहन चालकांनो, घाई नको!

वाहन चालकांसाठी खूशखबर! आता वाहन चालवताना घाई करण्याचं कारण नाही. कारण हळूहळू दिवस मोठा होत आहे! अहो, चक्क दिवसाचे तास जे २४ आहेत, तेच वाढत आहेत! खरं वाटत नाही? मग ही बातमी वाचा. नुकत्याच प्रकाशित एका बातमीनुसार, विस्कॉन्सिन विश्वविद्यालयातील संशोधनात असे आढळून आले की, चंद्र हळूहळू पृथ्वीपासून दूर जात आहे. याचा पृथ्वीच्या स्वतःभोवती फिरण्याच्या चक्राकार गतीवर परिणाम होतो. तो असा की दिवस हळूहळू मोठा होत आहे. म्हणजे काही काळानंतर २५ तासांचा दिवस असू शकतो! म्हणजे रोज १ तासाचा बोनस सर्वांना मिळेल. मग वाहन चालवताना घाई कशाला? आज आपण पाहतो की प्रत्येकाला कुठे न कुठे जायची घाई झालेली असते. कुणाला ऑफिसची, कुणाला घरी जायची, कुणाला कॉलेजमध्ये जायची, कुणाला भेटायची, कुणाला समोरच्या वाहनाला ओव्हरटेक करायची तर कुणाला नुसतीच घाई. मग कुणी वेगाने वाहन चालवतो तर कुणी सिग्नल लाल असला, तरीही गाडी थांबवत नाही, कुणी चुकीच्या पद्धतीने ओव्हरटेक करतो, मोठा यू टर्न वाचावा म्हणून चुकीच्या बाजूने गाडी चालवतो किंवा वाहनात क्षमतेपेक्षा अधिक प्रवासी बसवणे आदी प्रकार घडतात. पण वरील संशोधनाप्रमाणे आता जास्त वेळ मिळाल्याने घाई करण्याची काय गरज? रोज अधिक काळाचा बोनस मिळत आहे. तात्पर्य असे, वाहन चालकांनी वाहन चालवताना घाई करू नये. कारण 'अती घाई संकटात नेई.' आज आपल्या देशात रस्त्यावरील अपघातांमुळे होणाऱ्या मृत्यूंची संख्या जगात सर्वाधिक आहे. सडक परिवहन व राजमार्ग मंत्रालयाच्या २०२२ सालाच्या अहवालानुसार आपल्या देशात दिवसागणीक अपघात होतात, म्हणजे तासाला १९. त्यातील ७१.४ टक्के अपघात हे अतिवेगाने वाहन चालविण्याने होतात. नागपुरातील एनजीओ 'जनआक्रोश - फॉर बेटर टुमोरो' नामक संस्था आपल्या देशभरातील अनेक शहरातील शाखांसह रस्त्यांवरील अपघात कमी व्हावेत यासाठी जनप्रबोधन करीत आहे. या जनसेवेच्या कार्याला नागरिकांचा सहभाग लाभला तर लवकरच रस्ते अपघातांची मालिका खंडेल व नाहक होणारे बळी थांबून सुखी आणि प्रगतिशील जीवनाचा रस्ता मोकळा होईल.

**श्याम भालेराव**/नागपूर

●● ●●

### खटाखट नकोच!

फुकट वीज, फुकट पाणी, फुकट लॅपटॉप, फुकट मोबाईल फोन, दरमहा खटाखट साडेआठ हजार वगैरे वगैरे...! या सगळ्याचा संदर्भ काय आहे ते वेगळे सांगायची आवश्यकताच नाही. अनेक राज्यांत माफक प्रमाणात कल्याणकारी योजना कित्येक वर्षांपासून अस्तित्वात होत्या. निवडणूक जिंकण्यासाठीचे मुख्य साधन म्हणून त्यांचा सर्रास वापर करण्याची प्रथा गेल्या काही वर्षांपासून सुरू झाली आहे व ते अत्यंत घातक आहे. कल्याणकारी योजना जेव्हा निवडणूक डोळ्यांसमोर ठेवून ठरवली जाते, तेव्हा तिचे विकृतीकरण होते व पैसा अयोग्यरीतीने वापरला जातो. मतं विकत घेण्याची ती एक पळवाट होते. सर्वोच्च न्यायालयाने यात लक्ष घालून एक चौकट ठरवून द्यायला पाहिजे, असे मला वाटते. कुठलीही योजना काटेकोरपणे या चौकटीत बसत असल्याशिवाय ती घोषित वा कार्यान्वित करण्यास परवानगी नसावी. ही चौकट कशी ठरवणार? यासाठी दोन गोष्टींचा प्रामुख्याने विचार व्हायला हवा. नागरिकांच्या किमान गरजा, ज्यांची पूर्तता अजून समाधानकारक नाही व सरकारांची आर्थिक क्षमता. या दोन्ही गोष्टींची सांगड घालण्याची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत नागरिकांच्या जीवनाचा किमान दर्जा किती असावा व त्यापेक्षा खालच्या पातळीवर किती लोक आहेत? त्यांचे राहणीमान सुधारण्यासाठी कोणत्या स्वरूपात उपाययोजना करायला हवी? देशभरात लागू करण्यासाठी ही किमान पातळी ठरविण्यात यावी. जोपर्यंत ही पातळी गाठली जात नाही तोपर्यंत इतर बाबींना प्राधान्य देऊन असंतुलित प्रगती करण्याने समाजात असंतोष पसरतो. त्यामुळे समाजकल्याण योजनांची अधिकतम व्याप्ती नीट ठरवण्याची गरज आहे. त्यासाठी एक आयोग नेमण्याची आवश्यकता आहे. आखून दिलेल्या लक्ष्मणरेषेच्या पुढे जाऊन योजना कार्यान्वित करण्याची क्षमता असल्याचा दावा एखाद्या सरकारचा असेल, तर त्या योजनेवर प्रस्तावित खर्चाइतकाच आर्थिक फायदा करदात्यांना मिळायला हवा व त्यासाठी कर त्या प्रमाणात कमी करणे अनिवार्य असावे. अजूनही कित्येक गावांत पाण्यासाठी लोकांना विशेषतः महिलांना दूरपर्यंत पायपीट करावी लागते. शाळांची अवस्था दयनीय असते. वैद्यकीय सुविधा उपलब्ध नसतात. आधी या गोष्टींना प्राधान्य देण्याची आवश्यकता आहे की, ज्यांच्या घरात नळ, वीज उपलब्ध झालेली आहे त्यांनाच ती फुकट देण्याची? आज शेतात काम करायला चांगली मजुरी देऊ केल्यावरही मजूर मिळत नाहीत. त्याअर्थी त्या मजुरीच्या पैशांपेक्षा इतर मार्गांनी त्यांचे राहणीमान अधिक चांगले असेल असे दिसते. तरीही या वर्गाला डोळ्यांसमोर ठेवून दरमहा साडेआठ हजार रुपये देण्याची घोषणा करण्याइतका आपला देश श्रीमंत झाला आहे का?

**रवींद्र पंडित**/८४२४९८४३५०

●● ●●

### ध्वनिप्रदूषण आणि शांती

सकाळचा प्रसन्न प्रहर. हिवाळ्यात सकाळी ६ वाजताही गुडूप अंधार असतो. कधी काळी सकाळ 'गोड नामी तुझ्या रंगते' या रेडिओच्या स्वरांनी आणखी गोड होत असे. झुंजूमुंजू होत असतानाच पहाट पक्ष्यांचे कूंजन ऐकू येते. रोजच्या सवयीप्रमाणे पक्षी कंपाऊंड वॉलवर दाणे टिपायला आणि पाणी प्यायला येतात. इथपर्यंत सकाळ छान प्रसन्न असते. जसजसे उजाडू लागते तसतसे विविध आवाज आपल्या कानांचा कब्जा घेतात. सगळ्यात आधी तर कुणाचा न कुणाचा मोबाईल नामक अती महत्त्वाचा आवाज खणखणतो. नीरव शांततेत तो कर्णकर्कश आवाज शांती भेदून टाकतो. दूधवाला, पेपरवाला, असंख्य दुचाकी-चारचाक्यांची वर्दळ, कुठे इडलीवाला, भाजीवाल्यांच्या आरोळ्या, मध्येच कचरेवाल्याची शिट्टी. आमच्या घरी पोळ्या करायला सकाळी एक आचारी यायचे. त्यांचा फोन वाजल्यावर सगळ्यांची झोप मोडायची. कारण त्यांचे मोठमोठ्याने किमान दहा मिनिट भोजपुरी बोलणे... 'का हुवा, हमका क्यूँ बताये नाही' वगैरे... ऐकून थोडा वेळ करमणूक व्हायची, पण काही वेळाने कान बंद करण्याची वेळ यायची. सकाळी स्वयंपाकाची घाई असतानाच इस्त्रीवाला जोरात बेल दाबतो. कुकरच्या खणखणीत शिट्ट्या होत असतात; तेव्हाच भांडेवाली बाई भांडी घासत आवाज करीत असते. नळाला पण तेव्हाच मोठी धार असते. त्यामुळे ड्रममध्ये संततधार सुरू असते. कधी दहीवाली हक्काने येऊन गळी पडते. कुठे दूरवर मोठ्याने एखाद्या ट्रकच्या हॉर्नचा आवाज कानावर आदळतो. यात सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे टीव्ही... तो तर सगळ्यांच्या तना-मनाचा ताबा घेऊन सगळ्यांना बहिरं करून टाकतो. हळूहळू दुपार होते तसे सगळे आवाज विरत जातात. आता हक्काची शांती मिळणार असे वाटत असताना फाटकात सेल्स गर्ल उभी राहते आणि प्रॉडक्ट विकत घेण्यास प्रवृत्त करते. ते काही नाही, आज शांतता मिळायलाच हवी या उद्देशाने मी फोन सायलेंट मोडवर केला. दुपारची नीरव शांतता... डोळे सतत मोबाईलकडेच वळत होते. जरा कसला आवाज नव्हता; पण बाहेरची शांतता अस्वस्थ करीत होती. अशांत करत होती. नाईलाजाने टीव्ही लावला... त्यातल्या पात्रांची सोबत वाटली. बाहेरही रोजचे गाड्यांचे ओळखीचे आवाज आपले वाटले. सगळे आवाज एकमेकांत मिसळले आणि लक्षात आले... बाहेरच्या आवाजांना गृहीत धरूनही आतल्या मनाला शांत करणं आपणच साधायचं असतं. कारण कान कधीच थकत नाहीत...!

**स्नेहल खंडागळे**/९९७०१३७९७७

●● ●●

### रक्षाबंधन : एक सुरक्षा कवच



'रक्षाबंधन' या दिवसाला भावनिक महत्त्व प्राप्त झाले असून या दिवसाला जशी धार्मिक पृष्ठभूमी आहे तसेच ऐतिहासिक घटनांनीसुद्धा हे बंधन किती आवश्यक आहे, महत्त्वाचे आहे हे दाखवून दिले आहे. रक्षाबंधन हे सर्वांसाठीच सुरक्षिततेचे स्मारक आहे. आज समाजातील प्रत्येकालाच सामाजिक सुरक्षिततेची गरज आहे. आपल्यापासून कोणालाच म्हणजे अगदी आपल्याच घरापासून सुरुवात करून ते अगदी राष्ट्रीय स्तरावर नकळतपणे का होईना, धोका निर्माण होऊ नये, आपल्यामुळे कोणीही अडचणीत येऊ नये यासाठी रक्षाबंधनाची फार गरज आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी राखी बांधताना प्रत्येकाने म्हणावे...

*येन बद्धो बली । राजा दानवेन्द्रो महाबल:*
*तेन त्वामनुबध्नामि । रक्षे मा चल मा चल।।*

अर्थात, दानवांचा राजा बली यांच्या हातात दैत्यगुरू शुक्राचार्य यांनी जशी रक्षा (राखी) बांधली होती तशीच ही राखी मी तुझ्या हाताला बांधत आहे.

हे बंधन आहे आपल्या ध्येयापासून दूर न जाण्याचे. हे बंधनच आपण ठरवलेल्या ध्येयाच्या दिशेने वाटचाल करण्याची आठवण करून देते. राखी बांधताना बहीण भावाचे बंधन किंवा ध्येयाचे रक्षण करण्याची सूचना करते. रक्षाबंधन हा सण कौटुंबिक सण म्हणून ओळखला जातो. हा सण बहीण-भावाच्या प्रेमाचे, सुरक्षिततेचे प्रतीक आहे. मात्र, या दिवशी एखादा मनुष्य जर दुसऱ्या मनुष्याला रक्षाबंधनाच्या निमित्ताने राखी बांधत असेल तर इतर काही आश्चर्याने, कुतूहलाने पाहतात. माझ्या मते अशा सुंदर प्रेम आणि भावबंधनाच्या सणाला फक्त कुटुंबापुरतेच मर्यादित ठेवणे योग्य नाही. कुटुंबातील भावाकडे बहिणीची दृष्टी निर्मळ आणि प्रेमपूर्वक राहील. परंतु, आज समाजात परस्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची आवश्यकता आहे. रक्षाबंधनामुळे एखाद्या स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलतो. रक्षाबंधनामुळे एका व्यक्तीला दुसऱ्या व्यक्तीच्या रक्षणाची जबाबदारी येते. हे प्रत्येक पुरुषाला आणि महिलांना लागू पडते. जसा रक्षाबंधन म्हणजे भाऊ आणि बहीण यांच्यातील परस्पर प्रेरक, पोषक आणि पूरक संदेश देणारा सण आहे, तसाच हा भारतीय संस्कृतीची जपवणूक करणारा उत्सव आहे. ही एक समाजासाठी अमूल्य देण आहे. या रक्षाबंधनाच्या दिवशी बहिणीने भावाच्या हातावर राखी बांधायची असते आणि त्यामागे भावाचा उत्कर्ष व्हावा आणि भावाने बहिणीचे संरक्षण करावे हे अपेक्षित आहे; नव्हे तर हीच भूमिका असते. एखाद्या तरुणाने वा पुरुषाने एखाद्या दुसऱ्या तरुणाला वा पुरुषाला राखी बांधणे तसेच एखाद्या तरुणीने वा स्त्रीने स्त्रीकडूनच राखी बांधून घेणे हे बहिणीने भावाला राखी बांधण्याहून जास्त श्रेष्ठ राहील, असे वाटते. त्यामुळे त्यांचा एकमेकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्याची शक्यता जास्त वाढेल, भाव पलटू शकतो. भावा-बहिणीच्या नात्याला अजून घट्ट करणारा हा दिवस. समाजात अशा अनेक अशा व्यक्ती (ज्यामध्ये पुरुष-महिलांचा समावेश आहे) आहेत की, त्यांना खरोखरच मदतीची गरज आहे. रक्षाबंधनाच्या दिवशी त्यांना फूल ना फुलाची पाकळी म्हणून ज्याला जसे जमेल तन-मन-धनाने मदत करण्याचा संकल्प करू या अन् त्यांच्याही जीवनात आनंद फुलवू या!

**रवींद्र गोविंद पांडे**/९३२५४५७०५२

●● ●●

### सिमेंट रस्त्यांना हेतुपूर्वक विरोध?

सध्या नागपुरात ठरवून केल्यासारखा काही गोष्टींना विरोध सुरू आहे. शहरातील विकासकामांवर आक्षेप घेण्यासाठी, विरोध करण्यासाठी मोर्चा काढल्याची बातमी फोटोसह एका नामवंत वर्तमानपत्रात आली आहे. 'ग्रीन नागपूर ग्रुप' असे नाव असलेली कधीच कुठे न ऐकलेली संघटना आहे म्हणे! या लोकांचा विरोध मुख्यतः सिमेंटच्या रस्त्यांना आहे. झाडे पाडू नका, ड्रेनेजची व्यवस्था करा वगैरे मागण्या नक्कीच विचार करण्यायोग्य आहेत. पण मुख्य मागणी सिमेंट रस्ते नकोत, हीच आहे. का नको तर त्यामुळे पाण्याचा निचरा होत नाही, रस्त्यांची उंची जास्त असल्यामुळे घरात पाणी शिरते, पर्यावरणासाठी घातक आहेत, नागपूरच्या जमिनीच्या दृष्टीने विचार करता त्याची आवश्यकता नाही, महाग आहे. तिप्पट महाग आहे, असे एका तज्ज्ञाचे मत आहे. माझ्या मते दरवर्षी डांबरी रस्ते दुरुस्त करायला जो खर्च येतो, त्यामानाने हे फारच स्वस्त आहे. काही वर्षांपूर्वी बांधलेल्या रस्त्यांचा अनुभव सर्वांनाच आहे. सिमेंट पर्यावरणासाठी घातक आहे तर त्याच्या वापरावर पूर्णपणे बंदी असावी. डांबरी रस्त्यांची वर्ष-दोन वर्षात काय अवस्था होते ते सर्वांना माहिती आहे. खड्डेयुक्त डांबरी रस्त्यांमुळे मुख्यतः मानेचे आणि पाठीचे आजार होतात, हे ठावूक आहे का? विकास कामे करताना तज्ज्ञता थोडी कमी असली तरी चालेल, पण शहाणपणा असावा. सिमेंट रस्त्यांना आंधळा किंवा हेतुपूर्वक विरोध करण्यापेक्षा विकासकामे योग्य पद्धतीने कशी होतील, यासाठी काही करता येईल का ते बघावे. अमरावती मार्गावर एक उड्डाणपूल बांधला आहे. रविनगरकडून येऊन तो विद्यापीठ परिसराच्या टेकडीच्या उंचीचा वापर करून संपतो. हे करताना खालच्या रस्त्याची काय अवस्था झाली आहे, त्याचा विचार केला असता तर नक्की झाला असता. केवळ एक वाहन जाईल एवढीच रुंदी तेथे उरली आहे, एक वाहन बंद पडले तर पूर्ण रस्ता बंद पडेल याचा विचारच कोणी केला नाही. आता तो रस्ता रुंद करतो म्हटले तर टेकडी कापावी लागेल, असे करायचे तर वरच्या इमारतींचे काय? अजनीकडून मध्यवर्ती कारागृहाच्या मधून एक रस्ता काढला आहे. तो दीक्षाभूमीकडून येणाऱ्या रस्त्यासमोर आणला असता तर वाहतुकीला जास्त सोयीचे झाले नसते का? आशिया खंडातील सर्वात लांब दुमजली उड्डाणपुलाचा एक फाटा मनीषनगरकडे गेला आहे. तो थोडासा रुंद केला असता तर न पाळला जाणारा ओव्हरटेकिंगचा नियम टाळता आला असता आणि दुचाकी वाहनांना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागला नसता. हा फाटा आणि मुख्य उड्डाणपूल यांच्या तोंडावर चुकीचे बांधकाम केले आहे ते ग्रीन ग्रुपच्या तज्ज्ञांना कधी दिसले आहे का? अभ्यंकरनगर, प्रतापनगर आणि इतरत्रही अतिशय मोठ्या प्रमाणात रहिवासी भागांचे व्यावसायिकरण सुरू आहे. त्याठिकाणी होणारी गर्दी, वाहनांची कोंडी, पार्किंगची समस्या यासाठी काही करता आले तर ते करावे. विवेकानंद स्मारकाला असाच आंधळा विरोध सुरू आहे. चांगले रस्ते आम्हालाही हवे आहेत. चांगल्यासाठी होत असलेला विकास आम्हाला हवा आहे.

**शशांक कुळकर्णी**/९४२३६८५५९२

●● ●●

### आईसाठी काय?

महाराष्ट्र व केंद्र सरकारने लोकांच्या सोयीसाठी वेगवेगळ्या मोफत योजना सुरू केल्या आहेत. भ्रूणहत्येचे वाढते प्रमाण बघून मुलगी जन्माला येताच तिच्या खात्यांत सरकार काही रक्कम जमा करते. मुलींना शिक्षण मोफत, कन्यादान योजना, ६५ वयापर्यंत लाडकी बहीण योजना, लाडका भाऊ योजना, गरिबांना तीन सिलेंडर मोफत, शेतकऱ्यांना कर्जमाफी आदी विविध योजनांची लयलूट सुरू आहे. परंतु ज्यांना तुम्ही राष्ट्रीय संपत्ती, समाजाचे मार्गदर्शक म्हणता, त्या ७० वर्षे वयाच्या लोकांसाठी काय? आयुमर्यादा वाढली आहे म्हणून त्यांना बेवारस करायचे काय? ज्यांना पेन्शन नाही, आर्थिक परिस्थिती अत्यंत वाईट आहे, त्यांना जीवन नकोसे वाटते. ते निरुपयोगी आहेत म्हणून 'गरज सरो वैद्य मरो' असे वागायचे काय? साधारण ७० वर्षांनंतर शरीर म्हणजे रोगांचे माहेरघर! पेन्शन नाही, जवळ पैसा नाही, व्याजाचा दर एकदम कमी त्यामुळे औषधाला पण पैसे नाहीत. काही मुलांचे उत्पन्न कमी असल्यामुळे संसारात ज्येष्ठांच्या औषधासाठी पैसा उरत नाही. काहींची इच्छा नसते. काहींची मुले परदेशात-देशात असून भरपूर उत्पन्न असून आई-वडिलांची आठवण त्यांना येत नाही. हीच माता! तुम्हाला हाताचा पाळणा केला, स्वतः उपाशी राहून तुम्हाला जेवायला दिले, प्रसंगी स्वतःचे स्त्री धन विकून तुम्हाला शिकविले. तीच आई औषधाविना मरणयातना भोगत आहे. म्हणून मायबाप सरकार आम्हाला कृपया औषधे काही प्रमाणात मोफत द्या. आम्हाला पैसे नको; औषधे, सॅनिटरी पॅड अल्प दरात मिळवून द्यावे. ज्यांना उत्पन्नच नाही त्यांना मोफत द्या. आज आम्ही औषधाअभावी अंथरुणात खितपत पडून आहोत. घरातील लोक आम्हाला कंटाळले आहेत. आम्हाला मानाचा नमस्कार नको. औषधाचा, प्रेमाचा, शब्दाचा आधार हवा.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

### अनावश्यक एक्स-रेंना आवरा

महाराष्ट्रातील सर्व शासकीय रुग्णालयात अलिकडे रुग्णांच्या आरोग्यविषयक चाचण्यात क्ष-किरण चाचण्यांचे (एक्स-रे, सीटी स्कॅन) प्रमाण वाढलेले दिसत आहे. खाजगी रुग्णालयात या चाचण्या करीत असताना यामागे अर्थकारण दडलेले असते. सर्वच शासकीय रुग्णालयात ही सुविधा मोफत झाली असल्याने किंवा अल्पदरात असल्याने बऱ्याचदा रुग्णांच्या मागणीनुसार एक्स-रे, सिटी स्कॅन करण्याचा धडाका सुरू असल्याचे या क्षेत्रात प्रत्यक्ष काम करताना आढळून येत आहे. क्ष-किरण म्हणजेच विकिरणाचा (रेडिएशन) धोका खूप गंभीर असतो. जो विकिरणांच्या सतत संपर्कात येईल त्यास कॅन्सर व इतर आजारासारख्या गंभीर आजारास बळी पडावे लागते. वाढत्या अनावश्यक एक्स-रे व सीटी चाचण्यांचा सर्वाधिक फटका रुग्णांना कमी आणि या क्षेत्रात काम करणारे क्ष-किरण तंत्रज्ञ, सिटी स्कॅन तंत्रज्ञ व इतर सहकाऱ्यांना होताना दिसतो. गरज असेल तरच एक्स-रे, सीटी चाचण्या केल्या तर अनावश्यक विकिरणाचा धोका टळू शकतो. महिन्याकाठी एखाद्या शासकीय रुग्णालयात हजार-दहा हजारांच्या वर एक्स-रे, सीटी स्कॅन होत असतील तेथे यातील बहुतांश चाचण्या नॉर्मल स्वरूपाच्या असतात. यातील ७० टक्के चाचण्या रुग्णाचे समाधान म्हणून केल्या जातात. यावरूनच वैद्यकीय क्षेत्रात किती गोंधळात गोंधळ सुरू असल्याचे दिसून येते. हा विषय भविष्यात रेडिएशनमुळे जीवघेणा गंभीर प्रश्न निर्माण करणारा असल्याने आताच अनावश्यक एक्स-रे, सिटी स्कॅन चाचण्यांना आवर घालण्यासाठी नियोजन आणि जाणीवपूर्वक प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे वाटते. ▮

**बाळासाहेब जोगदंड**/९४२३०५१२४६

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल अॅड्रेस
tbedit2016@gmail.com

# पॅरिसमध्ये स्वप्नभंग झाल्यानंतर विनेशचे विजेत्यासारखे जंगी स्वागत

◆ **नवी दिल्ली, १७ ऑगस्ट**

ऑलिम्पिकचे सुवर्णपदक जिंकण्याचे स्वप्न भंग झाल्यानंतर पॅरिसहून शनिवारी मायदेशी परतलेल्या कुस्तीपटू विनेश फोगटचे नवी दिल्लीतील इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळावर शेकडो चाहत्यांनी तिचे जोरदार स्वागत केले व तूच आमची ऑलिम्पिक सुवर्णपदक विजेती आहे, आम्ही तुझ्या पाठीशी असल्याचे दाखवून दिली.

बजरंग पुनिया, साक्षी मलिक, देववर्त कादियान यासारखे स्टार कुस्तीपटू व पंचायत नेत्यांनी विनेशचे फुलांचा व नोटांचा हार घालून तसेच गुलाब पुष्पाच्या पाकळ्या उधळून उत्स्फूर्तपणे स्वागत केले.

पॅरिस ऑलिम्पिकमध्ये महिलांच्या ५० किलो वजनी गटात विनेशने अंतिम फेरीपर्यंत मजल मारली होती, परंतु अंतिम लढतीपूर्वी तिचे वजन १०० ग्रॅमने वाढल्यामुळे तिला अपात्र ठरवण्यात आले व स्पर्धेबाहेर केले. तिने आंतरराष्ट्रीय क्रीडा न्यायालयातही दाद मागितली व अंतिम फेरी गाठल्यामुळे किमान रौप्यपदक द्यावे अशी मागणी केली, परंतु क्रीडा लवादाने तिची याचिका फेटाळून लावली.

**विमातळापासून-बलालीपर्यंत २० ठिकाणी स्वागत**

निराश होऊन मायदेशी परतलेल्या विनेश फोगटचे विमानतळावर हार घालून जोरदार स्वागत करण्यात आले तसेच खुल्या जीपमध्ये उभे राहून तिची मिरवणूक काढण्यात आली.



स्वागतप्रसंगी विनेश फोगट भावुक झाली व तिच्या डोळ्यातून अश्रू निघाले

यावेळी पोलिसांचा कडक बंदोबस्त होता. इंदिरा गांधी आंतरराष्ट्रीय विमानतळापासून ते तिचे पैतृक गाव बलालीपर्यंत तिच्या स्वागताची तयारी करण्यात आली. या दरम्यान विनेशचे सुमारे २० ठिकाणी स्वागत करण्यात आले.

**संपूर्ण देशाचे आभार मानते**

यावेळी विनेश अतिशय भावूक झाली व तिने आपल्या अश्रूंना वाट मोकळी करून दिली. विनेशने सर्व समर्थकांचे आभार मानले. मी संपूर्ण देशाचे आभार मानते, असे ती हात जोडून नम्रतेने म्हणाली.

विनेशने संयुक्त रौप्यपदकासाठी कोर्ट ऑफ आर्बिट्रेशन फॉर स्पोर्टकडे अपील केल्यानंतर तिला पॅरिसमध्येच राहावे लागले. बुधवारी तिची अपील फेटाळण्यात आली.

लंडन ऑलिम्पिक कांस्यपदक विजेता नेमबाज गगन नारंग ह् पॅरिस ऑलिम्पिकसाठी भारतीय पथकाचे चीफ डी मिशन होते. त्यांनीही पॅरिस विमानतळावर विनेशसोबत फोटो काढले. विनेश चॅम्पियन असे लिहित फोटो समाजमाध्यमावर सामायिक केला. हे दोघेही एकाच विमानाने नवी दिल्लीला परतले.

विनेश पॅरिस क्रीडा ग्राममध्ये पहिल्या दिवशी विजेती म्हणून आली होती व ती नेहमीच आमची चॅम्पियन राहील. कधी कधी शंभर कोटी स्वप्ने साकारण्यासाठी ऑलिम्पिक पदकाची गरज नसते. विनेश फोगटने भावी पिढ्यांना प्रेरणा दिली. तुमच्या धैर्याला सलाम, असे नारंग यांनी एक्समधील पोस्टमध्ये म्हटले आहे.

विनेश मायदेशी परतली, तेव्हा तिचे स्वागत करण्यासाठी बलालीहून बरेच लोक दिल्लीच्या विमानतळावर आले. आमच्या गावातही विनेशचे स्वागत करण्यासाठी लोक प्रतीक्षा करत आहेत. लोक विनेशला भेटून तिला प्रोत्साहन देण्यासाठी उत्सुक आहेत, असे विनेशचा भाऊ हरविंदर फोगट म्हणाला.

इसके आगे सब ढेर है, या छोरी बब्बर शेर है, असे समाजमाध्यमात पोस्ट काँग्रेसचे नेते खा. शशी थरूर यांनी विनेशला प्रोत्साहन दिले आहे. ◀(वृत्तसंस्था)



## शालेय स्क्वॅश स्पर्धेत सुमतीबाई स्कूलची कामगिरी

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

येथील इंदिरा गांधी स्टेडियमवर झालेल्या शालेय स्क्वॅश स्पर्धेत येथील पी. एस. इंग्लिश मेडियम टेक्निकल हायस्कूलच्या खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी केली. त्यांना क्रीडाशिक्षक अजित पाटील, रोहन घाडगे व सोमनाथ मगर यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे श्राविका संस्थेचे सचिव हर्षवर्धन शहा, मुख्य कार्यकारी अधिकारी देवई शहा, मुख्याध्यापिका स्वाती कांबळे, पर्यवेक्षक जयेश शिरढोणे यांनी अभिनंदन केले. कामगिरी : १४ वर्षाखालील मुले : समर्थ हरिहर (तृतीय). १७ वर्षाखालील मुले : श्रवण लंबाटे (द्वितीय). मुली : समीक्षा शेटे (द्वितीय). त्रिशा आसापूरे (तृतीय), समृद्धी हरिहर (चतुर्थ). १९ वर्षाखालील मुले : सुजलकुमार चौहान (तृतीय).



## शालेय रोल बॉल स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयास उपविजेतेपद

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शालेय शहर रोल बॉल स्पर्धेत गांधी नाथा रंगजी विद्यालयाने १७ व १९ वर्षाखालील मुलींनी उपविजेतेपद संपादिले. संघास क्रीडाशिक्षक शिवानंद सुतार यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष संजय गांधी, माध्यमिकच्या मुख्याध्यापिका स्मिता पुरवत व प्राथमिकच्या मुख्याध्यापिका सरोजना मुलिंटी यांनी अभिनंदन केले. उपविजेता संघ : १७ वर्षाखालील :- साक्षी जिडगे, जयश्री आळंदकर, हर्षदा अलकुंटे, कावेरी शिंगाडे, वैष्णवी गुजले, नंदिनी दहिहंडे, वैष्णवी ढेंगळे, समृद्धी मुटकुळे, क्षिप्रा तडकासे, समृद्धी ढेरे, समृद्धी जाधव, आदिती जवान. १९ वर्षाखालील : साक्षी नलोगल, सुनयना साखरे, तन्वी शेख, संध्या भागानगरे, संयुक्ता ताटे, प्राची परबळकर, अक्षरा माने, संपदा कोळी, ज्ञानेश्वरी पवार, मुक्ताबाई नंदिमठ, तन्वी शिवशरण सृष्टी कांबळे.



## खो-खो पटू आकाश हजारे यास पोलीस महासंचालक पदक प्राप्त

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

मंगळवेढ्याचा खो-खोपटू आकाश किसनराव हजारे यास त्याच्या उल्लेखनिय कामगिरीबद्दल मुंबई पोलीस आयुक्त विवेक फणसळकर यांच्या हस्ते पोलीस महासंचालक पदक देऊन गौरवण्यात आले. आकाश याने पुणे येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धेत ट्रेनिंग डायरेक्टर या संघाकडून खो खो या खेळात संघास रौप्य पदक मिळवून दिले. त्याच्या या कामगिरीमुळे महाराष्ट्र पोलीस खो खो संघात निवड होऊन लखनऊ येथे झालेल्या आखिल भारतीय क्लस्टर स्पर्धेत महाराष्ट्र पोलीस खो खो संघास त्याने सुवर्ण पदक मिळवून दिले. तसेच नुकतेच नाशिक येथे झालेल्या महाराष्ट्र पोलीस गेम्समध्ये मुंबई पोलीस संघाकडून खेळताना सुवर्ण पदक प्राप्त केले. त्याचा उपमुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## साईश्वर व श्रद्धा बंधु भगिनी हाती तिरंगा घेऊन ८४ किमी धावले

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शहीद जवानांना आदरांजली म्हणून स्वातंत्र्य दिनानिमित्त ग्रीनफिट फिटनेस स्पोर्ट्सतर्फे आयोजित व्हर्च्युअल रनिंग स्पर्धेत राष्ट्रीय धावपटू साईश्वर व श्रद्धा केशव गुंटूक या बंधू भगिनी हाती तिरंगा घेऊन ८४ किमी धावले. या आगळावेगळ्या उपक्रमात साईश्वर व श्रद्धा यांनी हातात तिरंगा घेऊन एका लयमध्ये ४२ किमी अंतर ३ तास ४३ मिनिटे ८ सेकंदात पूर्ण केले. ह्या अनोख्या उपक्रमाची सुरुवात पहाटे ३ वा ३० मिनिटाने सुरुवात केली असून सकाळी ७ वाजून १३ मिनिटे ८ सेकंदाने या उपक्रमाची सांगता करण्यात आली. ही स्पर्धा पार्क चौक ते होटगी व होटगी ते पार्क चौक व पुन्हा पार्क चौक ते होटगी पुन्हा होटगी ते जुळे सोलापूर अशा प्रकारे ४२ किमी अंतर पूर्ण केले. त्यांना सिनियर ऑलिम्पियन केशवराज सिंह तसेच स्वामी विवेकानंद प्रशालेचे प्राचार्य अंबादास पांढरे, प्राचार्य चिदानंद माळी, क्रीडा प्रशिक्षक कृष्णा कोळी यांचे मार्गदर्शन लाभत आहे.





## ताकतीचा उपयोग अन्यायाच्या विरोधात करा

● **पॉवरलिफ्टींग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी माजी महापौर मनोहर सपाटे यांचे प्रतिपादन**

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट**

आपल्या ताकतीचा उपयोग समाजामध्ये अन्यायाच्या विरोधात करावा, असे प्रतिपादन माजी महापौर मनोहर सपाटे यांनी केले.

स्वातंत्र दिनाच्या निमित्ताने सोलापूर जिल्हा पॉवर लिफ्टिंग असोसिएशनच्या मान्यतेने छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज येथे झालेल्या जिल्हास्तरीय पॉवरलिप्टींग स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. ते म्हणाले, माझ्यासमोर बसलेले सर्व लिफ्टर्स सर्वोत्तम व्यक्तिमत्व सामावलेले असणारे आहे. लिफ्टर्सनी व्यसनापासून दूर राहावे आणि कुठलेही स्टेरॉईड न घेता शरीर संवर्धन करावे. मुख्याध्यापिका जुगदार म्हणाले, या स्पर्धेत मुली आणि महिला दिसत आहेत. परंतु यांचे प्रमाण फारच कमी आहे. ते वाढवण्याची गरज आहे. यावेळी महाराष्ट्र पोलीस दलातील तरंगे, प्रा. संतोष गवळी, छत्रपती शिवाजी नाईट कॉलेजच्या प्रा.पाटील, सुपरवायझर जगदाळे, जगताप, दत्ता भोसले आदी उपस्थित होते.

## राज स्कूलच्या केशव परदेशीची योगासन स्पर्धेसाठी निवड

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट**



जिल्हा योगासन स्पर्धेत राज मेमोरियल इंग्लिश स्कूलच्या केशवसिंग अतुलसिंग परदेशी याने सब-ज्युनियर मुलांच्या गटात ट्रेडिशनल योगासन प्रकारात प्रथम व आर्टीस्टिक सिंगल योगासन प्रकारा मध्ये व्दितीय क्रमांक पटकावला. या कामगिरीवर त्याची संगमनेर येथे होणाऱ्या राज्य स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यास क्रीडा शिक्षक अतुल सोनके, राजू दसाडे, अशीतोष जाधव व प्रशिक्षक रोहन घाडगे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वी खेळाडूचे संस्था अध्यक्ष महेश कोठे, डॉ. राधिका चिलका, डॉ. सूर्यप्रकाश कोठे, देवेंद्र कोठे, प्रथमेश कोठे, प्रा. विलास बेत, मुख्याध्यापिका रोहिणी सुरा आदींनी अभिनंदन केले.

## स.हि.ने प्रशालेचे आयान पठाण, फटफटवाले, जाधव अजिंक्य

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**



शालेय शहर स्क्वॅश स्पर्धेत दत्त चौक गणपती घाटावरील सखुबाई हिराचंद नेमचंद प्रशालेच्या आयान पठाण, नेहा फटफटवाले यांनी अजिंक्यपद पटकाविले. शहर स्पर्धेतील कामगिरीवर प्रशालेच्या ७ खेळाडूंची पुणे विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

शहर स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात आयान पठाण याने ७-०, ७-३, ७-४, ७-४, ७-६ असे पाचही सामने जिंकत अजिंक्यपद पटकाविले. त्याच गटात सिद्धांत तुपेरे याने पाच पैकी तीन सामने जिंकत चौथे स्थान मिळवले. मुलींच्या गटात नेहा फटफटवाले हिने ७-४, ७-५, ७-३, ७-५, ७-६ असे पाचही सामने जिंकत अजिंक्यपदाचा मान मिळविला. १४ वर्षाखालील मुलांच्या गटात रोहित जाधव याने ७-४ ७-५ ७-३ ७-४ ७-५ असे पाचही सामने जिंकत अजिंक्य ठरला. अनिश रॉय याने रोहित जाधव बरोबर ७-५ असा हरल्यामुळे रौप्य पदक मिळाले. १४ वर्षाखालील मुलींच्या गटात खुशी चौधरी हिने तीन सामने जिंकत चौथे स्थान मिळवले जानवी म्हेत्रे हिने पाचवे स्थान मिळवले.

या खेळाडूंना क्रीडा शिक्षक वीरेश अंगडी यांचे मार्गदर्शन लाभले. त्यांचे संस्थेचे अध्यक्ष ॲड. रघुनाथ दामले, सचिव प्रीती चिलजवार, ज्येष्ठ संचालक मोहन दाते, मुख्याध्यापिका नीता येरमाळकर यांनी अभिनंदन केले.



छायाचित्र : केवल तिवारी, सोलापूर.

## ‘आपण सर्व फिटनैसकडे वळू या, देशभक्तीचा जागर करू या’

**सोलापूर : ‘आपण सर्व फिटनेसकडे वळू या, देशभक्तीचा जागर करू या,’ हा संदेश देण्यासाठी ७७ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त चॅलेंजर रनर फाउंडेशनच्या ७७ किलोमीटरच्या अल्ट्रा मॅरेथॉन शर्यतीस विजापूर रसत्यावरील सोनी कॉलेजपासून सुरुवात झाली. संभाजी तलाव आणि परत सोनी कॉलेज अशी ही शर्यत रविवारी सकाळी ७ वाजेपर्यंत संपेल. याचा शनिवारी सांयकाळी सुरवातीचा टिपलेला क्षण.**







# घोडके, जिल्ला, गायकवाड, पवार, काशीद विजेते

## ● शालेय शहर बुद्धिबळ स्पर्धा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट**

शालेय शहर बुद्धिबळ स्पर्धेत १४ वर्षाखालील मुलांच्या गटात इंडियन मॉडेल स्कूलचा आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त साईराज घोडके याने आठ पैकी साडेसात तर डी. आर. श्रीराम स्कूलच्या संकृती जिल्ला हिने मुलींच्या गटात सात पैकी सात गुण मिळवीत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले.

सोलापूर महानगरपालिका सोलापूर अंतर्गत जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद सोलापूर यांच्या संयुक्त विद्यामाने व सोलापूर डिस्ट्रिक्ट असोसिएशनच्या सहकार्याने आयोजीत कुमठा नाका येथील क्रीडा संकुलात झालेल्या या स्पर्धेत १७ वर्षाखालील मुलांच्या गटात इंडियन मॉडेल स्कूलच्या आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त खेळाडू मानस गायकवाड याने ८ पैकी ८ गुण तर मुलींच्या गटात इंडियन मॉडेल स्कूलच्याच आंतरराष्ट्रीय गुणांकन प्राप्त सृष्टी गायकवाड हिने सात पैकी साडे सहा गुण मिळवत स्पर्धेचे विजेतेपद पटकावले. तसेच १९ वर्षाखालील मुलांच्या गटात श्री दिगंबर जैन गुरुकुल प्रशालेचा रणवीर पवारने ६ पैकी ५.५ गुण तर एस.व्ही. सी.एस.च्या प्रज्ञा काशीद हिने पाच पैकी पाच गुण मिळवत अव्वल स्थान प्राप्त केले. या स्पर्धेतील पहिल्या पाच क्रमांकाच्या खेळाडूंची निवड पुणे विभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी झालेली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन मनपा क्रीडाधिकारी श्रीकांत घोलप व आंतरराष्ट्रीय खेळाडू स्वराली हातवळणे तसेच मानस गायकवाड यांच्यातील प्रदर्शनीय लढतीने झाले. यावेळी जिल्हा संघटनेचे सचिव सुमुख गायकवाड, वरिष्ठ राष्ट्रीय पंच उदय वगरे, युवराज पोगुल, रोहिणी तुम्मा, प्रशांत पिसे, विजय पंगुडवाले, क्रीडा शिक्षक सुभाष उपासे, आप्पासाहेब पाटील, प्रज्वल कोरे आदी उपस्थित होते.

### ● अंतिम निकाल (अनुक्रमे एक ते पाच)

**१४ वर्षे मुले :** साईराज घोडके (इंडियन मॉडेल स्कूल), हर्ष हलमल्ली (केएलई), स्वानंद तपकिरे (इंडियन मॉडेल इंटरनॅशनल स्कूल), कार्तिक भागवत (उमाबाई श्राविका विद्यालय), वेदांत मुसळे (सेंट जोसेफ). **मुली :** संकृती जिल्ला (डी. आर. श्रीराम स्कूल), फराह शेख (नवजीवन स्कूल), प्राजक्ता भीमपुरे (दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला), अदिती इनाणी (महेश इंग्लिश स्कूल), अन्विता लोखंडे (सेंट थॉमस स्कूल).

**१७ वर्षे मुले:** मानस गायकवाड - ८ (आय एम एस (सी बी एस ई), विठ्ठल येलदी - ७ (४२.५)- प्रिसिजन इंग्लिश मिडीयम, तन्मय कदम ७ (४०)- आय एम एस (सी बी एस ई), ओम चिनगुंडे ७ (३९)- आय एम एस (स्टेट बोर्ड), वरद लिमकर ७ (३९)- आय एम एस (सी बी एस ई). **मुली:** सृष्टी गायकवाड - ६.५ (आय एम एस (सी बी एस ई), श्रेया संदुपटला - ६ (३१.५)- ज्ञान प्रबोधिनी, सिद्धी शरणार्थी - ६(३०)- सेंट जोसेफ हायस्कूल, स्वराली हातवळणे - ५.५- आय एम एस (सी बी एस ई), श्रेया जाधव - ५ (३१)- सुयश गुरुकुल

**१९ वर्षे मुले:** रणवीर पवार - ५.५ (जैन गुरुकुल), आकाश मगाई - ५(२१.५) - श्रीमती निर्मलाताई ठोकळ कॉलेज अखिलेश खरात ५ (२०.५) - ए. डी.जोशी ज्यू.कॉलेज, पृथ्वीराज चव्हाण- ५(२०.५) - यशोधरा ज्यू. कॉलेज, समर्थ घोडके- ५ (२०) - यशोधरा ज्यू. कॉलेज. **मुली:** प्रज्ञा काशीद - ५ - एस.वी. सी.एस., सृष्टी येलदी - ४ (१४)- कुचनयशोधरा ज्यू. कॉलेज ज्यू.कॉलेज, काव्य पाटील - ४(१२)- जैन गुरुकुल, साक्षी पाटील - ४- एस.वी. सी.एस., अनुष्का काळे - ३(१५)- संगमेश्वर कॉलेज.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# एकत्र कुटुंब व्यवस्थेमुळे वृद्धाश्रम नाहीसे होतील

## कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर : जैन कासार प्रतिष्ठानच्या पुरस्कारांचे वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट -**

वृद्धाश्रम असणे ही समाजाची अधोगती आहे. सध्या लहान मुलांना मोबाईलचे वेड लावले आहे. कारण घरात आजी-आजोबाच नाहीत, आई-वडील कामात असताना मुलं करतील तर काय? संवाद कमी झाला आहे. त्यामुळे एकत्र कुटुंबाची खूप गरज आहे आणि एकत्र कुटुंब पद्धती वाढली तर वृद्धाश्रम नाहीसे होतील, असे प्रतिपादन अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले.



जैन कासार विकास प्रतिष्ठानच्या पुरस्कार वितरण कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी जैनोस्कोचे माजी अध्यक्ष डॉ. मधुकर लोखंडे होते. व्यासपीठावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष हुकुमचंद हेसे, कार्याध्यक्ष बाबुराव तंगा, न्यायाधीश दीपा कोळपकर उपस्थित होते. पाहुण्यांचा परिचय प्रा. धन्यकुमार बिराजदार यांनी करून दिला. जैन कासार प्रतिष्ठानच्या वतीने चेंबर ऑफ कॉमर्सचे माजी अध्यक्ष प्रभाकरराव वनकुद्रे यांना जीवनगौरव, वैराग येथील गोविंद कासार व उषाताई कासार यांना 'आदर्श दाम्पत्य पुरस्कार' व नीताताई नळे यांना आदर्शमाता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तसेच नांदेड येथील ढोके कुटुंबियांना स्व. अभिजीत यांचे मरणोत्तर अवयवदान देऊन सहा जणांना जीवनदान दिल्याबद्दल ढोके कुटुंबियांबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. प्रारंभी रूपाली भस्मे यांनी णमोकार मंत्र म्हटले. अध्यक्ष हुकूमचंद हेसे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी चेंबर ऑफ कॉमर्सचे राजू राठी यांनीही वनकुद्रे यांच्या कार्याचा गौरव केला.

यावेळी यावर्षीच्या यशस्वी समाज बांधव जैन कासार मंदिराचे नूतन अध्यक्ष विलास कंदले, महाराष्ट्र शासनाच्या होमिओपॅथी परिषदेचे प्रशासक डॉ. विलास हरपाळे, सचिव बाबुराव तंगा, महाराष्ट्र शासनाचे हिंदी साहित्य अकादमी पुरस्कारप्राप्त प्रा. धन्यकुमार बिराजदार, कांचन कंदले, कविता भस्मे, गीता मोहोळकर, मंजुषा मैंदर्गे यांचा विशेष सत्कार करण्यात आला.

सी.ए. झालेल्या संकेत उल्हास डोंगरे, देवराज प्रशांत कासार, एम. एसस्सी. झालेल्या अर्थव डांगरे, दर्शन लोखंडे, पी.एच.डी. झाल्याबद्दल जितेंद्र कंदले यांचाही सत्कार करण्यात आला. जिल्ह्यातून बारावीत प्रथम आलेल्या वैष्णवी विजयकुमार सगरशेट्टी, हर्षिता नरेंद्र खोबरे, अक्षय शांतीनाथ बागेवाडी, तसेच दहावीमधील समृद्धी अमोल कासार, आयुष अमोल जगधने, नेहा राहूल कंदले यांचा सत्कार करण्यात आला. सूत्रसंचालन प्रथमेश कासार तर मानपत्र वाचन गीता मोहोळकर यांनी केले. संजय ऊर्फ पप्पू कंदले यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# श्री मल्लिकार्जुन हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन सोहळा साजरा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

श्री मल्लिकार्जुन हायस्कूल व रखमाबाई हत्तुरे कनिष्ठ महाविद्यालय, श्री सिद्रामप्पा हत्तुरे प्राथमिक शाळा, श्री मल्लिकार्जुन बालक मंदिर यांच्या संयुक्त विद्यमाने स्वातंत्र्य दिन सोहळा प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

प्रारंभी नगरातून प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य वैजिनाथ हत्तुरे व प्रमुख अतिथी मजरेवाडी शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सिद्धप्पा वरनाळ व सेवानिवृत्त शिक्षक शिवरुद्र मोकाशी, धरेप्पा हत्तुरे यांच्या हस्ते भारत मातेचे, महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी दहावी व बारावी बोर्ड परीक्षेतील, शिष्यवृत्ती परीक्षेतील, विविध परीक्षा, विविध स्पर्धा व क्रीडा क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आले.

यावेळी श्राविका केसकर, ऐश्वर्या कुदळे, समीक्षा पाटील या विद्यार्थिनींनी भाषणे केली.



कार्यक्रमास मुख्याध्यापक सचिन जाधव, पर्यवेक्षक रमेश दिंडोरे, मुख्याध्यापिका संगीता हुमनाबादकर, काशिनाथ मळेवाडी, सुधाकर कामशेट्टी, बसवराज कोरे अण्णाराया तुप्पद,सविता कुलकर्णी, प्राध्या. लक्ष्मीकांत पनशेट्टी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आले. प्रास्ताविक अनिलकुमार गावडे यांनी केले. सूत्रसंचालन मारुती माने यांनी केले तर आभार रमेश आगवणे यांनी मानले.

# फोमरा मूकबधिर विद्यालयात नाच गं घुमा कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

कानाने ऐकू येत नसतानाही ताल-लय-ठेक्याचे भान ठेऊन उत्तमरीत्या नृत्य गाणी, खेळ कर्णबधीर मुलींनी सादर केली. कोण म्हणेल यांना दिव्यांग, असे प्रतिपादन वरीष्ठ पोलीस निरीक्षक स्वाती गायकवाड-साळुंके यांनी केले.

येथील रोटरी नॉर्थराधाकिशन फोमरा मूकबधिर विद्यालयात श्रावण सोहळा निमित्त नाच गं घुमा या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. प्रास्ताविक मुख्याध्यापिका क्षितिजा गाताडे यांनी केले. रोटरी क्लब ऑफ सोलापूर नॉर्थचे अध्यक्षा डॉ जानवी माखिजा तर शाळेचे सचिव सुनील दावडा यांनी प्रमुख पाहुण्यांचा सत्कार केला.





कार्यक्रमास पोलीस अधिकारी आधटराव, सुनील दावडा, मधुरा वडापुरकर, आसावरी सराफ, नमिता पाटील, रेणुका पसपूले, संध्या चंदनशिवे, विजया पिटाळकर, गजानन गडगे, नागनाथ बसाटे, सोमनाथ ठाकर, दिनेश ताटे, चिदानंद बेनुरे, गंगाधर मदभवी, अजित पाटील, सोमनाथ थोरात, बाबासाहेब पवार, सुनील दावडा उपस्थित होते.

# खुनाचा गुन्हा दाखल करण्याचा न्यायालयाचा आदेश

## ● अंबादास दाते मृत्यूप्रकरण

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

येथील दशरथ विठ्ठल पवार (वय ४१, रा. बी बी दारफळ, ता. उत्तर सोलापूर) याने कट आखुन अंबादास दाते याचा खून करून अपघात असल्याचा बनाव केला असल्याबाबत त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करून तपास करण्याचा आदेश प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी एस. आर. सातभाई यांनी सोलापूर तालुका पोलिसांना दिला.



३१ मार्च २०२१ रोजी फिर्यादीची वहिनी शोभा अंबादास दाते ही तिचे माहेरी बीबी दारफळ येथे कामानिमित्त गेली होती. बी बी दारफळ येथे फिर्यादीचे नातेवाईक अलकुंटे व पवार यांचेत भांडण झाले होते. त्याबाबत अलकुंटे व पवार यांनी परस्परांविरुद्ध पोलिसात तक्रारी दाखल केल्या होत्या. फिर्यादीची वहिनी शोभा हिचा भांडणाशी काडीमात्र संबंध नसताना देखील आरोपी दशरथ याने तिचे नाव गुन्ह्यात गुंतवले, त्यामुळे फिर्यादीचा भाऊ अंबादास हा दिनांक २ एप्रिल२०२१ रोजी बी बी दारफळ येथे दशरथ यास जाब विचारण्याकरिता गेला होता. यादिवशी अंबादास हा घरी न आल्यामुळे रात्री ९:४० च्या सुमारास अंबादास ने सांगितले की, तो आरोपी दशरथ याचे सोबत असून शोभा हीचे नाव तक्रारीमधून मागे घेण्याची बोलणी करत आहे, परंतु दशरथ हा दारूच्या नशेत माझ्याशी भांडत आहे असा निरोप दिला. फिर्यादीने पुन्हा अंबादास यास फोन लावला असता फोन लागत नव्हता. दिनांक ०३ एप्रिल २०२१ रोजी सकाळी फिर्यादीस एका व्यक्तीने निरोप दिला की, बी बी दारफळ कोंडी मार्गावर अंबादास हा रक्ताळलेल्या अवस्थेत पडला आहे, त्यावेळी फिर्यादीने जाऊन पाहणी केली असता अंबादास हा रक्ताळलेल्या अवस्थेत मृत पडला होता, थोड्या अंतरावर त्याची दुचाकी दिसून आली, दुचाकी पडल्याचे ठिकाण व अंबादास पडल्याचे ठिकाण त्याामुळे संशय निर्माण झाल्याने फिर्यादीने लागलीच तालुका पोलीस स्टेशन यांना माहिती दिली.

या दिवशी अंबादास याचा खून झाल्याबाबत फिर्यादी रामचंद्र दाते यांनी पोलिसांकडे ऑनलाईन तक्रार दाखल केली होती. परंतु पोलिसांनी कोणतीच कारवाई न केल्यामुळे फिर्यादीने न्यायालयात खाजगी फिर्याद दाखल केली. सुनावणी वेळी फिर्यादीच्या वकिलांनी आरोपी दशरथ याने फिर्यादीची वहिनी व नातेवाईक यांच्याविरुद्ध दाखल केलेली तक्रार, प्रसिद्ध झालेली बातमी, मयत अंबादास हा शेवट दशरथ याचे बरोबर असल्याचे त्याने फिर्यादीस फोनवर सांगितलेली बाब, दशरथ याने अपघात असल्याचा केलेला बनाव या सर्व बाबी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल्या. वरील सर्व युक्तीवादाचा विचार करून न्यायालयाने हा आदेश दिला. यात फिर्यादीतर्फे ॲड. प्रशांत नवगिरे, ॲड. श्रीपाद देशक, ॲड. सिद्धाराम पाटील यांनी काम पाहिले.

# मयत शिक्षकांच्या कुटुंबियांनी मानले प्रशासनाचे आभार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभागातील मयत शिक्षकांच्या कुटुंब निवृत्ती वेतनाचे प्रस्ताव डिसेंबर महिन्यापासून प्रलंबित असल्यामुळे जिल्हा जुनी पेन्शन शिक्षक संघटनेतर्फे झेडपीच्या गेटवर सुरू करण्यात आलेल्या उपोषणाची मुख्य लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी दखल घेतली आणि चार शिक्षकांचे कुटुंब निवृत्ती वेतन मंजुरीचे आदेश जागेवर देण्यात आले. यामुळे उर्वरित शिक्षकांचा प्रश्न सोमवारी सोडवण्याचे आश्वासन दिल्याने शिक्षक कुटुंबीयांनी सुरू केलेले उपोषण मागे घेतले आहे.



शासनाने २०२३ मध्ये मयत शिक्षकांच्या कुटुंब निवृत्ती वेतनाचा लाभ देण्यासाठी शासन निर्णय निर्गमित केला असताना शिक्षण विभागाकडून याची अंमलबजावणी होत नसल्याने मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांचे लक्ष वेधण्यासाठी अशा कुटुंबीयांनी स्वातंत्र्य दिनापासून झेडपीसमोर उपोषणाला सुरुवात केली होती. प्रस्तावांची टोलवाटोलवी सुरू असल्याचा आरोप उपोषणकर्त्यांनी केला होता. घरातील कमावती व्यक्ती, आधार मयत झाल्याने मागे राहिलेल्या कुटुंबातील व्यक्तींना उपजिवीकीचे साधन उरले नाही. कुटुंबातील आजारपण, शिक्षण एवढेच काय दैनंदिन गरजा भागवणे अवघड झाले आहे. संबंधित कुटुंबातील सदस्यांनी लोकप्रतिनिधींची भेट घेऊन लवकरात लवकर पेन्शन मंजूर व्हावी यासाठी प्रशासनाला सूचना देण्याची विनंती केली आहे, तरीही प्रशासन ढिम्मच असल्याने उपोषण सुरू केले होते. याची झेडपीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मनीषा आव्हाळे यांनी याची गंभीर दखल घेतली. प्रशासनाच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी स्मिता पाटील यांना याप्रकरणी लक्ष घालण्याच्या सूचना केल्यानंतर त्यांनी शिक्षण व लेखक विभागाला याबाबत मार्गदर्शन केले. लेखा व वित्त अधिकारी मीनाक्षी वाकडे यांनी आंदोलनकर्त्यांची भेट घेऊन बाजू ऐकून घेतली. प्रशासनाकडून झालेल्या चुकाबाबत माफी मागून जागेवरच मयत शिक्षकांच्या कुटुंबीयांना कुटुंब निवृत्ती वेतन मंजूरीचे आदेश दिले. लिपिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अविनाश गोडसे यांनीही पाठपुरावा केला. त्याबद्दल मुख्य लेखाधिकारी वाकडे, गोडसे व परिचारक यांचे उपोषणकर्ते दयानंद चव्हाण यांनी आभार मानले.

# जीवन गौरव पुरस्काराचे उद्या वितरण



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

फोटोग्राफर बहुउद्देशीय संघ शहर-जिल्हा यांच्या वतीने देण्यात येणारे जीवन गौरव पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत. सोमवार दि. १९ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता पुरस्कार वितरण सोहळा होणार आहे, अशी माहिती अध्यक्ष श्रीकांत शिंदे यांनी पत्रकार परिषदेत दिली. जागतिक छायाचित्र दिनानिमित्त शिवस्मारक सभागृह, शिंदे चौक, सोलापूर येथे हा समारंभ होणार आहे.

या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू प्रा.डॉ. प्रकाश महानवर, संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. ऋतुराज बुवा, डॉ. व्यंकटेश मेतन आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी विविध पुरस्काराने छायाचित्रकारांचा सन्मान करण्यात येणार आहे. सन्मान चिन्ह, सन्मानपत्र, शाल व श्रीफळ असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. याप्रसंगी फोटोग्राफर यांच्या इयत्ता दहावी, बारावी परीक्षेतील गुणवंत पाल्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. या पत्रकार परिषदेस अरीफ काझी, किरण सदाफुले, श्रीकांत भंडारे, किशोर मोरे, शाम जाधव आदी उपस्थित होते.





### यांचा होणार जीवनगौरव पुरस्काराने सन्मान

यावेळी सुनिल खिस्ते, पंढरपूर व श्रीपतीराव गायकवाड, अकलूज यांना जीवन गौरव पुरस्कार , किशोर गायकवाड , उदय होनकळस, शंकर वंजारे , सुखदेव होटकर, साहिर नदाफ, अंबादास सिद्राम संगा, रामदास काटकर यांना ज्येष्ठ छायाचित्रकार पुरस्कार तर, राज पवार, वेणूगोपाल कोडम यांना उत्कृष्ट छायाचित्रकार पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

# गुन्हे शाखेकडून तीन आरोपींना अटक

## ● दुचाकी चोरीचे चार गुन्हे उघडकीस

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सोलापूर शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांनी तिघां आरोपींना अटक करून त्यांच्याकडून दुचाकी चोरीचे ४ गुन्हे उघडकीस आणले

नागेश भिमाशंकर पाटील (वय ३६, रा. चनशट्टी अपार्टमेंटच्या बोळामध्ये, घोंगडे वस्ती, सोलापूर), रवि लक्ष्मण मनसावाले (वय ३७, रा. लक्ष्मी नारायण टॉकीजजवळ, आदर्श नगर, कुंभारी नाका, सोलापूर) आणि आकाश बजरंग चौधरी (रा. बेडर पूल, उत्तर सदर बझार, सोलापूर) अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत. शहर गुन्हे शाखेच्या पोलिसांना मिळालेल्या माहितीवरून पोलिसांनी पोलिस रेकॉर्डवरील आरोपी नागेश पाटील यास सहस्त्रार्जुन वैकुंटधाम स्मशान भुमी ते पसारे वस्तीकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावर चोरीची मोटार सायकल विक्रीकरीता आल्यानंतर मोटारसायकलसह ताब्यात घेतले. त्याच्याकडे चौकशी केल्यानंतर दुचाकी चोरीची असल्याचे समजले. त्यामुळे पोलिसांनी त्याच्याकडे अधिक चौकशी केल्यानंतर त्याने जूना पूना नाका परिसरातील हांडे प्लॉट, मार्केट यार्ड आणि मड्डी वस्ती येथील संजीवणी बिअर बार जवळ दुचाकी चोरल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी त्याच्याकडून चोरीच्या मोटार सायकल जप्त केल्या आहेत.

तसेच रवि मनसावाले यास चोरीची मोटार सायकल घेऊन किडवाई चौक या ठिकाणी विकण्यासाठी आल्यानंतर ताब्यात घेऊन चौकशी केल्यानंतर त्याच्याकडील मोटार सायकल त्याचा साथीदार आकाश चौधरी याने जुळे सोलापुरातील बालाजी मंगल कार्यालय येथून चोरल्याचे सांगितले. त्यावरून पोलिसांनी दोघांनाही ताब्यात घेऊन चोरीची दुचाकी जप्त केला. अशा प्रकारे वरील आरोपींकडुन ९० हजार रुपये किंमतीच्या ४ चोरीच्या मोटार सायकली पोलिसांनी हस्तगत करून ४ गुन्हे उघडकीस आणले. ही कामगिरी पोलीस आयुक्त एम. राज कुमार, पोलीस उपायुक्त डॉ. दीपाली काळे, सहायक पोलिस आयुक्त राजन माने, पोलिस निरीक्षक सुनिल दोरगे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलिस निरीक्षक जीवन निरगुडे, पोलीस अंमलदार नंदराम गायकवाड, वाजीद पटेल, योगेश बर्डे, संजय साळुंखे, सिध्दाराम देशमुख, अजय गुंड यांनी केली.



# बालाजी अमाईन्सकडून २३ शाळांना शालेय साहित्य वितरण

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १६ ऑगस्ट-**

बालाजी अमाईन्स आणि बालाजी स्पेशालिटी केमिकल्स यांचेकडून धाराशिवचे जिल्हाधिकारी सचिन ओंबासे व जि. प. मुख्य कार्यकारी अधिकारी मैनक घोष यांच्या हस्ते जिल्हयातील २३ शाळांना शालोपयोगी साहित्याचे वितरण करण्यात आले. हा कार्यक्रम बुधवार, दि. १४ ऑगस्ट रोजी बालाजी अमाईन्स कंपनी, तामलवाडी येथे पार पडला.

या शालेय साहित्य वितरण कार्यक्रमास तुळजापूरचे तहसिलदार अरविंद बोळंगे, बालाजी अमाईन्सचे व्यवस्थापकिय संचालक डी राम रेडडी, सीएसआर प्रमुख मल्लिनाध बिराजदार, आर. एस. शास्त्री उपस्थित होते. या शालेय साहित्यामध्ये ५ शाळांना ७ स्मार्ट टिव्ही, २ शाळांना २ संगणक, ३ शाळांना आरो मशीन, १ शाळेस विज्ञानप्रयोग शाळा साहित्य, १२ शाळांना ३०० बेंच असा समावेश आहे. सूत्रसंचलन सहशिक्षक विठ्ठल नरवडे यांनी केले. तर या कार्यक्रमास बालाजी अमाईन्स परिवारातील लेखा व्यवस्थापक मारूती सावंत, विनय दुर्गम, डी. पी. गायकवाड, विनोद चुंगे, सचिन मोरे, दत्तप्रसाद सांजेकर, बसवराज अंटद, अमोल गुंड उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त





### दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय साहित्याचे वाटप

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

उत्तर सोलापूर तालुक्यातील तळे हिप्परगा येथील मंठाळकर वस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत माजी आमदार दिलीप माने यांच्या वाढदिवसानिमित्त लिंबराज जाधव यांच्या परिवारातर्फे जिल्हा मराठा वधू वर सूचक कक्षाचे अध्यक्ष राम माने यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास मराठा सेवा संघ कार्यकारणी सदस्य दत्ता जाधव, ओंकार जाधव, लिंबराज जाधव, हभप राजू महाराज बोराटे, दत्तात्रेय यादवाड, रूबीना शेख आदी उपस्थित होते. या प्रसंगी मांन्यवर हस्ते विद्यार्थ्यांना वह्या, कंपास, पेन तसेच थोर महात्म्यांची पुस्तके भेट देण्यात आले. प्रास्ताविक मुख्याध्यापक सुरेखा कोरे यांनी केले. सूत्रसंचालन दुर्गादेवी उलट यांनी केले. संतोषी चौधरी आभार यांनी मानले.





### भारतीय जैन संघटनेच्यावतीने जि.प.शाळेस पाण्याची टाकी प्रदान

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून व भारतीय जैन संघटनेचे संस्थापक अध्यक्ष शांतीलाल मुथ्था यांच्या वाढदिवसानिमित्त बाळे येथील अंबिका नगरातील जिल्हा परिषद शाळेस पाण्याची टाकी भारतीय जैन संघटना हद्दवाढ महिला विभाग व नवज्योती महिला मंडळ भौगोलिक नगर यांच्या संयुक्त विद्यमाने प्रदान करण्यात आली. अध्यक्षस्थानी राष्ट्रीय सदस्य केतन शहा, राज्य कार्यकारणी सदस्य श्याम पाटील, विभागीय उपाध्यक्ष अभिनंदन विभूते, केंद्रप्रमुख मल्लिनाथ निम्बर्गी, जिल्हाध्यक्ष देशभूषण व्हसाळे, महिला जिल्हाध्यक्ष माया पाटील, जिल्हा उपाध्यक्ष विक्रांत बशेट्टी, हद्दवाढ विभागाचे अध्यक्ष अशोक भालेराव, पंकजा पंडित यांची प्रमुख उपस्थिती होती. हदवाढ महिला अध्यक्ष पंकजा पंडित यांच्या प्रयत्नातून ही टाकी देण्यात आली. प्रास्ताविक मुख्याध्यापक माशाळे यांनी केले तर सूत्रसंचालन राठोड यांनी केले. यावेळी केतन शहा, श्याम पाटील, पंकजा पंडित यांनी मनोगतातून जैन संघटनेचे महत्त्व सांगितले. यावेळी विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला.



### ओम वैष्णव महाविद्यालयात सामाजिक शैक्षणिक जनजागृती

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शिवालय प्राथमिक व माध्यमिक आश्रमशाळा व ओमवैष्णव कनिष्ठ महाविद्यालय संगमेश्वर महाविद्यालयामधील बीबीए द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी सामाजिक शैक्षणिक जागरूकता निर्माण व्हावी, यासाठी विविध उपक्रमांचे आयोजन केलेले होते. याप्रसंगी मुख्याध्यापिका प्राचार्य वाघचवरे यांनी बीबीए द्वितीय वर्षाचे सर्व विद्यार्थी व संगमेश्वर महाविद्यालयातील प्राध्यापक यांचे स्वागत केले. यामध्ये त्यांनी बालकामगार, मुलींना शिक्षण, अशा विविध विषयावर पदनाट्य सादर करून जनजागृती केली. सर्व विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले. लहान विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी संगमेश्वर महाविद्यालयाचे प्राध्यापक चौधरी, वनिता शिवशरण, प्रीती कोठारी उपस्थित होते.



### उत्कृष्ट कार्याबद्दल वरिष्ठ लिपिक सुनील बोलाबद्दीन यांचा गौरव

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

स्वातंत्र्यदिनानिमित्त डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सिव्हील हॉस्पिटल येथे कार्यरत असणारे वरिष्ठ लिपिक सुनील बोलाबद्दीन यांचा वैशंपायन वैद्यकीय शासकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता संजीव ठाकूर यांच्या हस्ते उत्कृष्ट कार्याबद्दल सन्मान करण्यात आला आहे. अंध दिव्यांग प्रशासकीय कार्यालयातील कार्यरत असणारे बोलाबद्दिन यांचे शिक्षण बीकॉम समाजसेवा अधीक्षक वैद्यकीयमध्ये ॲक्युप्रेशर व टेलिफोन ऑपरेटर असे झाले आहे. त्यांना जे.जे. हॉस्पिटलचे २००८ रोजी पारितोषिक मिळाल्यानंतर २०२४ मध्ये अधिष्ठाता यांच्या हस्ते उत्कृष्ट कर्मचारी म्हणून प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी प्राध्यापक ऑर्थोपेडिक सुनील आंधळमट यांनी हाडांचा ठिसूळ हे शिबिर घेतले. शिबिरात अधिष्ठाता संजीव ठाकूर यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# राष्ट्र उभारणीत जबाबदारी महत्त्वाची : डॉ. लहाने

## ● वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या जीवनगौरव पुरस्कारांचे वितरण



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

राष्ट्र उभारणीत प्रत्येकाने आपली जबाबदारी पार पाडली पाहिजे. कार्य संस्कृतीचे सर्वांनी पालन केल्यास भारत वर्षभरातच महाशक्ती होईल. चांगली जबाबदारी पार पाडणाऱ्या कामाचा गर्व असावा. राष्ट्र उभारणीत जबाबदारी ही अत्यंत महत्त्वाचे आहे. ती सर्वांनी पार पाडली पाहिजे. चांगल्या माणसांचे संगोपन झाले पाहिजे. चांगल्या माणसाच्या कौतुकाने देश आणि समाजाची जडणघडण होण्यास मदत होते. त्यासाठी श्री वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानचे कार्य महत्त्वपूर्ण आहे, असे गौरवोद्गार प्रख्यात प्लास्टिक सर्जरी तज्ज्ञ डॉ. विठ्ठल लहाने यांनी काढले.

वि.गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या वतीने सहकार महर्षी, स्वातंत्र्यसेनानी माजी आ. कै. वि. गु. शिवदारे यांच्या जयंतीनिमित्त शनिवारी हिराचंद नेमचंद वाचनालयाच्या किर्लोस्कर सभागृहात जीवनगौरव पुरस्कार वितरण सोहळा थाटात पार पडला. त्याप्रसंगी प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. श्री सिध्देश्वर देवस्थान पंच कमिटीचे अध्यक्ष धर्मराज काडादी यांच्या हस्ते विविध क्षेत्रातील मान्यवरांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करण्यात आला. यावेळी प्रख्यात प्लास्टिक सर्जरी तज्ञ विठ्ठल लहाने यांनी 'राष्ट्र उभारणीतील आपला सहभाग' या विषयावर प्रबोधनात्मक विचार मांडले. यावेळी विचार मंचावर प्रतिष्ठानचे अध्यक्ष तथा श्री स्वामी समर्थ सहकारी सूतगिरणी चेअरमन राजशेखर शिवदारे , श्री सिध्देश्वर सहकारी बँकेचे चेअरमन नरेंद्र गंभिरे , विश्वस्त डॉ. बाहुबली दोशी आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. लहाने यांनी रेकॉर्ड या शब्दाचा विस्तृत अर्थ विशद केला. यातील प्रत्येक अक्षराचा मतितार्थ समजावून सांगितला. त्यामध्ये जबाबदारी, पात्रता, सातत्य, निरीक्षण, नातेसंबंध आणि शिस्त याचे महत्त्व पटवून दिले. राष्ट्र उभारणीतील आपला सहभाग महत्त्वाचा आहे. रेकॉर्ड करणारी माणसे राष्ट्र उभारणीत महत्त्वपूर्ण योगदान देतात. दुभंगलेले ओठ, टाळू अशा पद्धतीच्या शस्त्रक्रिया मोठ्या प्रमाणात मी मोफत करतो. वीस वर्षापासून या शस्त्रक्रियेचे रेकॉर्ड माझ्या नावावर आहे. दरवर्षी महाराष्ट्रात २५०० मुले व्यंग जन्मतात.त्यापैकी ७०० शस्त्रक्रिया मी स्वतः एकटा करतो, असेही डॉ. लहाने यांनी यावेळी सांगितले.

कै. वि. गु. शिवदारे यांनी सोलापूर शहर जिल्हा व राज्याच्या विकासात मोठे योगदान दिले. त्यांचे व्हिजन मोठे होते. त्यांच्या विचारांचा वारसा आता त्यांचे सुपुत्र राजशेखर शिवदारे हे चालवीत आहेत. ही निश्चित सर्वांसाठी प्रेरक अशी बाब आहे. संस्कारामुळेच आमच्या विचारांचा धागा आज जुळला आहे. शिवदारे व काडादी घराण्याशी भावनिक नाते जुळले आहे. जबाबदारी आणि सातत्याचे भान राखत मी गेल्या २७ वर्षापासून पावणे १४ तास वैद्यकीय सेवा देत असल्याचेही यावेळी डॉ. लहाने यांनी सांगितले.

धर्मराज काडादी म्हणाले, स्वातंत्र्य लढा आणि विकासात वि. गु. शिवदारे अण्णा यांचे नाव अग्रेसर आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेल्या मान्यवरांचा पुरस्काराने गौरव करण्याचा उपक्रम प्रतिष्ठानने राबविला. ही निश्चित सर्वांसाठी ऊर्जादायी आणि प्रेरणादायी बाब असल्याचे ते म्हणाले.

प्रास्ताविक प्रतिष्ठानचे अध्यक्ष राजशेखर शिवदारे यांनी वि. गु. शिवदारे प्रतिष्ठानच्या गत २५ वर्षातील कार्याचा आढावा मांडला. यावेळी प्रतिष्ठानच्या वतीने गरीब, हुशार ११ विद्यार्थ्यांना प्रत्येकी ११ हजार रुपये प्रोत्साहन अर्थसहाय्य प्रदान करण्यात आले. प्रारंभी सहकार महर्षी कै. वि.गु. शिवदारे यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दीप प्रज्वलन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. सूत्रसंचालन शुभदा उपासे यांनी केले. तर डॉ. बाहुबली दोशी यांनी आभार मानले. यावेळी दक्षिण सोलापूर तालुका शिक्षण मंडळाचे विश्वस्त प्रा. बी. व्ही. शेटे, सिद्ध संघ प्रतिष्ठानचे अध्यक्ष प्रकाश वाले, डॉ. सिध्देश्वर वाले, विश्वस्त सुभाष मुनाळे, सिद्धाराम जोडभावी, महादेव बिराजदार, कॉलेज ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ. आर. वाय. पाटील, प्राचार्य कॉलेज ऑफ फार्मसी (पॉली.) डॉ. जी. के. कापसे, प्राचार्य डी. एस. सूत्रावे, अंजली तिवारी, उपप्राचार्य एम बी पाटील, युनिक इंग्लिश मीडियम स्कूलच्या प्रिन्सिपल पूजा बाजपाई, ज्युनियर कॉलेजच्या प्राचार्य श्रुती गायकवाड, प्रमोद बिराजदार, शंकर पाटील आदींसह संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### 'या' मान्यवरांचा झाला पुरस्काराने गौरव

श्री निंम्बार्क ब्रिजधाम वृद्धाश्रमचे संस्थापक अध्यक्ष ब्रिजमोहन फोफलिया (सामाजिक क्षेत्र), प्रसिद्ध नेत्र तज्ज्ञ डॉ. माधुरी वाळवेकर (वैद्यकीय), पंढरपूर तालुक्यातील गादेगाव येथील प्रयोगशील शेतकरी अतुल बागल (कृषी), ज्येष्ठ पत्रकार सचिन जवळकोटे (पत्रकारिता) आदी मान्यवरांना जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. स्मृतिचिन्ह, २१ हजार एक रुपये रोख, शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आहे.



सोलापूर : दै.तरुण भारतच्या मुख्य संपादकपदी पदोन्नती झाल्याबद्दल प्रशांत माने यांना शुभेच्छा देताना तबरेज अमीन उस्ताद.

## संक्षिप्त वृत्त



### जनकल्याण मल्टिस्टेट सोसायटीच्या लॉकर सुविधेचा शुभारंभ

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

जनकल्याण मल्टिस्टेट को ऑप. क्रेडिट सोसायटीच्या विजापुर रोड शाखेचा स्व. मालकीच्या जागेत स्थलांतर सोहळा व लॉकर सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. याचे उद्घाटन माजी आमदार दिलीप माने व सिध्देश्वर सहकारी साखर कारखान्याचे मार्गदर्शक धर्मराज काडादी यांच्या हस्ते तसेच लॉकर सुविधेचा शुभारंभ शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोल शिंदे व सोलापूर शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष चेतन नरोटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष शहाजी भाऊ पवार, उद्योजक प्रमोद साठे, व्ही.पी.पी इंजीनियरिंग कॉलेज प्रेसिडेंट जी. के. देशमुख, संस्थापक चेअरमन राजेंद्र हजारे यांच्यासह पदाधिकारी, ग्राहक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### केसरी टूर्सला बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर पुरस्कार

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

डीडीपी ग्रुपद्वारे आयोजित इंडिया ट्रॅव्हल २०२४ पुरस्कार सोहळा १३ ऑगस्ट रोजी बीकेसीयेथील सोफिटेल येथे पार पडला. यावेळी ट्रॅव्हल आणि हॉस्पीटॅलिटी क्षेत्रातील ६४ यशस्वी उद्योजकांना त्यांच्या अतुलनीय कामगिरीसाठी पुरस्कार देण्यात आले. यावेळी पर्यटन क्षेत्रात नवनवे पायंडे पाडणाऱ्या केसरी टूर्सलाइंडिया ट्रॅव्हल २०२४ चा बेस्ट इंटरनॅशनल ग्रुप टूर ऑपरेटर पुरस्कार प्राप्त झाला. यावेळी केसरी टूर्सच्या संचालिका झेलम चौबळ आणि संचालिका संगीता पाटील उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डेव्हीड मॅथ्यूज्, प्रथम सचिव, वित्तीय सेवाप्रमुख, राष्ट्रकुल आणि विकास कार्यालय, ब्रिटिश उपउच्चायुक्त यांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. साग्निक चौधरी, उपमहासंचालक आणि प्रादेशिक संचालक (पश्चिम आणि मध्य भारत), पर्यटन मंत्रालय, भारत सरकार आणि चंद्रशेखर जैस्वाल, महाव्यवस्थापक, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळ होते. यावेळी सर्वोत्कृष्ट एअरलाईन्स, सर्वोत्कृष्ट टूर ऑपरेटर, सर्वोत्कृष्ट हॉटेल आणि इतर श्रेणींमधील उल्लेखनीय कामगिरीसाठी विविध पुरस्कार प्रदान करण्यात आले. या पुरस्कारासाठीचे ऑनलाईन मतदान पूर्ण झाल्यानंतर या क्षेत्रातील अनुभवी मान्यवरांनी अत्यंत अभ्यासपूर्ण मूल्यांकन करत पुरस्कार विजेत्यांची निवड केली. पुरस्कार मिळाल्याने सर्वस्तरातून कौतुकांचा वर्षाव करण्यात येत आहे.

### बार्शीत आज ब्राह्मण वधू-वर मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

येथील अनुरूप वधु वर सुचक केंद्राच्या वतीने रविवार, दि.१८ सर्व शाखीय ब्राह्मण वधु-वर परिचय मेळावा श्री प्लाझा मंगल कार्यालय, तानाजी चौक, बार्शी येथे सकाळी ११ वाजता आयोजीत केलेला आहे. प्रमुख पाहुणे म्हणून पत्रकार नीता देव उपस्थित राहणार आहेत. या केंद्राचा हा ४७ वा वधू-वर मेळावा असून मेळाव्यात वधू-वरांच्या रंगीत फोटो सहित असलेल्या पुस्तिकेचे प्रकाशन व वितरण करण्यात येणार आहे. पुस्तिकेमध्ये प्रथम वधु-वर घटस्फोटीत, विधवा,



विदुर, पुनर्विवाह इच्छुकांसह मराठवाडा, कर्नाटक, तेलंगणा, पश्चिम महाराष्ट्र, कोकण भागातील वधू-वरांचा समावेश आहे. मेळाव्याच्या दिवशीही नोंदणी सुरू राहणार असून पालकांनी वधू-वरांसह, फोटो व माहीती पत्रिका घेऊन उपस्थित रहावे. उपस्थित वधू-वरांचा परिचय करून देण्यात येणार आहे. ब्राह्मण समाज बांधवांनी या मेळाव्याचा लाभ घ्यावा असे आवाहन संस्थेच्या संचालिका सौ प्रेरणाताई रानडे यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी भ्रमणध्वनी क्रमांक ९८८११३३१२२ संपर्क साधावा.

## रेल्वे पोलीस ठाणे जिल्हा न्यायालयास जोडावे

### ● सोलापूर बार असोसिएशनची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

सोलापुरातील वकील, फिर्यादी, साक्षीदार, पोलिस, आरोपी व नागरिकांना कामकाज करण्यासाठी सोयीचे व्हावे, यासाठी सोलापूर लोहमार्ग पोलिस ठाणे यांच्या न्यायालयाचे कार्यक्षेत्र असणारे लोहमार्ग न्यायालय दौंड हे बदलून सोलापूर जिल्हा न्यायालयाला जोडण्यात यावे, अशी मागणी सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने करण्यात आली आहे. यासाठी उच्च न्यायालय व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदन दिल्याची माहिती अध्यक्ष ॲड. अमित आळंगे यांनी केली आहे.

सोलापूर रेल्वे विभागाचे पोलिस ठाणे हे पुणे लोहमार्ग जिल्हा अंतर्गत आहे. या पोलिस ठाण्याची हद्द ६० कि.मी पर्यंत असून कर्नाटक राज्याशी जोडलेली आहे. पोलिस ठाण्यातील दाखल गुन्हे व अटक आरोपीचे कामकाज हे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी लोहमार्ग न्यायालय दौंड, जिल्हा पुणे यांचे अंतर्गत चालवले जाते. वकील, फिर्यादी, साक्षीदार, पोलिस, आरोपींना कोर्ट कामकाजासाठी सोलापूर ते दौंड ते सोलापूर असा किमान १२ ते १४ तासांचा वेळ द्यावा लागतो. त्यामुळे सोलापूर रेल्वे पोलिस ठाणे कामकाज प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी न्यायालय सोलापूर अंतर्गत चालवल्यास प्रवासाचा वेळ, खर्च वाचेल आणि सर्वांच्या सोयीचे होईल. वाढत्या प्रवासी संख्येनुसार दिवसेंदिवस गुन्ह्याचे प्रमाणही वाढत आहेत. तसेच पुणे लोहमार्ग जिल्ह्यामध्ये मिरज लोहमार्ग पोलिस ठाण्याचे कोर्ट कामकाज हे सांगली-मिरज जिल्हा न्यायालय या स्थानिक न्यायालयात चालवले जाते. याच धर्तीवर सोलापूर रेल्वे पोलिस ठाणे हे सोलापूर जिल्हा न्यायालयास जोडण्यात यावे, अशी मागणी सोलापूर बार असोसिएशनच्यावतीने उच्च न्यायाधीश, उच्च न्यायालय मुंबई यांच्याकडे सोलापूर बार असोशिएनच्यावतीने करण्यात आले आहे.

## मनपा शाळेत रक्षाबंधन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

बहीण भावाचा अतूट नात्याच पवित्र बंधन मनजे रक्षाबंधन होय. हाच पवित्र रक्षा बंधन सण शहरातील मनपा देशमुख शाळेत उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी चिमुकल्या मुलींनी आपल्याच वर्गातील मुलांच्या मनगटावर राखी बांधून त्यांना मिठीई खाऊ घातली. मुलांनी देखील बहिणीच्या पाया पडून त्याचं आशिर्वाद घेतले.

> शाळेमध्ये मुलांना विविध सणांचे महत्व कळण्यासाठी विविध उपक्रम साजरा करत असतो. त्याच अनुषंगाने रक्षाबंधन सणाचे महत्व कळावे, यासाठी हा सण दरवर्षी साजरा केला जातो. याच पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना विविध सणांची माहिती होण्यासाठी शिक्षक नेहमीच प्रयत्नशील असतात.
>
> **- राहुल पाटील,**
> मुख्याध्यापक, मनपा देशमुख वस्ती शाळा

> शाळेमध्ये रक्षाबंधन आनंदात साजरा केला जातो. शाळेतील भावांसाठी आम्ही राख्या आणतो. आणि ते आमच्यासाठी गिफ्ट घेऊन येतात एक वेगळा आनंद यातून आम्हाला मिळतो.
>
> **- आदिती बंडू खुर्द,**
> विद्यार्थिनी, मनपा देशमुख वस्ती शाळा

## हजारो विद्यार्थ्यांनी साजरा केला सामुदायिक रक्षाबंधनाचा सोहळा

### ● प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

प्रबुद्ध भारत तरुण मंडळ (पी.बी. ग्रुप.) च्या वतीने विविध शाळेतील विद्यार्थी व विद्यार्थिनींच्या उपस्थितीमध्ये सामुदायिक रक्षाबंधन महासोहळा हर्ष उल्हास मध्ये साजरा करण्यात आला. दरवर्षी हा उपक्रम प्रबुद्ध भारत तरुण मंडळाच्या वतीने साजरा केला जातो.



यावेळी फौजदार चावडी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक दिलीप शिंदे, माजी नगरसेवक व पी बी ग्रुपचे संस्थापक आनंद चंदनशिवे, नगरसेवक गणेश पुजारी, उद्योजक पुरुषोत्तम धूत, बाळे पोलीस चौकीचे उपनिरीक्षक पाटील, इथॉस रियालिटी संस्थेच्या संचालिका अंजली वाघमारे, ॲड. स्वाती मस्के, ॲड. विशाल मस्के यांच्या हस्ते हस्ते दीप प्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. या मान्यवरांना कुंकाचे तिलक लावून राखी बांधण्यात आले. यानंतर विविध शाळेतील विद्यार्थिनींच्या वतीने येथे जमलेल्या विद्यार्थ्यांना कुंकाचे तिलक लावून राखी बांधण्यात आले.

यावेळी गांधीनाथा रंगजी इंग्लिश मीडियम स्कूल, रावजी सखाराम हायस्कूल, दिगंबर जैन गुरुकुल प्रशाला, रावजी सखाराम प्राथमिक शाळा, दमाणी विद्यामंदिर, म.न.पा. मुलांची शाळा क्रमांक ११, म.न.पा. मुलांची शाळा क्रमांक २७, श्राविका महाविद्यालय आदी प्रशालेतील शिक्षक उपस्थित होते.

याप्रसंगी पोलिस हवालदार प्रवीण भोसले, भारत बाबरे, आरोग्य निरीक्षक बच्चू एन.आर, आरोग्य निरीक्षक सुधीर वाघमोडे, प्रबुद्ध भारत तरुण मंडळाचे अध्यक्ष आदित्य चंदनशिवे, सचिव मुन्ना केशपागा, उपाध्यक्ष रवी म्यातरल्लू, अविनाश भडकुंबे, शेरा मोकाशी, राहुल बागले, राम सर्वगोड, गौतम शिंदे, सतीश अडाकुल, प्रथमेश सुरवसे, सिद्धार्थ तळभंडारे, सुमित चंदनशिवे, जॉकी भडकवाड, जयराज सांगे, आदित्या साबळे, समाधान सकट, आशुतोष इंगळे, तळभंडारे व मंडळाचे कार्यकर्ते उपस्थित होते.

## एक राखी भारतीय सैनिकांसाठी

### ● पंढरपुरातील नाईकनवरे परिवाराचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑगस्ट-**

पंढरपुरातील संतपेठ भाईभाई चौक येथील समाजसेवक दीपक राजाराम नाईकनवरे यांनी एक राखी भारतीय सैनिकांसाठी हा उपक्रम राबवून समाजापुढे आदर्श निर्माण केला आहे. नाईकनवरे परिवार दर वर्षी सीमेवर हजारो राख्या पाठवमाम.



त्यांचे वडील ज्येष्ठ समाजसेवक स्व. राजाराम महादेव नाईकनवरे यांचा वारसा त्यांची पत्नी व मुले पुढे चालवतात.

त्यांचा मोठा मुलगा मेजर विक्रम नाईकनवरे व दीपक नाईकनवरे, त्यांचे दोन मुलं, नातू, जावई, सर्व नातेवाईक दादांचा वारसा जोपासतात आणि समाजामध्ये एक आदर्श निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. मेजर विक्रम राजाराम नाईकनवरे हेसुद्धा सीमेवर कार्य करत आहेत. त्यांची मातोश्री सुनंदा राजाराम नाईकनवरे यांना आपला मुलगा देश सेवेसाठी काम करतो हे मला अभिमान आहे. देशातील ९ युनिटमधील जवानांना राख्या पाठवल्या आहेत. यावेळी अधिकारी सोमनाथ गायकवाड, विनोद धायगुडे, सपना सलगर, वैजनाथ महामुनी, शेख, सुनंदा नाईकनवरे, दीपक नाईकनवर, राणी खंडागळे उपस्थित होते.

### आदर्श शिक्षक गौरव पुरस्कारासाठी प्रस्ताव पाठविण्याचे आवाहन

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**


निर्भय प्रतिष्ठान ट्रस्ट (मुंबई) यांच्यातर्फे सोलापूर जिल्ह्यातील शैक्षणिक क्षेत्रात मोलाची कामगिरी बजावणाऱ्या उपक्रमशील शिक्षकांना रविवार दि. ८ सप्टेंबर रोजी शिक्षकांना आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात येणार आहे. तरी इच्छुक शिक्षकांनी आपले प्रस्ताव सादर करावेत, असे आवाहन राज्य विभाग प्रमुख इकबाल बागमारु, जिल्हा विभाग प्रमुख वरिष्ठ सोनकांबळे, सचिव जब्बर शिकलगार यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी इक्बाल बागमारु ९८२३३६६४४५, जब्बार शिकलगार ९८५०२८२९२४ संपर्क साधावे.

## माजी आ. नारायण पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जेऊर येथे विविध कार्यक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**करमाळा, दि. १७ ऑगस्ट-**

माजी आमदार नारायणआबा पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त जेऊर येथे शुक्रवारी २३ ऑगस्ट रोजी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.


मुंबई उच्च न्यायालयाचे माजी न्या. बी. जी. कोळसे-पाटील यांच्या हस्ते त्यांचा सत्कार होणार आहे. यावेळी आ. रणजितसिंह मोहिते-पाटील, आ. रोहित पवार, खा. धैर्यशील मोहिते-पाटील उपस्थित राहणार असल्याचे प्रा डॉ. संजय चौधरी यांनी सांगितले. यावेळी प्रा. अर्जुन सरक, सरपंच पृथ्वीराज पाटील, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी संचालक देवानंद बागल उपस्थित होते. गुरुवारी २२ रोजी भारत महाविद्यालयात पत्रकार संजय आवटे यांचे व्याख्यान सकाळी १० वाजता होणार आहे. सकाळी ९ वाजता युवानेते पृथ्वीराज पाटील मित्रमंडळ मिनी मॅरेथॉन होणार असून, प्रथम क्रमांकाच्या विजेत्यास १५ हजार बक्षीस देण्यात येणार आहे. तब्बल २५ विजेत्यांना बक्षिसे दिली जाणार आहेत. रक्तदान शिबीर होणार आहे. शुक्रवारी २३ ऑगस्ट रोजी दु. २ वा. न्या. बी.जी. कोळसे-पाटील यांचे व्याख्यान होणार आहे. जेऊर ग्रामस्थांच्या वतीने माजी आ. नारायणआबा पाटील यांचा सत्कार होणार आहे. यासह वाढदिवसानिमित्त जेऊर येथे शुक्रवारी विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.



### बार्शीत भरदिवसा मोटारसायकलची चोरी

**बार्शी, दि. १७ ऑगस्ट -**

बार्शी शहर पोलीस ठाण्यापासून जवळच असलेल्या परिसरातून राहत्या घरासमोर लावलेली मोटारसायकल जेवण करुन बाहेर येईपर्यंत चोरीला गेली. संभाजी दत्तात्रय सोत्रे (रा. मल्लप्पा धनशेट्टी रोड, बार्शी) यांनी शहर पोलिसांत याची फिर्याद दिली आहे.मोटरसायकल (क्र. एम. एच. १३/ बी. एल. २५९५) घरासमोर लावून ते जेवण करण्यासाठी घरात गेले होते. जेवण झाल्यानंतर घरातून बाहेर येऊन पाहिले तेव्हा मोटरसायकल चोरीला गेल्याचे दिसून आले. ही घटना १३ ऑगस्ट रोजी रात्री ९ ते १० च्या दरम्यान घडली.



हे पत्र मुद्रक व प्रकाशक दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : विवेक कृष्णाजी घळसासी. ● समूह मुख्य संपादक : दिलीप यशवंत पेठे.● मुख्य संपादक :प्रशांत वसंतराव माने दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. E-mail starunbharatgmail.com. ● Website:http://dainiktarunbharat/ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi** - Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

CMYK

# सोलापूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## सोलापुरात आज जिल्हास्तरीय व्यापारी परिषदेचे आयोजन


### २७ ऑगस्टला महाराष्ट्र राज्यव्यापी आडत व्यापारी बंद

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

अन्नधान्याला जीएसटी लागू झालेला असल्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीतील सध्या सुरू असलेला सेसकर रद्द झाला पाहिजे यासह अन्य मागण्यासाठी मंगळवार दि. २७ ऑगस्ट रोजी कृषी उत्पन्न बाजार समिती व खाद्य वस्तूंचा व्यापार करणारे बंद पाळणार आहेत,अशी माहिती भुसार आडत व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेश चिक्कळी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

जीएसटी कायदा अधिक सुटसुटीत करावा. दर महिना रिटर्नची संख्या कमी करावी. खरेदीवरील सेटऑफ संबंधी मागील अडचणी दूर कराव्यात.अन्नधान्याला जीएसटी लागू करताना सेस कर रद्द केला जाईल असे सांगण्यात आले पण तशी कृती झालेली नाही. व्यापाऱ्यांनी या संबंधात अनेकदा पाठपुरावा केला पण राज्य शासन या प्रकरणी दखल घेत नाही. यामुळे मंगळवारी २७ ऑगस्टला महाराष्ट्र राज्य व्यापी व्यापारी बंद करण्यात येणार आहे. या पार्श्वभूमीवर रविवार दि. १८ ऑगस्ट रोजी सोलापुरात जिल्हास्तरीय व्यापारी परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी राज्य चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष ललित गांधी, फ ेडरेशनचे मुंबई अध्यक्ष जितेंद्र शहा, चेंबर ऑफ महाराष्ट्र असोसिएशन इंडस्ट्रीज अँड ट्रेड चे दिपेन अग्रवाल, ग्रेन राईस अँड ओईल सीड्स म र्चंट असोसिएशन मुंबईचे अध्यक्ष भीम भानुशाली आणि व्यापारी मंडळी उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत. यावेळी अशोक संकलेचा, वैभव बरबडे, महालिंगप्पा परमशेट्टी, सिद्धया स्वामी, श्रीशैल अंबारे उपस्थित होते.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



**सोलापूर : अॅड. शांतवीर व अॅड. वैशाली महिंद्रकर यांच्या घरी श्रावण शुक्रवार, एकादशीच्या दिवशी ब्रह्मकमळ उमलले.**

### अज्ञात चोरट्याने दुचाकी पळवली

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शासकीय वसाहत जवळ असलेल्या वॉल कंपाऊंड लगत पार्क केलेली दुचाकी क्रमांक एमएच १३ बीपी ०४४८ ही अज्ञात चोरट्याने चोरून नेली आहे. ही घटना १६ ऑगस्ट रोजी दुपारी तीन ते सायंकाळी सहा वाजण्याच्या दरम्यान घडली. याप्रकरणी भीमराव गणपती झाडे (वय ३८, रा. स्वेंदबिदी निवास, पत्रकार नगर) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार फुटाणे हे करीत आहेत.

### अज्ञात चोरट्याने लोखंडी ट्रेनिंग स्लॅबच्या प्लेटा पळवल्या

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

शुभराय आर्ट गॅलरी सोलापूर म हानगरपालिकेच्या पाठीमागील बाजूस असलेल्या साईटवरून अज्ञात चोरट्याने ३० हजार रुपये किमतीच्या १५ नग लोखंडी सेंट्रेनिंगच्या प्लेटा चोरून नेल्याची घटना १५ ऑगस्ट रोजी घडली. याप्रकरणी युवराज राजेंद्र लवटे (वय २०, रा. अण्णाभाऊ साठे नगर, ता. मोहोळ) यांनी सदर बझार पोलीस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार जाधव हे करीत आहेत.

### एटीएममधील रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

कुमठा नाका परिसरातील छोटूवाले नागनाथ घागरे यांच्या घरासमोर असलेल्या गाळ्यामध्ये हिताची कंपनीचे एटीएम क्रमांक एमपीबी००२४ या एटीएम मशीनच्या समोरील पत्र्याचा दरवाजा अज्ञात चाराने कशाच्यातरी साह्याने उचकटून एटीएम मधून रक्कम चोरी करण्याचा प्रयत्न केला आहे व कॅमेरा तोडून नुकसान केले आहे. ही घटना १५ ऑगस्ट रोजी कुमठा नाका येथे घडली. याप्रकरणी आशिष अशोक वाघमारे (वय ३६, रा. तोडकर वस्ती, बार्शी रोड, बाळे) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार चव्हाण हे करीत आहेत.

### एसटी बसमधून तरुणीचा लॅपटॉप लंपास

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

पुणे-उमरगाला जाणाऱ्या एसटी बस प्रवादरम्यान यामध्ये सोलापूर स्थानकात वरील सीटच्यावर ठेवलेली काळ्या रंगाची लॅपटॉप असलेली बॅग अज्ञात चोरट्याने मुद्दामून लबाडीने चोरून नेल्याची घटना १४ ते १५ ऑगस्ट दरम्यान सोलापूर बस स्थानक येथे घडली. याप्रकरणी आश्विनी माधव शिंदे (वय २५, रा. शिंदे कॉलनी, उमरगा जि. धाराशिव) हिने दिलेल्या फिर्यादीवरुन फौजदार चावडी पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार पवार हे करीत आहेत.

# दर्शन मंडप, स्काय वॉकसाठी 110 कोटी

## पंढरपूर विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या आराखड्याला उच्च अधिकार समितीची मान्यता

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. १७ ऑगस्ट-**

विठ्ठल-रुक्मिणीच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांच्या संख्येचा विचार केला असता सध्याची दर्शन रांग व्यवस्था अत्यंत अपुरी आहे. त्यामुळे दर्शन मंडप व स्काय वॉकच्या माध्यमातून भाविकांना सुलभ दर्शन व्यवस्था होण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशासनाने १२९ कोटींचा आराखडा तयार केलेला होता. त्याला १६ ऑगस्ट रोजी राज्याच्या मुख्य सचिव सुनिता सौनिक यांच्या अध्यक्षतेखालील उच्च अधिकार समितीच्या बैठकीत दर्शन मंडप व स्काय वॉकसाठी ११० कोटीचा आराखडा समितीने मंजूर केला आहे.

मुंबई येथे झालेल्या बैठकीला जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, जिल्हा नियोजन अधिकारी दिलीप पवार, सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन अधीक्षक अभियंता संजय माळी, श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, सहाय्यक जिल्हा नियोजन अधकारी पुंडलिक गोडसे उपस्थित होते. जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी यामध्ये कोणत्याही भाविकाला दर्शन रांगेत त्रास होऊ नये या अनुषंगाने सर्व सोयी सुविधा रांगेत उपलब्ध करून देण्याबाबतचे निर्देश सार्वजनिक बांधकाम विभागाला दिलेले होते.



### दर्शन रांगेतील सुविधा

दर्शन रांगेत भाविकांसाठी पिण्याचे पाणी, शौचालयाची सुविधा, वेटिंग हॉल, दर्शनासाठी टोकन घेण्याची सुविधा, रिफ्रेशमेंट, आपत्तीमध्ये बाहेर पडण्याची व्यवस्था, हिरकणी कक्ष, दिव्यांगासाठी सुविधा, अग्निविरोधक सुविधा, पोलीस, जेवणाची व्यवस्था, पार्किंगची सुविधा या बाबींचा समावेश आराखड्यात करण्यात आला आहे.

> मंदिर समितीन २०१८ मध्ये तत्कालिन अध्यक्ष डॉ. अतुल भोसले यांच्या अध्यक्षतेखाली सभेत ठराव केला होता. त्यासाठी बेरी आर्किटेक्ट, कोल्हापूर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. आराखड्यास कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, पुणे यांची तांत्रिक मान्यता घेतली आहे व निधी मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केला आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आषाढी एकादशीच्या निमित्ताने पाहणी दौरा व शासकीय महापूजेला आल्यानंतर त्यांना निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यास त्यांनी तात्काळ तत्वत: मंजुरी देऊन, जिल्हाधिकारी यांना सूचना दिल्या होत्या. हे काम पूर्ण झाल्यानंतर तिरूपती देवस्थानच्या धर्तीवर टोकण दर्शन व्यवस्था सुरू होऊन भाविकांना सुलभ व जलद दर्शन मिळणार आहे.
>
> **- गहिनीनाथ महाराज औसेकर,** सहअध्यक्ष, विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समिती, पंढरपूर

त्यानुसार पंढरपूर येथील सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता अमित निमकर व सोलापूर जिल्हा सार्वजनिक बांधकाम विभागाचे तत्कालीन अधीक्षक अभियंता संजय माळी यांनी सर्व सोयीसुविधांनीयुक्त असलेला १२९ कोटींचा आराखडा कार्यकारी समितीला सादर केला. जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीने या आराखड्याला मान्यता प्रदान केली. त्यानंतर हा आराखडा पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हास्तरीय समितीत सादर करण्यात आला व या समितीनेही या आराखड्याला मान्यता दिली.

उच्चाधिकार समितीने मान्यता दिल्यानंतर मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस, उपमुख्यमंत्री अजित पवार हे सदस्य आसलेल्या राज्य शिखर समितीकडे हा आराखडा सादर केला जाईल. साधारणत: सप्टेंबर महिन्याच्या मध्यापर्यंत राज्य शिखर समितीचे बैठक होऊन पंढरपूरच्या दर्शन मंडप व स्काय वॉक आराखड्यास अंतिम मान्यता मिळेल व त्यानंतर लवकरच शासन निर्णय निघेल, अशी माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

## श्री नीलकंठेश्वर मंदिरात शिव-पार्वती कल्याणोत्सव





### भाविकांनी अनुभवला देवांचा विवाह सोहळा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट -**

श्रीमद् वीरशैव कुरुहिनशेट्टी ज्ञाती संस्थेच्या वतीने आयोजित श्री शिव पार्वती कल्याणोत्सव श्री निळकंठेश्वर मंदिरात मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. पवित्र श्रावण महिन्यात हा उत्सव सालाबाद प्रमाणे दरवर्षी साजरा केला जातो.

सकाळी सहा वाजण्याच्या सुम ारास मंदिर संस्थेच्या वतीने मंगल वाद्यांच्या गजरात सुवासिनी महिलांनी आपल्या डोक्यावर जलकुंभ घेऊन शहरातील विविध भागात मिरवणूक काढली. या जलकुंभ मिरवणूकीस अनेक वर्षांपासूनची परंपरा कायम आहे. तद्नंतर भगवान श्री शिव पार्वती यांचा कल्याणोत्सव मोठ्या भक्तीभावात संपन्न झाला. यावेळी अनेक अबालवृद्ध भाविकांनी याची देही याची डोळा देवांचा विवाह सोहळा अनुभवला. त्यानंतर मंदिरात विविध धार्मिक विधी आणि कार्यक्रम संपन्न करण्यात आले.

दरम्यान दुपारी मंदिर परिसरात शिवभांडार महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये असंख्य भाविक भक्तांनी या कार्यक्रमास उपस्थित दर्शवून महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी मंदिर परिसरात सारे वातावरण चैतन्यमय झाले होते. यावेळी संस्थेचे सल्लागार सुदर्शन म ादगुंडी , अध्यक्ष बालाजी मुटकिरी, सेक्रेटरी सत्यनारायण द्यावरकोंडा, सर्व विश्र्वस्त सह हजारोंच्या संख्येने शिवभक्त समाज बांधव उपस्थित होते.

## बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक; सहा जणांवर गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

व्याजाचे पैसे देऊन ते पैसे मि ळवण्यासाठी मानसिक त्रास देऊन बनावट कागदपत्रांच्या आधारे फसवणूक केल्याप्रकरणी सहा जणांविरुद्ध जेलरोड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी कृष्णाहरी व्यंकटनसू सिंघम (वय ६५, रा. दत्त नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन रमेश रेवणसिध्द येदूर, माणिक रेवणसिध्द येदूर, स्वरुप माणिक येदूर, प्रमिला रमेश येदूर, मिनल माणिक येदूर, अश्विनी स्वरुप येदूर (सर्व रा. २६६/१६, रविवार पेठ, सोलापूर) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

१ जानेवारी २०१५ ते २३ मार्च २०२३ या कालावधीत रमेश येदूर व इतरांनी कृष्णहारी सिंगम यांना व्याजाने पैसे दिले होते. ते पैसे परत मिळविण्यासाठी सिंगम यांना येदूर यांनी मानसिक त्रास दिला तसेच येदूर यांनी सिंगम यांना बनावट कागदपत्रांच्या आधारे त्यांची फसवणुक करून त्यांचा विश्वासघात न्यायालयासमोर खोटा कथन केला. खोटा पुरावा असल्याचे माहिती असून ते खरे आहे म्हणून रकमेसाठी कपटीपणाने हुकूमनामा मिळवला. तसेच फिर्यादीची फसवणूक करत ठकवणुक करण्यासाठी बनावट मूल्यवान रोखेद्वारे आर्थिक फायद्यासाठी बनावट बेकायदेशीर रित्या सावकारी धंदा करून सिंगम व त्यांची पत्नी यांचा छळ केला. म्हणून जेलरोड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक डेरे हे करीत आहेत.




**इंडियन मेडिकल असोसिएशनच्यावतीने मोर्चा...**

**सोलापूर : कोलकत्ता येथे महिला डॉक्टरावर अत्याचार करून खून करण्यात आल्याच्या घटनेच्या निषेधार्थ शनिवारी इंडियन मेडीकल असोसिएशनच्यावतीने डॉक्टरांनी संप पुकारून मोर्चा काढला. यामध्ये शहरातील सर्व डॉक्टर, डॉक्टरांच्या सर्व संघटना, वैद्यकीय महाविद्यातील डॉक्टर, वैद्यकीय शिक्षण घेणारे विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.**

## संविधानाच्या नावाने विरोधकांकडून फूट पाडण्याचा प्रयत्न : अॅड. निकाळजे

### संविधान जागर यात्रेचे सोलापुरात स्वागत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

जेव्हा जेव्हा गैर काँग्रेसचे सरकार येथे तेव्हा संविधानाबाबत गैरसमज पसरवला जातो. संविधान बदलणार, मनुस्मृती आणणार, लोकशाही संपविणार अशा प्रकारचा गैरसमज आणि संभ्रम निर्माण करून लोकांमध्ये फूट पाडण्याचा प्रयत्न विरोधकांकडून केला जातो, असा आरोप अॅड. वाल्मीक निकाळजे यांनी पत्रकार परिषदेत केला आहे.

संविधान जागर समिती महाराष्ट्रच्या वतीने राज्यभरात संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त संविधान जागर यात्रा काढण्यात येत आहे. ही यात्रा सोलापुरात आली असताना या सुकाणू समितीचे सदस्य अॅड. निकाळजे यांच्यासह सदस्यांनी भूमिका स्पष्ट केली.

सत्याग्रह भूमी महाड ते चैत्यभूमी दादर पर्यंत ९ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर दरम्यान ही संविधान जागर यात्रा काढण्यात येत आहे. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत संविधान बदलणार असल्याबाबत निर्माण केलेला गैरसमज दूर करण्यासाठी ही यात्रा काढण्यात येत आहे. अॅड. निकाळजे म्हणाले, संविधान बदलणार असल्याचा गैरसमज पसरवून समाजात दुफळी आणि द्वेष निर्माण करण्याचे काम विरोधकाकडून होत आहे.




फुले, शाहू, आंबेडकर यांचा विचार मानणारा कट्टर राष्ट्रभक्त वर्ग आहे. त्यांची संविधानांवर आगाध निष्ठा आहे. संविधानातील कलम १३ अन्वये संविधानाची मूलभूत चौकट बदलता येणार नाही, अशी भक्कम तरतूद आहे. सर्वोच्च न्यायालयानेही हे स्पष्ट केले आहे. या पत्रकार परिषदेस राजेंद्र गायकवाड, स्नेहा भालेराव, योजना ढोकळे, शहराध्यक्ष नरेंद्र काळे, राजू माने, प्रा. नारायण बनसोडे, अजित गायकवाड आदी उपस्थित होते.

# नक्षत्र बदलाने शहर, जिल्ह्यात ऊन पावसाचा खेळ

## दिवसा रखरखीत ऊन; रात्री मेघगर्जना अन् रिपरिप पावसाच्या सरी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि १७ ऑगस्ट -**

सोलापूर शहर जिल्ह्यातील वातावरणात गेल्या काही दिवसांपासून बदल होत आहे. दिवसा कडकडीत ऊन तर रात्री मेघगर्जनेसह दमदार पाऊस कोसळत असल्याने सोलापूरकरांना सकाळी उन्हाळा आणि रात्री पावसाळा असे दोन्ही ऋतू एकाच दिवसात अनुभवण्यास मिळत आहे.

स्वातंत्र्य दिनानंतर शुक्रवारी नक्षत्र बदल झाला आहे. नवे नक्षत्र मघा सुरू आजपासून सुरू झाला आहे. त्यानुसार मघा नक्षत्र सुरू झाल्यानंतर नक्षत्राच्या पहिल्या सरी गुरुवारी रात्री उशिरा मेघगर्जनेसह दमदार कोसळल्या. शहरातील हद्दवाढ भागातील अनेक ठिकाणी या पावसाची दमदार हजेरी लागली. मघा नक्षत्र जोरदार पावसासाठी नाही तर कोरड्याठाक उन्हाळा यासाठी प्रसिद्ध आहे. यामुळे 'मघा तर मघा, ढगाकडे बघा, नाहीतर चुली पुढे बसा,' अशी म्हण अनेक वर्षांपासून प्रचलित आहे. मघा नक्षत्र जोरदार पाऊस घेऊन येईल असा अंदाज व्यक्त करण्यात येत आहे.



### नागरिकांचे आरोग्य धोक्यात


सोलापूर शहर, जिल्ह्यात सुरू असलेल्या ऊन पावसाचा लपंडाव नागरिकांना त्रासदायक ठरत आहे. सकाळी रखरखीत उन्हाचा तडाखा अन् संध्याकाळी जोरदार बरसणाऱ्या जलधारा सहन कराव्या लागत आहेत. यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. ऊन आणि दुपारनंतर जोराचा पाऊस यामुळे व्हायरल इन्फेक्शन तसेच सर्दी, खोकला, ताप, डेंग्यू, रुग्णाची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. शहरात पावसाळा ऋतू आहे, की उन्हाळा नागरिकांना हेच कळेनासे झाले आहे.

शेत शिवारात पेरणी केलेल्या पिकांना रिपरिप पावसाची गरज असताना त्याठिकाणी म्हणावा तसा पाऊस बरसत नाहीत. अनेक नक्षत्रे अशीच कोरडी गेल्याने आलेला नवा नक्षत्र नवा पाऊस घेऊन येईल आणि त्यामुळे या नव्या नक्षत्रात वरुणराजाची कृपादृष्टी आपल्यावर बरसेल अशी बळीराजाकडून आशा व्यक्त केली जात आहे.

### हद्दवाढ भागातील अनेक ठिकाणी दमदार पाऊस

शहरातील काही भागात जोरदार पाऊस तर दुसऱ्या भागात पाऊसच पडला नसल्याने शहरात ऊन पावसाचा खेळ पहावयास मिळत आहे. दिवसा कडकडीत ऊन, संध्याकाळी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह दमदार पावसाची हजेरी लागत आहे. हद्दवाढ भागात पाऊस कोसळत असतो. मात्र शहरी भागात पावसाचा टिपूस देखील पडला नसल्याने शहरात ऊन पावसाचा खेळ पहावयास मिळत आहे.

# ते तर हिमनगाचे एक टोक



- बेकायदेशीर बांधकाम परवाना प्रकरणी अखेर गुन्हा दाखल झाल्याने छडा लागणार
- महापालिकेतील बेकायदा समांतर यंत्रणा येणार उजेडात
- वरिष्ठ अधिकारी आणि त्या बांधकाम व्यवसायिकांचे काय? हा प्रश्न मात्र अनुत्तरित

**तभा वृत्तसेवा । किरण बनसोडे**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

सोलापूर महापालिकेतील बांधकाम विभागात बेकायदा समांतर यंत्रणा राबवून चक्क बोगस बांधकाम परवाने देऊन महापालिकेच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचवण्याच्या प्रकार घडल्याने मोठी खळबळ उडाली होती.जानेवारी-२०२१ ते डिसेंबर-२०२२ या कालावधीत झालेल्या या प्रकरणी यापूर्वीही महापालिका आयुक्तांनी संबंधित तिघांवर सक्तीची सेवानिवृत्ती, दंड आणि एका कर्मचाऱ्यास दंडाची कारवाई केली. आणि अखेर स्वातंत्र्य दिना दिवशीच या गंभीर प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हे प्रकरण तर हिमनगाचे एक टोक आहे. चौकशीअंति अनेक बाबी उघड होण्याची शक्यता आहे.

संगनमताने महानगरपालिकेची व अर्जदारांची जाणीवपुर्वक त्यांच्या फायद्यासाठी फसवणूक केल्याप्रकरणी महानगर पालिका बांधकाम परवाना विभागातील झेड. ए. नाईकवाडी (तत्कालीन सहा. अभियंता), श्रीकांत खानापुरे (तत्कालीन कनिष्ठ अभियंता) , शिवशंकर घाटे (तत्कालीन कनिष्ठ अभियंता) व आनंद क्षिरसागर (तत्कालीन कनिष्ठ श्रेणी लिपिक) यांच्या विरोधात सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील सर्व दस्त हे जाणीवपूर्वक नाश अथवा त्याची विल्हेवाट अथवा ते कोठेतरी स्थलांतरित केले. महापालिकेकडे केवळ कमी विकास शुल्क जमा करण्यास लावून महानगरपालिकेचे २ लाख ४२ हजार ४०८ रूपयांचे आर्थिक नुकसान केले असून ती केवळ हीमनगांच्या टोका एवढी आहे. सर्व प्रकरणांची कागदपत्रे हाशील होणे जरुर असून त्या करीता सर्व प्रकरणे शोधून काढणे, आवक रजिस्टरचा शोध घेणे आणि आवक नंबरचा शिक्का या सर्वांचा व त्यांनी जे हे २८ नकाशे सोडुन उर्वरीत नकाशे मंजुर केले आहेत. ती सर्व प्रकरणे हस्तगत करणे जरुरीचे आहे. अशाप्रकारे जानेवारी-२०२१ ते डिसेंबर-२०२२ या कालावधीत समांतर राबविण्यात आली.

**या कलमान्वये झाला गुन्हा दाखल**

याप्रकरणी महापालिकेचे बांधकाम विभागातील उपअभियंता नीलकंठ शिवानंद मठपती यांनी फिर्याद दिली आहे. भारतीय दंड संहिता १८६० च्या कलम ३४, ४०८, ४१९, ४२० , ४६६, ४६८, ४६९ ,४७१, ४७३, ४७६ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक अजित लकडे हे करीत आहेत.

**९६ प्रकरणांपैकी केवळ २८ बांधकाम व्यवसायिकांनी दिला प्रतिसाद**

याबाबत बांधकाम परवानगीचे जावक रजिस्टरची पडताळणी केल्यानंतर ९६ प्रकरणामध्ये संबंधित बांधकाम व्यवसायीकांना पत्र पाठवून त्यांच्याकडे असलेली बांधकाम परवानगीच्या प्रतीची मागणी केली असता केवळ २८ जणांनी त्यास प्रतिसाद दिला व त्यांचेकडील बांधकाम परवानगीचे नकाशे व संपुर्ण बांधकाम परवाना प्रकरण महानगरपालिकेकडे सादर केले. सर्व प्रकरणांची संपूर्ण नस्तीच अभिलेखात जमा न करता जाणून बुजून गहाळ केली. काहींनी मुळ प्रकरण महानगरपालिकेकडे असल्याचे सांगितले.

सदरची सर्व बांधकाम परवानगीची प्रकरणे ऑनलाइन पध्दतीचे नियमानुसार सादर केली असती तर कोणासही बांधकाम परवानगी मिळाली नसली याची या सर्वांना पूर्णपणे माहिती व जाणीव होती व त्यांनी बांधकाम व्यावसायीकांना हाताशी धरुन झेड.ए. नाईकवाडी, श्रीकांत खानापुरे, शिवशंकर घाटे, आनंद क्षिरसागर यांनी बेकायदेशीरपणे स्वतःच्या फायदयासाठी ती प्रकरणे परस्पर स्विकारुन ती मंजुरही होत नसताना युडीसीपीआर मधील तरतुदीनुसार छाननी न करता, सामासिक अंतरे इमारतीची उंची, एफएसआयची गणना योग्य प्रकारे न करता ज्यादा बांधकाम मंजुर केली.

**बेकायदेशीर झालेले बांधकाम जमीनदोस्त करणे अवघड !**

बेकायदेशीर बांधकाम परवान्यांमुळे महानगरपालिकेची पर्यायाने सोलापूर शहरातील नागरीकांचे व सार्वजनिक हिताच्या दृष्टीने नुकसान झालेले आहे. ते कधीही भरुन येणार नाही. परंतू त्यामुळे बेकायदेशीर झालेले बांधकाम जमीनदोस्त करण्याकरीता महानगरपालिकेकडे जी यंत्रणा राबवावी लागणार आहे. त्याची किंमत वसुल होणे अवघड असून त्याचा बोजा निष्कारण महानगरपालिकेवर पर्यायाने नागरिकांवर पडणार आहे, असे फिर्यादीत स्पष्ट करण्यात आले आहे.

झेड. ए. नाईकवाडी (सहा. अभियंता), श्रीकांत खानापुरे,(कनिष्ठ अभियंता), शिवशंकर घाटे, (कनिष्ठ अभियंता), व आनंद क्षिरसागर (क.श्रे.लि.) यांनी संगनमताने खोटी कागदपत्रे तयार करुन महानगरपालिकेची तसेच संबंधित अर्जदारांची हे बांधकाम परवाने देण्याचे त्यांना अधिकार आहे असे भासवून फसवणूक केली व त्या पदावर कार्यरत आहेत असे भासवून सदर चौघांनाही बांधकाम परवाना ऑफलाइन स्विकारण्याचे , ते मंजुर करण्याचे व ते पदावर कार्यरत ही नसताना व देण्याचे अधिकार नाहीत हे या सर्वांना माहित असूनही त्यांनी ते संगनमताने दिले. त्यांचा एकंदरीत महानगरपालिकेत नोकरीवर असलेल्याचा फायदा घेऊन त्यांनी महानगरपालिकेचा विश्वासघात केला व म हापालिकेच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचविला. या चौघा जणांच्या संगनमतामुळे विकास शुल्काची रक्कम कमी स्विकारुन महानगरपालिकेचे आर्थिक नुकसान केले. ती रक्कम जवळ जवळ २ लाख ४२ हजार ४०८ रूपये होत आहे. ती तक्तामध्ये नमुद केली आहे. ती केवळ आलेल्या मंजुर नकाशांच्या २८ नकाशांमधून आढळून आली असून ती केवळ हीमनगांच्या टोका एवढी आहे. सर्व प्रकरणांची कागदपत्रे हाशील होणे जरुर असून त्या करीता सर्व प्रकरणे शोधून काढणे, आवक रजिस्टरचा शोध घेणे आणि आवक नंबरचा शिक्का या सर्वांचा व त्यांनी जे हे २८ नकाशे सोडुन उर्वरीत नकाशे मंजुर केले आहेत. ती सर्व प्रकरणे हस्तगत करणे जरुरीचे आहे. अशाप्रकारे जानेवारी-२०२१ ते डिसेंबर-२०२२ या कालावधीत सोलापूर महानगर पालिका बांधकाम परवाना विभाग येथे झेड. ए. नाईकवाडी (तत्कालीन सहा. अभियंता), श्रीकांत खानापुरे (तत्कालीन कनिष्ठ अभियंता) , शिवशंकर घाटे (तत्कालीन कनिष्ठ अभियंता) व आनंद क्षिरसागर (तत्कालीन कनिष्ठ श्रेणी लिपिक) यांनी संगनमताने महानगरपालिकेची व अर्जदारांची जाणीवपुर्वक त्यांच्या फायद्यासाठी फसवणूक केलेली आहे. जे बांधकामाचे नकाशे मंजुर करण्याचे अधिकार त्यांना नाहीत हे त्यांना माहित असूनही त्यांनी ते मंजुर केल्याचे कागदपत्रे तयार करुन अर्जदारांची व महानगरपालिकेची फसवणूक केलेली आहे. खोटे व बनावट बांधकाम परवाने त्यांना दिले आहेत तसेच ते बांधकाम परवाने मंजुर केले बाबतचे आवक रजिस्टर व नमुद अनधिकृत बांधकाम परवाना क्र. ०१ ते ९६ संदर्भातील मंजुर करण्यात आलेल्या संदर्भाने सर्व दस्त हे जाणीवपूर्वक नाश अथवा त्याची विल्हेवाट अथवा ते कोठेतरी स्थलांतरित केले. महापालिकेकडे केवळ कमी विकास शुल्क जमा करण्यास लावून महानगरपालिकेचे २ लाख ४२ हजार ४०८ रूपयांचे आर्थिक नुकसान केले असल्याने तत्कालीन शासकीय कर्मचारी झाकिर हुसेन अल्लाबक्ष नाईकवाडी , श्रीकांत बसण्णा खानापुरे, आनंद वसंत क्षिरसागर , शिवशंकर बळवंत घाटे यांच्याविरुध्द सरकारतर्फे कायदेशीर फिर्याद आहे, असे नीलकंठ मठपती यांनी फिर्यादीत म्हटले आहे.

**ऑनलाइन ऐवजी ऑफलाइन पद्धतीने दिले परवाने**

नाईकवाडी खानापुरेंसह चौघांनी संगनमताने अनाधिकाराने ९६ प्रकरणे ऑफलाइन पध्दतीने बांधकाम परवान्यावर सह्या करुन मंजुर केलेचे आढळून आले. हे बांधकाम परवाना वास्तविक ऑफलाइन पध्दतीने स्विकारण्याचे नसताना त्यांनी ते परस्पर स्विकारले गेले.

**आणि यामुळे हे प्रकरण आले उजेडात**

या प्रकरणाची माहिती तुकाराम राठोड यांनी माहिती अधिकाराअंतर्गत एकुण चार जणांच्या बांधकाम परवानगीच्या मंजुरीच्या नकाशाच्या प्रतीची मागणी केली. त्यावेळी सदरचे नकाशे व प्रकरण रेकॉर्ड रूममध्ये जमा न झालेचे दिसुन आले. तसेच कर विभागाकडेही मंजुर नकाशाची प्रत त्यांचेकडे जमा झालेचे दिसुन आले नाही.

### यापूर्वी महापालिका आयुक्तांनी केली होती कारवाई

हे प्रकरण गांभीर्याने घेत संबंधित चौघा अधिकारी व कर्मचाऱ्यांना महापालिका आयुक्त शितल तेली - उगले यांनी तत्काळ निलंबित केले होते. दरम्यान, चौकशीअंती याप्रकरणी महापालिकेचे तत्कालीन सहाय्यक अभियंता तथा विभागीय अधिकारी (झोन क्रमांक - ८) झेड.ए. नाईकवाडी आणि तत्कालीन अवेक्षक श्रीकांत बसण्णा खानापुरे (नगररचना डीपी युनिट) या दोघांना एक लाख रुपये आर्थिक दंड आणि सक्तीची सेवानिवृत्तीची कारवाई करण्यात आली होती. तर नगर अभियंता कार्यालयातील तत्कालीन अवेक्षक शिवशंकर बळवंत घाटे हे सन २०२६ मध्ये निवृत्त होणार होते मात्र त्यांच्यावर याप्रकरणी सक्तीची निवृत्तीची कारवाई केलीहोती. तसेच कामगार कल्याण जनसंपर्क कार्यालयातील तत्कालीन वरिष्ठ श्रेणी लिपिक आनंद वसंत क्षीरसागर यांच्यावर त्यांची पार्श्वभूमी पाहून त्यांना २५ हजार रुपयांचा दंड आकारण्यात आला होता. आणि अखेर १५ ऑगस्ट २०२४ रोजी या चौघा जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

### अशा पद्धतीने सह्या ठोकून दिले जात होते परवाने

काही बांधकाम परवान्यावर श्रीकांत खानापुरे यांनी कनिष्ठ अभियंता म्हणून त्यावर सह्या केल्या व काही बांधकाम परवानावर शिवशंकर घाटे यांनी स्वाक्षरी केल्या. या दोनही कनिष्ठ अभियंता यांच्याकडून आलेल्या बांधकाम परवाना वरती झेड. ए. नाईकवाडी यांनी सहायक अभियंता म्हणून मंजुरीच्या स्वाक्षरी केल्या आहेत. आनंद क्षिरसागर यांनी नाईकवाडी यांनी मंजुर केलेल्या प्रकरणावर बांधकाम परवाना नंबर नमुद करुन फक्त अर्जदारास एक प्रत दिली. परंतू एक प्रत कर विभागाला व बांधकाम परवानाचे मुळ प्रकरण रेकॉर्ड रूम मध्ये ठेवण्याची पध्दत असताना दोन्हीकडे त्या प्रत जमा केल्या नाहीत. तसेच जावक रजिस्टर मध्येही काही जागा व बांधकाम परवानगी क्रमांक नमुद करुन रकाना कोरे सोडले आहेत. अशा पद्धतीने बेकायदेशीरपणे हे बांधकाम परवाने दिले जात होते.

### नेमके काय आहे हे प्रकरण ?

- बांधकाम व्यावसायीकांना हाताशी धरुन केला कारनामा
- संपूर्ण नस्तीच अभिलेखात जमा न करता जाणून बुजून केली गहाळ
- सर्व दस्त हे जाणीवपूर्वक नाश अथवा त्याची विल्हेवाट अथवा ते कोठेतरी स्थलांतरित
- महानगरपालिकेचे २ लाख ४२ हजार ४०८ रूपयांचे आर्थिक नुकसान
- महापालिकेच्या प्रतिष्ठेस धक्का पोहोचविला
- यापूर्वी महापालिका आयुक्तांनी केली सक्तीची सेवानिवृत्ती, दंड कारवाई
- अखेर चौघांविरोधात पोलिसात गुन्हा दाखल
- चौकशीकडे लागले लक्ष

---

## संक्षिप्त वृत्त...



### कुमठे महाविद्यालयात गुणवंतांचा गौरव

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

कुमठे प्रशाला व कनिष्ठ महाविदयालयात भारताचा स्वातंत्र्यदिन साजरा करन्यात आला या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणुन बिल्डर असोसोसीएशनचे प्रदेश अध्यक्ष दत्ता मामा मुळे हे होते तर कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे मुख्य विश्वस्त जयकुमार माने यांनी भुषविले. याप्रसंगी संस्थेचे सचीव नागनाथ माने विश्वस्त स्वाती माने कुमठे केंद्राचे केंद्र प्रमुख सिद्राम वाघमोडे, ब्रह्मदेवदादा माने बॅंकेचे संचालक तानाजी शिनगारे, राजु मायनाळे, प्रकाश काशीद, मल्लीनाथ कोरे, एसपीएम च्या प्राचार्या रोहिणी चव्हाण, राष्ट्रविकास प्राथमिकच्या मुख्याध्यापिका मंगला मोरे, लिटर स्टिर च्या प्रिन्सपल शुभांगी पवार, उपस्थीत होते. प्रास्ताविक प्राचार्य जयसिंग गायकवाड यांनी केले. सूत्रसंचलन सुवर्णा धारेराव यांनी केले तर आभार प्रदर्शन कुमठे प्रशालैचे पर्यवेक्षक वसंत गूगे यांनी मानले कार्यक्रमाची सांगता वंदे मातरमने झाली या कार्यक्रमाला कुमठे व परिसरातील पालक मोठया संखेनी उपस्थीत होते




### भाजपा महिला आघाडीच्या वतीने कॅन्डल मार्च; डॉक्टर तरुणीवरील बलात्काराचा निषेध

**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

कोलकत्ता येथील वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयात डॉक्टर तरुणीची बलात्कार झालेल्या निषेधार्थ भारतीय जनता पार्टी सोलापूर महिला आघाडीच्या वतीने हुतात्मा चौक ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर चौका पर्यंत कॅन्डल मार्च करण्यात आला. यावेळी सोलापूर शहर चिटणीस रोहिणी तडवळकर यांनी आपले मनोगत व्यक्त करताना ममता बॅनर्जी यांच्या सरकारवर कडाडून टीका केली, तसेच त्या महिलेवर झालेल्या अन्यायला न्याय मिळावा यासाठी संपूर्ण देशाने अशा स्वरूपाचा एक देशव्यापी लढा तयार करावा असेल आव्हान देखील केले. महिला शहराध्यक्ष विजया वड्डेपल्ली यांनी ममता बॅनर्जी सरकार आपला रोष व्यक्त केला व अशा प्रकारच्या विकृत मानसिकता असणाऱ्या नराधमाला फाशीची शिक्षा देण्याची मागणी केली तसेच कलकत्ता पोलिसांनी देखील यामध्ये जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याची टीका त्यांच्या मनोगतात त्यांनी व्यक्त केली. यावेळी माजी महापौर शोभा बनशेटी, श्रीकाचना यन्नम, इंदिरा कुडक्याल, वंदना गायकवाड़, विमल पुठ्ठा, संगीता जाधव, गीता पाटोळे, विजया गायकवाड उपस्थित होते.

---

## पोलिस प्रशिक्षण केंद्रातील पोलिसांना बांधल्या राख्या

**अनोखे रक्षाबंधन : श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान व महिला ग्रुपचा स्तुत्य उपक्रम**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

केगाव येथील पोलीस प्रशिक्षण केंद्रात विविध शहर जिल्ह्यातून प्रशिक्षणासाठी आलेल्या नवप्रविष्ठ पोलिसांना राख्या बांधण्यात आल्या. श्रीमंतयोगी युवक प्रतिष्ठान व महिला ग्रुपच्या वतीने हा उपक्रम राबविण्यात आला.



यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून राखीव पोलीस निरीक्षक दीपक लोणकर, पोलीस नाईक बॅंच नंबर पन्नास सुनिल रोकडे, प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष महेश कासट उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रगती तिवारी यांनी केले तर आभार रंजना ढेंगले यांनी मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष महेश कासट, संतोष अलकुंटे, राजेश केकडे, केशव भैय्या, दिपक करकी, दिपक बुलबुले, महेश ढेंगले, रविशंकर जवळे, उदयशंकर जवळे, ओम बंडगर, सौरभ लकडे, स्वराज ढेंगळे आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

यावेळी श्रीमंतयोगी महिला ग्रुपच्या मनुश्री कासट, आर्या लचके, अनुष्का स्वामी, भक्ती सादिगले, श्रीया जवळे, अक्षता कासट, रंजना ढेंगले, उमा मुंगड, अर्चना बंडगर, शुभांगी लचके, प्रगती तिवारी, भारती जवळे यांना राखी बांधली.




## दमाणी ब्लड सेंटरमध्ये १५१ जणांचे रक्तदान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

श्रीमती गोपाबाई दमाणी ब्लड सेंटरच्या वतीने १५ ऑगस्ट स्वातंत्र्य दिनानिमित्त संस्थेचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान यांच्या हस्ते झेंडावंदन करण्यात आले.

सामाजिक बांधिलकी जपत संस्थचे चेअरमन डॉ. राजीव प्रधान, मानद सचिव जयेश पटेल, मानद सहसचिव खुशाल देढिया व रक्तकेंद्राचे व्यवस्थापकीय अधिकारी अशोक नावरे तसेच रक्तकेंद्रातील सर्व कर्मचारी यांच्या हस्ते वक्षारोपण करण्यात आले व यानंतर रक्तदान शिबीर आयोजन केले होते.

या शिबीरात १५१ रक्तदात्यांनी रक्तदान केले व थॅलेसेमिया रूग्णांची जीवनज्योत तेवत ठेवण्याचे मोलाचे कार्य केले. या कार्यक्रमाप्रसंगी संस्थेचे मानद सहकोषाध्यक्ष राजगोपाल मिणियारसह उपस्थित होते.

## पत्रकार आफताब शेख जिओ मित्र पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**



सोलापुरातील प्रसिद्ध पाक्षिक जिओ और जीनो दो च्या २५ व्या वर्धापन दिनानिमित्त समाजातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्यात आला. पत्रकारितेत उल्लेखनीय कार्य केल्याप्रकरणी एबीपी माझाचे प्रतिनिधी आफताब शेख यांचा हा सन्मान करण्यात आला.

पत्रकार आफताब शेख यांना जिओ मित्र पुरस्कार २०२४ चे सन्मानित करण्यात आले. माजी केंद्रीय गृहमंत्री सुशीलकुमार शिंदे, वकफ बोर्डाचे माजी अध्यक्ष डॉ. वजाहत मिर्जा यांच्या प्रमुख उपस्थित झालेल्या कार्यक्रमात या पुरस्काराची घोषणा करण्यात आली. दरम्यान जिओ और जीने दो पाक्षिकचे संपादक इरफान सय्यद आणि कार्यकारी संपादक गुफरान सय्यद यांनी आफताब शेख यांचे अभिनंदन केले.

## रक्तदान विषय अभ्यासक्रमात आणणे गरजेचे

**कुलगुरू महानवर : डॉ. हेडगेवार रक्तपेढी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठामध्ये सामंजस्य करार**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

रक्तदानाबाबत जागृती वाढवून युवकांना रक्तदानाचे महत्त्व कळण्यासाठी रक्तदान हा विषय अभ्यासक्रमात आणणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी केले. डॉ.हेडगेवार रक्तपेढी आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ यांच्यामध्ये' रक्तदान व संशोधन, या विषयावर सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. महानवर बोलत होते.



याप्रसंगी प्र. कुलगुरू लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजनेचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, राज्यपाल नियुक्त सिनेट सदस्य प्रा. देवानंद चिलवंत, रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे, कोषाध्यक्ष सुहास जोशी, सिनेट सदस्य चन्नवीर बंकूर, व्यवस्थापक रंगनाथ जोशी, रवी कोटा आदी उपस्थित होते. रक्तपेढीचे अध्यक्ष रमेश विश्वरूपे यांनी महाविद्यालयीन युवकांमध्ये रक्तदान चळवळ दृढ होण्याबाबत कोणत्या उपयोजना करण्यात याव्यात याबाबत माहिती दिली. या सामंजस्य कराराने महाविद्यालयीन युवकांपर्यंत रक्तदान हा विषय पोहोचवणे सोपे जाईल असेही त्यांनी सांगितले.

## 'प्रिसिजन'ला झिरो डिफेक्ट सप्लाईज ऑफ द इयर पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

प्रिसिजन कॅमशॉफ्ट लिमिटेड या कंपनीला २०२३ मधील व्यवसायिक कामगिरीसाठी टोयोटा मोटर्स कंपनीकडून व्यासायिक क्षेत्रातील नामांकित असणारा झिरो डिफेक्ट सप्लाईज या पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

प्रिसिजनने टोयोटा मोटर्सला संपूर्ण २०२३ या कॅलेंडर वर्षात पुरवठा केलेल्या कॅमशाफ्टमध्ये एकही डिफेक्ट नव्हता. संपूर्ण वर्षात पुरवठा केलेल्या कॅमशाफ्टमध्ये एकही चूक नव्हती. टोयोटासारख्या गुणवत्तेचा आग्रह




धरणाऱ्या ग्राहकाकडून हा नामांकित पुरस्कार मिळणं हीच मोठी उपलब्धी आहे. त्याबद्दल चेअरमन यतिन शहा यांनी संपूर्ण टीमचे अभिनंदन केले आहे.

पुरवठ्यातील सातत्यपूर्ण गुणवत्ता, स्पर्धात्मक किंमत, शून्य अपघात, पुरवठ्यातील शून्य चुका आणि ऑडिटम ध्ये एकही चुकीचं निरिक्षण नाही या सर्व निकषांवर हा पुरस्कार दिला जातो. असा पुरस्कार मिळवणारी प्रिसिजन कॅमशाफ्ट्स ही एकमेव पुरवठादार कंपनी ठरली आहे. मागील वर्षात प्रिसिजनने टोयोटा मोटर्स कंपनीला कोणत्याही दोषाशिवाय १ लाख ७० हजार कॅमशाफ्टचा पुरवठा केला आहे. मागील सलग तीन वर्षांपासून टोयोटा समूहाचे झिरो डिफेक्ट व बेस्ट क्वालिटी अवॉर्ड प्रिसिजन कंपनीस मिळत आहेत.प्रिसिजनने मागील ३० वर्षांपासून सर्वोत्कृष्ट गुणवत्ता, कस्टमर फोकस कामातील अचूकपणा हीच आपली ओळख बनविली आहे. पॅसेंजर कारच्या कॅमशाफ्ट उत्पादनातील अग्रगण्य उत्पादन कंपनी म्हणून प्रिसिजनची जगात ओळख निर्माण झाली आहे. टोयोटा मोटर्स सारख्या जगविख्यात उद्योग समुहाकडून हा पुरस्कार मिळणे हा फक्त प्रिसिजनचा नाही तर सोलापुरच्या कुशल कामगारांचा बहुमान असल्याची भावना प्रिसिजनचे चेअरमन यतिन शहा यांनी व्यक्त केली आहे.

दि. १४ ऑगस्ट रोजी बेंगलोर येथे पार पडलेल्या समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. प्रिसिजन कंपनीच्या वतीने कंपनीचे असिस्टंट जनरल मॅनेजर चंद्रशेखर सिंह व सेल्स मॅनेजर शशिकांत रेड्डी यांनी हा पुरस्कार स्विकारला.

# झेंडा आमुचा प्रिय देशाचा, फडकत वरी महान

## ७८ व्या स्वातंत्र्यदिनी जिल्ह्यात विविध उपक्रम; विद्यार्थ्यांची भाषणे, कवायती, देशभक्तीपर कलाविष्कारांनी वेधून घेतले लक्ष

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. १७ ऑगस्ट-**

**देशाच्या ७८ व्या स्वातंत्र्यदिनानिमित्त जिल्ह्यात उत्साह संचारला होता. शाळा, महाविद्यालयांसह विविध शैक्षणिक संकुलात विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीत, कलाविष्कार सादर करत 'झेंडा आमुचा प्रिय देशाचा, फडकत वरी महान। करितो आम्ही प्रणाम याला करितो आम्ही प्रणाम।।' असे गीत सादर करत देशप्रेमाचे स्फुल्लिंग चेतवले. विद्यार्थ्यांच्या देशभक्तीपर कवायती आणि नाट्यछटांनी सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. यानिमित्ताने विविध सामाजिक, शैक्षणिक उपक्रम राबवून देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान दिलेल्या शूरवीरांना अभिवादन करुन आदरांजली वाहण्यात आली.**



### चैतन्य मूकबधिर शाळा, फुलवाडी

फुलवाडी (ता. तुळजापूर) येथील चैतन्य मूकबधिर शाळेचे झेंडावंदन पोलीस प्राधिकरणचे सदस्य उमाकांत मिटकर यांच्या हस्ते करण्यात आले. अध्यक्षस्थानी पत्रकार शिवाजी कांबळे होते. यावेळी उद्योगपती लक्ष्मण चौगुले, कमलाकर घुगे, माजी सरपंच कमलबाई हजारे आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व आथितींचे स्वागत विद्यालयाचे मुख्याध्यापक व सहशिक्षकांनी केले.



### वागदरीत नेत्रदीपक कवायतीने विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष

वागदरी (ता. अक्कलकोट) येथील जि. प. प्राथमिक मराठी मुला- मुलींच्या शाळेत स्वातंत्र्यदिनी विद्यार्थ्यांनी केलेल्या नेत्रदिपक कवायतीने सगळ्यांचे लक्ष वेधून घेतले. मुख्याध्यापक रेखा सोनकवडे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष गजानन सुरवस होते. राज्यस्तरीय बुद्धिवंत प्रज्ञाशोध परीक्षेत ओजस्वी अमोल बोराळे हिने केंद्रात अव्वल आल्याबद्दल तिचा मानचिन्ह, रोख रक्कम देऊन सरपंच श्रीकांत भैरामडगी, उपसरपंच पंकज सुतार, ग्रामपंचायत सदस्य शिवानंद घोळसगाव यांनी सत्कार केला. विद्यार्थ्यांनी यावेळी भाषण, विविध कला सादर केले. यावेळी माजी उपसरपंच लक्ष्मीबाई पोमाजी, शारदाबाई रोटे, शिवसेना विभाग प्रमुख मुरगेंद्र मुद्दिनकेरी, माजी तंटामुक्त अध्यक्ष राजकुमार यादव, सेवानिवृत्त कर्मचारी देवांग कोणजी, चंद्रशेखर माने, श्रीशैल भरमदे, महादेव सोनकवडे, बाळू पोमाजी, व्यवस्थापन समिती अध्यक्ष गजानन सुरवसे, शिवशरणप्पा सुरवसे, शाहाजी सुरवसे, नरेंद्र त्रिगुळे, सोमा स्वामी, इसुफ नदाफ, शिक्षिका कलशेट्टी, रेऊरे, कुणाले, गिरी, फंड उपस्थित होते. सूत्रसंचालन बाबासाहेब बनसोडे यांनी केले तर आभार बागवान यांनी मानले.

### यमाईदेवी आश्रमशाळा, मार्डी



संत रविदास शिक्षण प्रसारक मंडळ सोलापूर संचलित मार्डी येथील यमाईदेवी प्राथमिक आश्रम शाळेत डॉ. आशुतोष यजुर्वेदी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. अध्यक्षस्थानी संस्थापक अशोक लांबतुरे होते. यावेळी डॉ. यजुर्वेदी, माजी प्राचार्य विलास लेंगरे, सचिव मधुकर गवळी, संचालक शंकर जाधव, मुख्याध्यापिका रुक्मिणी लांबतुरे, विद्या हराळे, नानासाहेब लोखंडे, महादेव करे, तानाजी तानगावडे, अशोक देशमुख, अमोल गुरव, बसवराज तुळजापुरे, संदिप चव्हाण आदी उपस्थित होते.विद्यार्थ्यांनी सामुदायिक कवायत, सांस्कृतिक कार्यक्रम, मराठी, हिंदी, इंग्रजी भाषेतून भाषण केले. प्रज्ञाशोध परीक्षा उत्तीर्ण विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देण्यात आले. श्रीधर मार्तंडे प्रतिष्ठानतर्फे पहिली ते सातवीमधील प्रथम तीन क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांना रोख बक्षीस देण्यात आले. प्रास्ताविक रुक्मिणी लांबतुरे यांनी केले. सूत्रसंचालन संगीता व्हनकोळे-जाधव यांनी केले तर आभार विनोद कोळेकर यांनी मानले.



### अनंत चैतन्य प्रशाला, हन्नूर

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्था अक्कलकोट संचलित हन्नूर येथील अनंत चैतन्य प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय व सेमी इंग्लिश प्राथमिक शाळेत ग्रामपंचायत सदस्या शांताबाई परमेश्वर फसगे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. शिवानी बाळशंकर, भाग्यश्री पाटील, सायली पवार, सिफा बागवान यांनी देशभक्तीपर गीतावर नृत्य सादर केले. भाषण केलेल्या विद्यार्थ्यांना मेजर राजेंद्र मल्लप्पा भरमशेट्टी, नृत्य सादर केलेल्यांना हन्नूरचे उपसरपंच सागरदादा कल्याणशेट्टी यांनी रोख पारितोषिक देऊन गौरवले. गुणवंत विद्यार्थ्यांना कल्याणशेट्टी, मुल्ला, पत्की, बिराजदार, कलबुर्गी, जक्कीकोरे, पाटील, सैदे, हताळे कुटुंबियांकडून ठेवण्यात आलेले रोख पारितोषिके देऊन गौरवण्यात आले. अध्यक्षस्थानी माजी प्राचार्य सिद्धेश्वर कल्याणशेट्टी होते. यावेळी मुख्याध्यापक श्रीकांत राठोड, माजी मुख्याध्यापक चंद्रकांत व्हनमाने, अशोक दंतकाळे, विलास बिराजदार, विश्वनाथ चव्हाण, निंगप्पा बिराजदार, विलास तळवार, अब्दुलकरीम मुल्ला, मुख्याध्यापक अशोक साखरे, पर्यवेक्षक ज्ञानदेव शिंदे, अप्पासाहेब काळे, प्रा. रविंद्र कालीबत्ते, शशिकांत अंकलगे, सुरेश जाधव, राजेंद्र यंदे उपस्थित होते. प्रास्ताविक मल्लम्मा चप्पळगाव यांनी केले तर आभार स्वप्नाली जमदाडे यांनी मानले.

### श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशाला, वळसंग



वळसंग (ता. दक्षिण सोलापूर) येथील श्री शंकरलिंग माध्यमिक व उच्च माध्यमिक प्रशालेत स्वातंत्र्य दिन उत्साही वातावरणात संपन्न झाला. स्कूल कमिटीचे चेअरमन शिवशरण थळंगे अध्यक्षस्थानी होते. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन संस्थाध्यक्ष श्रीशैल दुधगी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बाळकृष्ण गुंड, संतोष कस्तुरे, संस्थेचे सदस्य विश्वनाथ थळंगे, सिध्दाराम बागलकोटी, प्रकाश दुधगी, रमेश दुधगी, शिवशरण प्याटी, संजय दुधगी, बसवराज शाबादे, निवृत्त मुख्याध्यापक संगमेश्वर बागलकोटी, मल्लिनाथ कण्णी उपस्थित होते. स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख तानाजी जमदार यांनी केले. प्रास्ताविक प्राचार्य वीरेश थळंगे यांनी केले. सुमित बाबानगरे यांची जलसंपदा विभागात उपअभियंतापदी निवड झाल्याबद्दल, अक्षय नंदुरे यांनी समाजातील होतकरू व गरजू विद्यार्थ्यांना दरमहा एक हजार रूपयांची शिष्यवृत्ती जाहीर केल्याने, पत्रकार कल्लय्या स्वामी यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमासाठी पर्यवेक्षक शिवानंद घोडके, संजयकुमार धनशेट्टी, सिदधाराम भैरामडगी, नीलकंठ कवटगी, सिद्धारूढ हिरेमठ, गंगाधर बिराजदार, बसवराज दुधगी, विरेश थळंगे, मल्लिनाथ गौडगाव, अजय माणकोजी, विजय प्याटी, प्रा. शरणय्या मसुती, विजयालक्ष्मी थळंगे, शैला निंबाळ, स्नेहा हळगोदे, गंगा बागलकोटी, कलशेट्टी, प्रा. तांडुरे, राजश्री दुधगी, गौरीशंकर चनशेट्टी, नीलकंठ चनशेट्टी, विनोद दुधगी, कट्टेप्पा कोळी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन श्रीमंत भोसले सर यांनी केले, प्रा. संतोष शिंदे यांनी आभार मानले.



### कल्याणशेट्टी शिक्षण संकुल, अक्कलकोट

महर्षि विवेकानंद समाजकल्याण संस्थेच्या अक्कलकोट येथील सौ सुरेखा कल्याणशेट्टी माध्यमिक व उच्च माध्यमिक मराठी, कन्नड व सेमी इंग्रजी विद्यालय, मातोश्री गुरुबसव्वा कल्याणशेट्टी महाविद्यालय, गिरीजामाता मराठी व सेमी इंग्रजी विद्यालय, वीर शिरीषकुमार बालसंस्कार केंद्र, यशवंराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अभ्यासकेंद्र, नालंदा विद्यार्थी वसतिगृह या सर्व शाखेच्या वतीने स्वातंत्र्य दिन कै. पंचप्पा कल्याणशेट्टी शिक्षण संकुलात साजरा करण्यात आला. यावेळी संस्थेचे ज्येष्ठ संचालक मुकुंद पत्की यांनी ध्वजारोहण केले. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संचालक मल्लिनाथ कल्याणशेट्टी होते. यावेळी संचालिका शांभवी कल्याणशेट्टी, सचिव भीमराव साठे, संचालक मल्लिनाथ मसुती, सदस्य महावीर शहा, सीईओ रूपाली शहा, जुनियर कॉलेज विभाग प्रमुख पूनम कोकळगी, प्राचार्य डॉ. राजेंद्रसिंह लोखंड, मुख्याध्यापक मलकप्पा भरमशेट्टी, सेवानिवृत्त मुख्याध्यापक बापूजी निंबाळकर, सेवानिवृत्त पर्यवेक्षक शिवानंद पुजारी, खंडेराव घाटगे उपस्थित होते. आनंदी वातावरणात बँड च्या तालावर विद्यार्थ्यांनी सुंदर संचलन केले, देशभक्तीपर गीत,नृत्य, योग प्रकार, भाषणे सादर केले. यावेळी नवोदय व एनएमएमएस परीक्षेतील पात्र विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. मुख्याध्यापक सुरेश आवटे, निखिल भालेराव सूत्रसंचालन कल्पना स्वामी, निशिगंधा कोळी यांनी केले तर दिगंबर जगताप यांनी आभार मानले.

### विद्यार्थ्यांनी आयुष्यात चारित्र्य, साहस, क्षमता आचरणात आणावे : निवृत्त ब्रिगेडियर नायर

विद्यार्थ्यांनी आयुष्यात चारित्र्य, साहस, क्षमता आचरणात आणावे. यावरच जीवनात यश अवलंबून असल्याचे प्रतिपादन निवृत्त ब्रिगेडियर नायर यांनी केले. दि. ग्रीनफिंगर्स स्कूलमध्ये ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. ध्वजारोहण निवृत्त ब्रिगेडियर केजीके नायर यांनी केले, त्यावेळी ते बोलत होते. विद्यार्थ्यांनी एनसीसी परेडचे संचलन केले. राष्ट्र उभारणीत शिक्षण हा महत्वाचा घटक आहे. महाराष्ट्रातील क्रांतीसूर्य महात्मा फुले तसेच क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले यांच्यामुळे महिलांच्या आयुष्यात ज्ञानाची ज्योत प्रज्वलित करण्याचे मोठे अग्निदिव्य त्यांनी पेलले. त्यांच्या पावलावर पाऊल ठेवत अकलूजसारख्या ग्रामीण भागात सहकार महर्षी यांनी १५ जुलै १९७५ रोजी ग्रीनफिंगर्स स्कूलची स्थापना केली. यावरच आधारित जीवनपट नृत्याच्या आविष्कारातून दाखविण्यात आला. यावेळी वृक्षारोपण करण्यात आले. संस्थचे विश्वस्त विश्वतेजसिंह मोहिते-पाटील, चेअरमन नितीन इंगवले-देशमुख, विश्वस्त विक्रम माने-देशमुख, सचिव एस. एम. शिंदे, प्राचार्य उमाकांत बराल उपस्थित होते.





### स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालय, पंढरपूर

पंढरपूर येथील स्वेरी अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या प्रांगणात उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांच्या हस्ते भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करून ध्वजारोहण करण्यात आले.कोमल कसबे यांनी गीत गायले. श्रुष्टी भोसले, सुदिक्षा जगताप, वैकुंठी जाधव, ओम गाढवे, उपप्राचार्या डॉ. मीनाक्षी पवार यांनी मनोगत व्यक्त केले. 'स्वेरीयन' त्रैमासिक, न्यूज बुलेटिन्सचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी प्राचार्य डॉ. बी. पी. रोंगे, अध्यक्ष दादासाहेब रोंगे, डॉ. एम. एम. पवार, प्राचार्य डॉ. एम. जी. मणियार, प्राचार्य डॉ.एन.डी. मिसाळ, प्राचार्य प्रा. एस. व्ही. मांडवे उपस्थित होते. साक्षी शिंदे, स्नेहा पिसे व प्रथम वर्ष पदवी अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ. यशपाल खेडकर यांनी सूत्रसंचालन केले.

### जि. प. प्राथमिक शाळा, वाफळकर वस्ती



वाफळकर वस्ती, बार्डी येथील जि. प. प्राथमिक शाळा वाफळकरवस्ती, बार्डी येथे स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष प्रवीण कवडे, मुख्याध्यापक किरण ढोबळे, ज्ञानेश्वर दुधाणे, शालन खारे यांच्या उपस्थितीत ध्वजारोहण करण्यात आले. ज्ञानेश्वर दुधाणे यांनी मार्गदर्शन केले. पालक आणि ग्रामपंचायतीच्या वतीने मुलांना खाऊ वाटप करण्यात आले.



### उंबरेपागे येथे सायकलींचे वाटप

उंबरे पागे येथील जि. प. प्रा. शाळा व विद्या विकास मंदिर या विद्यालयातील विद्यार्थांची स्वातंत्र्यदिनानिमित्त प्रभातफेरी काढल्यानंतर उंबरे सोसायटीचे चेअरमन हनुमंत इंगळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने देशभक्तीपर संगीत, रांगोळी प्रदर्शन पार पडले. तायक्वांदो व इतर क्रीडाप्रकार, एटीएस, दहावी व बारावीमधील गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव करण्यात आला. यावेळी संस्थेचे चेअरमन ज्ञानदेव ढोबळे, अध्यक्ष राजाराम नरसाळे, सचिव बलभीम पाटील, मुख्याध्यापक बी. जे. शिंदे उपस्थित होते. यावेळी सायकलींचे वाटप करण्यात आले.

## स्वातंत्र्य दिनी विविध उपक्रम




### जिव्हाळा विद्यामंदिर, कुर्डूवाडी

जनसेवा बहुउद्देशीय शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जिव्हाळा सुसंस्कार विद्यामंदिर कुर्डूवाडी येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. प्रारंभी मुख्याध्यापिका सारिका गोटे, पंजाब येथे कार्यरत असणारे सैनिक महेंद्र मुंडले व त्यांच्या धर्मपत्नी तसेच दहावीतील प्रथम गुणवंत विद्यार्थी श्रीधन पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी सचिव अजित वायचळ, डॉ. सुभाष लोंढे, दत्ता कांबळे, कल्याण चोपडे, संतोष काळे, शोभा शिंदे, प्रियंका पाटील, सिमरन शेख, योगिता वायचळ, अझरुद्दीन शेख, माजी विद्यार्थिनी स्नेहा वायचळ आदी उपस्थित होते. सुषमा चंद्रकांत वायचळ यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ दहावीतील यशवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले. यावेळी संस्थापक अध्यक्ष शिवराज वायचळ, सचिव अजित वायचळ, मुख्याध्यापिका सारिका गोटे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रदीप देशपांडे व आकाश घोडके यांनी केले. आभार किशोर मोहोले यांनी मानले. कार्यक्रमासाठी नवनाथ बुरकुले, जयकुमार उपाध्ये, दिनेश आतकर, रवी शहा, जयंत माळी, साधना झोळ, निलोफर सय्यद, साळुंके, ओहोळ आदींनी परिश्रम घेतले.

### ओंकार साखर कारखाना, चांदापुरी



चांदापुरी (ता. माळशिरस) येथील ओंकार साखर कारखाना चांदापुरी युनिट एकच्या वतीने ७८ स्वातंत्र्दिनाचे ध्वजारोहण संचालक प्रशांतराव बोत्रे-पाटील यांनी केले. अध्यक्षस्थानी जनरल मॅनेजर भीमराव वाघमोडे होते. रामचंद्र मगर म्हणाले की कारखान्याच्या इतिहास २०२४ व २०२५ हे क्रांतीकारक व आव्हानात्मक वर्ष असून कारखान्याचे चेअरमन बाबुराव बोत्रे-पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली कारखान्याच्या गाळप क्षमतेत वाढ होऊन उपपदार्थ प्रकल्प कार्यान्वित होणार आहेत. कारखान्याचे हितचिंतक अधिकारी, कर्मचाऱ्यांनी सचोटीने काम करणे गरजेचे आहे. यावेळी चीफ इंजिनिअर तानाजीराव देवकते, मेजर मोहन घोडके, केन मॅनेजर शरद देवकर, धनाजी पवार, गणेश शितोळे, प्रविण पिसे, विकास मगर, नितीन जाधव उपस्थित होते.



### गायकवाड परिवारातर्फे मोफत सायकली भेट

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून विद्या विकास मंदिर उंबरे पागे (ता. पंढरपूर) येथील १० गरजू विद्यार्थ्यांना विजयसिंह मोहिते-पाटील विद्यालय वाघोलीचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष नामदेव गायकवाड व त्यांचे सुपुत्र एसीपी नवी मुंबई राहुल सुभाष गायकवाड, उपनिबंधक सहकारी संस्था पुणे सिद्धार्थ सुभाष गायकवाड यांच्याकडून सुभाष गायकवाड यांचे नातू कबीर राहुल गायकवाड यांच्या वाढदिवसानिमित्त विद्या विकास मंदिर उंबरे पागे येथे स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमप्रसंगी विद्यार्थीनींना १० सायकली मोफत सप्रेम भेट देण्यात आल्या. याप्रसंगी सेवानिवृत्त मुख्याध्यापक सुभाष गायकवाड, राहुल गायकवाड, सिद्धार्थ गायकवाड, संस्थेचे चेअरमन ज्ञानदेव ढोबळे, अध्यक्ष राजाराम नरसाळे, सचिव बलभीम पाटील, मुख्याध्यापक बी. जे. शिंदे उपस्थित होते.



### वखारिया विद्यालय, उपळे दुमाला

उपळे दुमाला येथील श्री.शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळ बार्शी संचलित वखारिया विद्यालयात ७८ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. मुख्याध्यापक दयानंद रेवडकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ग्रामपंचायतीने छत्रपती शिवाजी चौकात आयोजित केलेल्या स्वातंत्र्यदिन ध्वजारोहण कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी अंगणवाडी क्र. ६ आणि जिजामाता विद्यामंदिरच्या छोट्या मुलांनी देशभक्तीपर गीते सादर केली. दहावीतील विद्यार्थांना ज्योतीराम जाधव यांच्याकडून सादिया बागवान १० हजार, सोनाली महाडिक ७ हजार, पूजा बुरगुटे ७ हजार, गौरी ठोंगे ५ हजार रुपयांचे रोख बक्षिस देण्यात आले. शिक्षणप्रेमी अर्जुन बरबडे, सेवानिवृत्त शिक्षक महादेव कसबे यांनीही गुणवंत विद्यार्थ्यांना रोख बक्षिसे दिली.

### तहसील कार्यालय, पंढरपूर

पंढरपूर येथील तहसील कार्यालय येथे प्रांताधिकारी सचिन इथापे यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहणाचा शासकीय कार्यक्रम संपन्न झाला. यावेळी उपविभागीय पोलीस अधिकारी अर्जुन भोसले, तहसीलदार सचिन लंगुटे, अपर तहसीलदार तुषार शिंदे, गटविकास अधिकारी सुशिल संसारे, मुख्याधिकारी प्रशांत जाधव, नायब तहसीलदार विजय कुमार जाधव, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. एकनाथ बोधले, महिला बालविकास प्रकल्प अधिकारी समाधान नागणे उपस्थित होते. यावेळी पंढरपूर पोलीस पथकाच्यावतीने मानवंदना देण्यात आली.

CMYK

धाराशिव • दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# पोउनि.संजय झराड यांना विशेष सेवा पदक जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ ऑगस्ट -**
येथील पोलीस ठाण्यात कार्यरत असणारे पोउनि. संजय झराड यांना विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.



येथील पोउनि. झराड हे २०२१ ते २०२३ या दरम्यान राज्यातील गडचिरोली जिल्ह्यात पोलीस दलात सेवेत होते. राज्याच्या पोलीस महासंचालकांच्या वतीने गडचिरोली येथे उत्कृष्ट सेवा बजवणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांना विशेष सेवा पदक जाहीर करण्यात आले आहे.

झराड हे सद्या धाराशिव जिल्ह्यातील भूम पोलीस ठाण्यात कार्यरत आहेत. त्यांना त्यांच्या सेवेबद्दल हे पदक जाहीर झाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. त्यांना हे पदक दि.१५ ऑगस्ट रोजी धाराशिव जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार होते.

स्वातंत्र्यदिनी जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नसल्याने त्यांना ते पदक लवकरच सन्मान पूर्वक प्रदान करण्यात येणार आहे.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### सामाजिक वनीकरण कार्यालयाच्या वतीने आनंद घनवन नावे वृक्ष लागवड

**कदेर, दि.१७ ऑगस्ट -**
श्री सिद्धेश्वर विद्यालय खसगी तालुका मार्ग येथे सामाजिक वनीकरण विभाग उमरगा यांच्यामार्फत वीस गुंठे वरती फुले, फळे, औषधी आणि पर्यावरण संवर्धनाच्या विविध जातीच्या वृक्ष लागवड कामाची सुरुवात करण्यात आली. यावेळी श्रीफळ फोडून कामाची सुरुवात श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्थेचे सेक्रेटरी विठ्ठल बदोले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सदस्य बसवराज कुंभार, तालुका लागवड अधिकारी पचरांडे, वनपाल मुधाळे, वनरक्षक कलशेट्टी, नागोराव गायकवाड, व कांत गायकवाड तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक आर.एम. माशाळे, बी.जी. पाटील, शिवपुत्र बोळसट्टे यांच्यासह माध्यमिक विद्यालयाचे सर्व प्राध्यापक व विद्यार्थी उपस्थित होते.

### तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत येडशीच्या जनता विद्यालयाचे सुयश

**येरमाळा, दि.१७ ऑगस्ट -**
हातलाई देवी क्रिडा संकुल धाराशिव येथे संपन्न झालेल्या तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत येडशी येथील



जनता विद्यालयाने बाजी मारली आहे. दि.१६ रोजी धाराशिव येथे विद्यार्थ्यांच्या तालुकास्तरावरील कुस्ती स्पर्धा पार पडल्या. त्यात १४ वर्षे वयोगटाखालील मुलांच्या ६२ किलो वजनी गटामध्ये ओंकार बालाजी पवार याने प्रथम क्रमांक मिळविला. तर ५२ किलो वजनी गटामध्ये शंकर बबन राठोड याचा व्दितीय क्रमांक आला आहे. त्यानंतर १७ वर्षे वयोगटातील मुलांच्या ४८ किलो वजनी गटामध्ये आर्यन शरद साळुंके याने प्रथम क्रमांक पटकावला. तर ५५ किलो वजनी गटामध्ये थोडसरे केदार रंजीत याने व्दितीय क्रमांक मिळविला. ७१ किलो वजनी गटामध्ये आयान जमीर पटेल यांना प्रथम क्रमांक मिळविला आणि दुसऱ्या क्रमांकावर सुरज रामा काळे राहिला. ९२ किलो वजनी गटामध्ये यशराज बालाजी देशमुख याने प्रथम क्रमांक मिळवून यश संपादन केले.



### आर्य चाणक्य विद्यालयात स्वातंत्र्यदिनानिमित्त ध्वजारोहण संपन्न

**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**
शहरातील आर्य चाणक्य माध्यमिक विद्यालयात भारतीय स्वातंत्र्याच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त ध्वजारोहण मुख्याध्यापक प्रा.डॉ. मनीष देशपांडे यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी लोकसेवा समितीचे अध्यक्ष ॲड. मिलिंद पाटील, संस्था प्रतिनिधी कमलाकर बापू पाटील, डॉ. अभय शहापूरकर उपस्थित होते. या निमित्ताने प्रशालेतील स्काऊट गाईडच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी राष्ट्रध्वजाला मानवंदना दिली. हर घर तिरंगा मोहिमेअंतर्गत प्रशालेतील विद्यार्थी विद्यार्थिनींनी तिरंगा ध्वज हाती धरून या मोहिमेच्या संदर्भात जनजागृती केली होती. तसेच प्रत्येक विद्यार्थ्याने आपल्या घरी तिरंगा ध्वज लावून या हरघर तिरंगा मोहिमेत सहभागी होण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.



### ब्रम्हवार्ता वधु-वर विशेषांकाचे प्रकाशन

**परंडा, दि.१७ ऑगस्ट -**
परंडा शासनमान्य ब्रह्मवार्ता वधुवर विवाह संस्थेच्या वतीने गेले तीन महिन्यात विविध वधु-वर मेळाव्यात व संस्थेत नांव नोदणी केलेले वधु-वर तसेच ब्रह्मवार्ताच्या वाटसप ग्रुपवरुन आलेल्या वधु-वरच्या माहितीचा मोबाईल नंबर सह आज संस्थेच्या वतीने राज्य स्तरीय वधुवर विशेषांकाचे प्रकाशन भाजपचे जिल्हा सचिव विकासराव कुलकर्णी यांच्या हस्ते करण्यात आले. या प्रसंगी मधुकरराव कुलकर्णी उपस्थित होते. या अंकात १८५ वधु तर २४० वरांच्या नांवाचा समावेश असलेल्याची माहिती संचालक श्रीराम विद्वत यांनी दिली. हा अंक ज्या वधुवर यांना हवा असेल त्यांना रजिस्टर पोस्टाने घरपोच दिला जाईल यासाठी मो. नबंर ९०९६५३१३५५ वर करावा असे आवाहनही केले.

# सुनंदा जगताप यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद : आ. राणाजगजितसिंह पाटील



**तभा वृत्तसेवा**
**तेर, दि.१७ ऑगस्ट -**
लातूर येथील सुनंदा जगताप यांचे सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे, असे प्रतिपादन आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी केले. धाराशिव तालुक्यातील तेर येथे कै. डॉ. चंद्रकलादेवी पाटील स्मृती पुरस्कार वितरण प्रसंगी आयोजित कार्यक्रमात आ.पाटील यांनी प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाराष्ट्र संत विद्यालयाचे मुख्याध्यापक जे.के. बेदरे होते तर धाराशिव पंचायत समितीचे माजी सभापती बाळासाहेब वाघ, श्री संत गोरोबा काका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष पद्माकर फंड, व्यंकटराव माळी, विजयकुमार लाड, तेरचे सरपंच दिदी काळे, उपसरपंच श्रीमंत फंड, तेर सोसायटीचे चेअरमन सतिष कदम, तेरणा विद्यालयाचे मुख्याध्यापक संतोष गायकवाड, एस.एस. पाटील, प्रवीण साळुंके, नवनाथ नाईकवाडी, मज्जित मनियार, जयश्री माळी, पूजा चव्हाण, भाग्यश्री भक्ते, वैशाली देवकते, जोती नाईकवाडी यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी लातूर येथील वृक्षसखी व सामाजसेविका सुनंदा जगताप यांना कै.चंद्रकलादेवी पाटील स्मृती पुरस्कार हा स्मृतीचिन्ह, मानपत्र, अकराशे रूपये देऊन आ. राणाजगजितसिंह पाटील यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. यावेळी आ. राणाजगजितसिंह पाटील यांनी कै. चंद्रकलादेवी पाटील स्मृती पुरस्काराची रक्कम अकराशेच असल्याने स्वतःच्या वतीने अकरा हजार रुपये पुरस्कार प्राप्त सुनंदा जगताप यांना दिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संयोजक नरहरी बडवे यांनी केले. यावेळी कै.चंद्रकलादेवी पाटील स्मृती पुरस्कार प्राप्त सुनंदा जगताप यांनी वृक्षावर कविता सादर करून उपस्थितांची मने वेधून घेतली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ पांचाळ यांनी केले तर मानपत्राचे वाचन एस.यू.गोडगे यांनी केले.

यावेळी डॉ. गुरूप्रसाद चिवटे, गोरख माळी, रामा कोळी, संजय लोमटे, आश्रूबा पाडूळे, अविनाश पाडुळे, एजाज बागवान, मधुकर पवार, कामधेनू देशमाने व विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रगती पतसंस्थेच्या अध्यक्षपदी प्रशांत पाटील यांची फेरनिवड

## उपाध्यक्षपदी शाम जाधव तर सचिवपदी डॉ. हर्षल डंबळ यांची निवड



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**
प्रगती सहकारी पतसंस्था म. धाराशिव या जिल्यातील नामांकीत पतसंस्थेची २०२४-२०२९ या पंचवार्षिक साठीची निवडणूक नुकतीच बिनविरोध पार पडली. या निवडणुकीत सर्व ११ संचालक बिनविरोध निवडून आले.

नवनिर्वाचित संचालक मंडळाची पहिली पदाधिकारी निवडीची सभा निवडणूक निर्णय अधिकारी ए.टी. सोलंकर यांच्या प्रमुख उपस्थितीत नुकतीच संपन्न झाली.

सदरील बैठकीत संस्थेच्या अध्यक्षपदासाठी प्रशांत पाटील यांचा तर उपाध्यक्षपदासाठी शाम जाधव आणि सचिव पदासाठी डॉ. हर्षल डंबळ यांचे प्रत्येकी एकच अर्ज आल्यामुळे ही निवडणूक बिनविरोध झाली. त्यामुळे अध्यक्षपदावर प्रशांत पाटील यांची तर उपाध्यक्ष पदासाठी शाम जाधव आणि सचिव पदासाठी डॉ. हर्षल डंबळ यांची सर्वानुमते बिनविरोध निवड झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी ए.टी. सोलंकर यांनी जाहीर केले.

यावेळी नूतन संचालक नंदकुमार भुतेकर, शशीकांत वैराळे, रमाकांत घोडके, व्यंकटेश राजे, सुधाकर कुलकर्णी, विजयालक्ष्मी पांढरे, सविता थोरात, विमल यादव उपस्थित होते.

निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सहाय्यक म्हणून टि.एन. रेडेकर यांनी काम पाहिले. नुतन पदाधिकारी आणि संचालक मंडळाच्या सत्कार समारंभीने सभेची सांगता झाली.

### * श्री छत्रपती शिवाजी विद्यालयात स्वातंत्र्य दिन साजरा

भारत शिक्षण संस्था उमरगा अंतर्गत श्री छत्रपती शिवाजी विद्यालय तलमोड येथे भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला.

# महिला डॉक्टर अत्याचारप्रकरणी नळदुर्गमध्ये डॉक्टरांचा संप



**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.१७ ऑगस्ट -**
कोलकाता येथील शासकीय रुग्णालयातील प्रशिक्षणार्थी महिला डॉक्टरच्या बलात्कार व हत्या प्रकरणाविरोधात दि.१७ ऑगस्ट रोजी नळदुर्ग, अणदुर, जळकोट, इटकळ व परीसरातील ५१ रुग्णालयातील डॉक्टर्सनी एक दिवसाचा संप पुकारला होता. त्याचबरोबर नळदुर्ग बसस्थानक ते पोलिस ठाण्यापर्यंत मुक मोर्चा काढुन या प्रकरणातील आरोपीवर कडक कारवाई करावी या मागणीचे निवेदन दिले.

कोलकाता येथे महिला डॉक्टरावर झालेल्या अत्याचार व अमानुष हत्या संदर्भात दि.१७ ऑगस्ट रोजी देशभर डॉक्टरांनी निदर्शने करण्याबरोबच एक दिवसाचा संप पुकारला होता.

याला पाठिंबा म्हणुन नळदुर्ग, अणदुर इटकळ जळकोट व परीसरातील डॉक्टर्सनी एक दिवसाचा संप पुकारला होता. यावेळी सर्व रुग्णालय बंद ठेवण्यात आली होती. या संपला औषध दुकानदारांनीही पाठिंबा दिला होता. त्यामुळे आरोग्यसेवा पुर्णपणे कोलमडली होती. नळदुर्ग, अणदुर, इटकळ, जळकोट व परीसरातील डॉक्टर्स व औषध दुकानदारांनी या घटनेचा निषेध म्हणुन दि. १७ ऑगस्ट रोजी नळदुर्ग येथे बसस्थानक ते पोलिस ठाण्यापर्यंत काळ्या फिती लावुन मुक मोर्चा काढला.

या मोर्चामध्ये डॉ. जितेंद्र कानडे, डॉ. सिद्रामप्पा खजुरे, डॉ.एम.एम. शेख, डॉ. विवेक बिराजदार, डॉ. पंकज घुगे, डॉ. नारायण घुगे, डॉ. भरत मंगरूळे, डॉ. महेश लबडे, डॉ. सुरज शेख, डॉ. सचिन पाटील, डॉ. रुपाली कानडे, डॉ. स्वाती जितेंद्र पाटील, डॉ. स्वाती शिंदे, डॉ. मारीया शेख, डॉ. प्रतिभा नरवडे, डॉ. अमोलकुमार शिंदे, डॉ. संजय कदम, डॉ. यशवंत नरवडे, डॉ. मोहन मोजगे, डॉ. अमरदीप कंदले यांच्यासह औषध दुकानदार संजय जाधव, महेश कार्ले यांच्यासह आदी डॉक्टर सहभागी झाले होते.

# शिराढोण येथील भारत माता विद्यालयाचा अनोखा उपक्रम

**शिराढोण, दि.१७ ऑगस्ट -**
कळंब तालुक्यातील शिराढोण येथील भारत माता विद्यालयातील पाचवी व सहावीच्या वर्गात शिकत असलेल्या मुलीने शिराढोण येथील पोलीस स्टेशन मध्ये जाऊन प्रशासकीय सेवा बजवनाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांना राखी पौर्णिमेनिमित्त राखी बांधून राखी पौर्णिमा साजरी केली.



यावेळी कार्यक्रमात शिराढोण पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कल्याण नेहरकर, पोलीस उपनिरीक्षक पवार, पोलीस हवालदार परमेश्वर मेंगले, काकासाहेब शेंडगे, बालाजी गोंदकर, गायकवाड, सोनवणे, देशमाने, गवळी, मरलापल्ले इत्यादी कर्मचारी उपस्थित होते. तसेच भारत माता विद्यालयातील पाढे, चक्रे, उत्तरेश्वर खिचडे, रामेश्वर खिचडे उपस्थित होते.

# वंचितला मिळाले 'सिलेंडर' चिन्ह; भूम येथे जल्लोष

**तभा वृत्तसेवा**
**भूम, दि.१७ ऑगस्ट -**
महाराष्ट्र राज्यात वंचित बहुजन आघाडीला केंद्रीय निवडणूक आयोगाच्या वतीने गॅस सिलेंडर हे निवडणूक चिन्ह देण्यात आले आहे. वंचित बहुजन आघाडीला हे चिन्ह जाहीर होताच भूम येथे वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी पेढे वाटून, फटाके फोडून, गुलाल उधळत शहरातील गोलाई चौकात मोठा जल्लोष केला.

यावेळी वंचित बहुजन आघाडीचे मराठवाडा उपाध्यक्ष प्रवीण रणबागुल यांची प्रमुख उपस्थिती होती. शुक्रवार दि.१६ रोजी केंद्रीय निवडणूक आयोगाची देशातील विधानसभेच्या निवडणुकीच्या संदर्भात दिल्ली येथे पत्रकार परिषद संपन्न झाली. आगामी विधानसभा निवडणुकीत वंचित बहुजन आघाडीला गॅस सिलेंडर हे चिन्ह मिळावे ही अपेक्षा कार्यकर्त्यांची होती. गेल्या पंचवार्षिक निवडणुकीत गॅस सिलेंडर हे चिन्ह मिळाले होते. त्यामुळे हे चिन्ह सर्वांना परिचित होते. हे चिन्ह मिळताच मोठा जल्लोष करण्यात आला.

यावेळी वंचितचे एल.टी. शिंदे, तालुकाध्यक्ष मुसाभाई शेख, वैभव गायकवाड, रोहित गायकवाड, अक्षय गायकवाड, धीरज शिंदे, दीपक सोनवणे, सागर नागटिळक, कृष्णा शिनगारे, अतीक शेख, मुकुंद लगाडे, उमेश गुंजाळ, रवींद्र लोमटे, रोहन गायकवाड, बुद्धभूषण गायकवाड यांच्यासह तालुक्यातील पदाधिकारी हजर होते.

# आ. चौगुले यांच्या हस्ते भोसगा येथील विकास कामांचे भूमिपुजन

**तभा वृत्तसेवा**
**लोहारा, दि.१७ ऑगस्ट -**
आ. ज्ञानराज चौगुले यांनी आमदार स्थानिक विकास कार्यक्रम निधी अंतर्गत लोहारा तालुक्यातील भोसगा येथील अंबाबाई मंदिर व संत सेवालाल महाराज मंदिर समोर सभामंडप बांधणे १० लक्ष रूपये व अल्पसंख्याक विकास निधि अंतर्गत कब्रस्थानास संरक्षक भिंत बांधणे असे एकुण २० लक्ष रूपये निधी मंजुर केला आहे. या कामांचे भूमिपूजन दि.१५ ऑगस्ट २०२४ रोजी आमदार ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते संपन्न झाला.



या कार्यक्रमात उपस्थितांना त्यांनी तालुक्यात केलेल्या विकास कामांसह भोसगा येथे केलेल्या विकास कामांचा पाढा वाचत शासनाने जाहिर केलेल्या मुख्यमंत्री लाडकी बहीण व लाडका भाऊ सह इतर अनेक योजनांचा लाभ सर्वांनी घ्यावे, असे आवाहन केले. यावेळी ग्रामस्थांनी महादेव मंदिरासमोर सभामंडप बांधणे व अवैद्य धंदे बंद करणे बाबत आ. ज्ञानराज चौगुले यांच्याकडे विनंती केली.

यावेळी बळीराम सुरवसे, जगन्नाथ पाटील, शिवशंकर हत्तरगे, वैशाली खराडे, अभिमान खराडे, सरपंच व्यंकट कागे, उपसरपंच सुभाष बिराजदार, सुलताना शहा, ज्योती हत्तरगे, चनबस बिराजदार, माणिक बिराजदार, शशिकला गोसावी, ग्रामसेवक इंगळे, अमोल सोमवंशी, शिवराज चिनगुंडे, खंडू जाधव, यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते.

# मांजरा शुगर (कंचेश्वर) इंडस्ट्रीज कारखान्याच्या आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान मेळाव्यास शेतकऱ्यांचा प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट -**
तुळजापुर तालुक्यातील मंगरुळ येथील मांजरा शुगर (कंचेश्वर) इंडस्ट्रीज प्रा.लि, कारखाना सहकार महर्षी व महाराष्ट्राचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांचे मार्गदर्शनाखाली यशस्वीपणे वाटचाल करत आहे. कारखान्याने कार्यक्षेत्रातील तसेच आसपासच्या भागातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेता कारखाना व्यवस्थापनाने ऊस विकास योजना राबविण्याचे धोरण ठरविले आहे. त्याचाच एक भाग म्हणुन दि.१६ ऑगस्ट रोजी कारखान्यामार्फत तालुक्यातील काडगांव येथे ऊस विकास योजनेअंतर्गत आधुनिक ऊस लागवड तंत्रज्ञान या विषयावरती शेतकरी मेळावा घेण्यात आला. सदर मेळाव्याप्रसंगी उपस्थित असणाऱ्या शेतकऱ्यांना वसंतदादा शुगर इन्स्टियुटचे माजी शास्त्रज्ञ डॉ. सुरेश माने पाटील यांनी मार्गदर्शन केले.

राज्यात ऊस हे नगदी पिक असुन ते घटत आहे. उत्पादकता ही प्रमुख उत्पादकांपुढील समस्या आहे. तर दुसरीकडे एकरी १०० टन किंवा त्यापेक्षा जास्त उत्पादन घेणारे अनेक शेतकरी आहेत. योग्य हंगामात ऊस लागवड, आंतरपिके लागवडीच्या सुधारीत पध्दती, जमिनीची सुपीकता, योग्य पध्दतीने पुर्व मशागती, खतांचा एकात्मिक वापर, चांगल्या बेण्याची निवड, रोग व तणाचे योग्य व्यवस्थापन, आधुनीक ऊस लागवड तंत्रज्ञानाचा वापर केल्यास एकरी ऊस उत्पादनात वाढ होत असे प्रतिपादन वसंतदादा शुगर इन्स्टिटयुट, पुणे यांचे माजी शास्त्रज्ञ डॉ. माने पाटील यांनी शुक्रवार (ता.१६) कार्यक्षेत्रातील काडगांव या गावामध्ये शेतकरी मेळयात केले.




कारखान्याने दि.१६ ते १९ ऑगस्टचे दरम्यान प्रत्येक दिवशी सकाळी व सायंकाळी या सत्रात शेतकरी मेळाव्याचे आयोजन केले आहे. त्याची सुरुवात दि.१६ ऑगस्ट रोजी करण्यात आली. कारखान्याने आखलेल्या ऊस विकास कार्यक्रम व शेतकरी मेळाव्यास मोठया उत्साहाने शेतकरी बांधवांनी उत्कृष्ठ प्रतिसाद दिला.

सदर शेतकरी मेळाव्या प्रसंगी प्रमुख मार्गदर्शक माजी शास्त्रज्ञ डॉ. सुरेश माने पाटील, काडगावचे सरपंच अशोक माळी, तंटामुक्त अध्यक्ष सतीश गिराम, चांनावर, बब्रुवान शिंदे, साधु माळी, कारखान्याचे जनरल मॅनेजर सतीश वाकडे, जनरल मॅनेजर (टेक्नी.) अजीत कदम, मुख्य शेतकी अधिकारी नारायण धांडे, ऊस विकास अधिकारी शशिकांत बुलबुले, ऊस पुरवठा अधिकारी पदमाकर लोमटे, सर्व विभागप्रमुख, गटप्रमुख व शेतकरी उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त...



### श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था खसगी येथे ध्वजारोहण व ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न

**उमरगा, दि.१७ ऑगस्ट -**

सिध्देश्वर विद्यालय खसगी येथे स्वातंत्र्य दिन साजरा करण्यात आला. दि.१५ ऑगस्ट रोजी भारत देशाच्या ७८ वा स्वातंत्र्यदिनाच्या वर्धापना निमित्त श्री सिद्धेश्वर शिक्षण संस्था संचलित श्री सिद्धेश्वर विद्यालय कसगी तसेच स्वातंत्र्य सेनानी चंद्रशेखर बदोले उच्च माध्यमिक विद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने संस्थेचे सेक्रेटरी विठ्ठलराव बदोले यांच्या हस्ते प्रशालेत ध्वजारोहण व ध्वजवंदनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यावेळी राष्ट्रपिता महात्मा गांधीजींच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. महाराष्ट्र कर्नाटक राज्याच्या शेवटच्या टोकावर ती वसलेल्या कसगी गावात स्वातंत्र्योत्तर काळात सन १९५४ साली या शिक्षणा संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. येत्या २०२९ साली याच संस्थेचे अमृत महोत्सवी वर्ष म्हणून साजरी करणारी ही तालुक्यातील तिसऱ्या क्रमांकाची संस्था आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष प्रा.विठ्ठलराव पटणे उपाध्यक्ष विजयसिंह राजपूत संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी गावातील विविध संस्थेचे प्रमुख माता-पालक विद्यार्थी तसेच सर्व शिक्षक बांधव उपस्थित होते.

# रेल्वे भुसंपादनमधील सुधारीत पुरवणी अवार्ड जाहीर करुन वाढीव मावेजा द्यावा

### तुळजापूर तालुक्यातील तडवळा येथील शेतकऱ्यांची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**तुळजापूर, दि.१७ ऑगस्ट -**

सोलापुर-तुळजापूर-धाराशिव रेल्वे भुसंपादन होणाऱ्या जमीनीपैकी तडवळा (ता. तुळजापूर) येथील आवार्डमध्ये प्रचंड चुका होवुन यात शेतकऱ्यांना मोठा अर्थिक फटका बसला असुन झालेल्या चुका दुरुस्त करुन सुधारीत पुरवणी अवार्ड जाहिर करुन वाढीव मावेजा द्यावा, अशी मागणी तडवळा (ता. तुळजापूर) येथील रेल्वे भुसंपादनमधील सर्व शेतकरी व ग्रामस्थांनी भूसंपादन अधिकारी संजय ढवळे यांना निवेदन देवुन केली आहे.

विकास तिर्थक्षेत्रचा उद्धस्त बळीराजा होत असल्याने या प्रकरणाची तात्काळ केंद्र राज्य खासदार, आमदार यांनी लक्ष घालुन शेतकऱ्यांना समाधानकारक मावेजा देण्याची मागणी या शेतकऱ्यांनी केली आहे. निवेदनात म्हटलं आहे कि, तडवळा (ता. तुळजापूर) येथील सर्व शेतकरी, भुधारक रहिवाशी असुन सदर रेल्वे मार्गासाठी भुसंपादन होणाऱ्या सर्व शेतकरी, भुधारक यांना तलाठी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नोटीसमध्ये वेगवेगळया शेतकरी, भुधारकांच्या मावेजामध्ये खुप मोठया प्रमाणात तफावत असुन, आम्ही सर्व शेतकऱ्यामध्ये भुधारक रहिवाशीमध्ये तीव्र नाराजी निर्माण झालेली आहे.



धाराशिव रेल्वेसाठी भुसंपादन होत असलेल्या जमीनीतील शेतजमीन यापुर्वी सोलापूर-धाराशिव-लातुर या बायपास मार्गात ही भुसंपादन झालेली असुन यातील बहुतांशी शेतकरी भुमीहीन होणार आहे. तसेच सदर बायपास मार्गालगत असलेल्या जमीनी ही रेल्वे मार्गासाठी भुसंपादन होत आहे. त्यामुळे भुसंपादन होणाऱ्या शेतकऱ्यांकडील उत्पादनाचा मार्ग बंद होवून भविष्यात उपासमारीची वेळ येऊ शकते. तसेच तडवळा येथील झोपडपट्टी येथे जवळपास शंभरावर प्लॉट धारक घरे आहेत. सदरील घरे प्लॉट रेल्वे मार्गात भुसंपादन झाली आहे. त्याबदल्यात भुसंपादन अधिकारी, रेल्वे प्रशासनाने नोटीसद्वारे जाहिर केलेला मोबदला हा अनेकांची कुटुंब उघडयावर आणणार आहे.

बऱ्याच शेतकऱ्यांच्या जमीनी हायवेलगत असताना त्याना हायवेचा मोबदला देण्यात आलेला नाही. तसेच कांही शेतकऱ्यांच्या जमीनी बागायत असताना जिरायत लावल्या आहेत. आमच्या जमीनी श्री तुळजाभवानी मंदिरापासुन दीड ते दोन किलोमीटर अंतरावर आहेत. तसेच सदरील जमीनी हया संभाव्य अकृषी क्षमतेच्या आहेत. त्यामुळे त्यांना मावेजा कमी मिळाला आहे.

कांही शेतकऱ्यांना ग्रामीण गुणक घटक २ असताना १ गुणक झाला व हयाची जमीन बागायत असताना त्यांना जिरायत धरुन चारपट मावेजा देण्यात आला नाही. तसेच गावातील शंभर घरे रेल्वेत संपादीत होत असताना त्यांचे कुटूंब उध्दवस्त होत असताना त्यांना जागेचा मावेजा गावठाणातील देण्यात आला नाही. कांही शेतकऱ्यांना फळझाडे, बोअरवेल, बांधकाम, पाईपालाईन, विहिर असताना त्यांच्या नोंदी आवार्डमध्ये आलेल्या नाहीत त्या घेण्यात याव्यात. तसेच गावातील १०० घरे रेल्वेत विस्थापीत होत असताना त्याच प्लॉटचे तहसिलचे अकृषी असताना त्यांना जमीन म्हणुन जिरायत दाखवुन गुंठयाचा ४० हजार रूपये गुंठा भाव दिला आहे. त्याची खरेदी रजिष्ट्री ऑफीसमधून ४ लाख रू. प्रमाणे घेतला आहे.

काही शेतकऱ्यांना जमीन संपादन होत असताना त्यांना नोटीस देण्यात आली नाही व काही शेतकऱ्यांना गटात आदला बदल करून जमीन दाखवण्यात आली आहे. ही झालेल्या अवार्डमधील चुका दुरुस्त करुन सुधारीत आवार्ड जाहिर करुन मावेजा देण्यात यावा अशी विनंती केली आहे. याची दखल न घेतल्यास शेतकऱ्यांना रस्त्यावर उतरुन आंदोलन करावे लागेल अशा संतप्त प्रतिक्रिया शेतकरी वर्गातुन व्यक्त केल्या जात आहेत.

या निवेदनावर तडवळा (ता. तुळजापूर) येथील रेल्वे संपादीत शेतकरी व ग्रामस्थांचा स्वाक्षरी आहेत.

## भोसले हायस्कूलमध्ये स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट-**

येथील श्रीपतराव भोसले हायस्कूलमध्ये ७८ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त प्रशालेचे प्राचार्य नंदकुमार रामराव नन्नवरे व मान्यवरांच्या हस्ते महात्मा गांधी व डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले त्यानंतर प्राचार्यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.



त्यानंतर राष्ट्रगीत, ध्वजगीत, महाराष्ट्र राज्य गीत झाले त्यानंतर एन. सी.सी.कॅडेट व स्काऊट गाईड-रेंजर्स रोवर या चमूने राष्ट्रध्वज व मान्यवरांना मानवंदना दिली.

विविध स्पर्धेतील विजेत्यांना यावेळी बक्षीस वितरण करण्यात आले. त्यानंतर राष्ट्र भक्तीपर गीतांचे गायन प्रशालेतील संगीत शिक्षक महेश पाटील व त्यांच्या बालचमूने सादर केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष सुधीर पाटील, संस्था सरचिटणीस प्रेमाताई पाटील, कार्यकारी अधिकारी तथा संस्था संचालक आदित्य पाटील, एम.के.सील.चे जिल्हा समन्वयक धनंजय जेवळीकर, राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त वाय.के.पठाण, संस्था संचालक पी.एल.गाडे,

अरुण बोबडे तसेच इतर सेवानिवृत्त शिक्षक व संस्था संचालक संतोष कुलकर्णी, उपप्राचार्य संतोष घार्गे, उपमुख्याध्यापक प्रमोद कदम, पर्यवेक्षक वाय.के.इंगळे, सुनील कोरडे, बी.बी.गुंड, आर.बी. जाधव, एन.एन.गोरे, धनंजय देशमुख, प्रा.विनोद आंबेवाडीकर यांच्यासह अनेक मान्यवर व मोठ्या संख्येने विद्यार्थी-पालक यावेळी उपस्थित होते. तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एस.सी.पाटील यांनी केले तर कलाशिक्षक एस.डी.वाघ, शिवाजी भोसले, सुरज सपाटे यांनी छायाचित्रणाचे काम पाहिले.

तर शेवटी सांस्कृतिक विभाग प्रमुख तथा पर्यवेक्षक राजेंद्र जाधव यांनी सर्वांचे आभार मानले तर वंदे मातरम् या गीताने या कार्यक्रमाची सांगता झाली.

## मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा; महिलांमध्ये आनंदाचे वातावरण

**तभा वृत्तसेवा**

**नळदुर्ग, दि.१७ ऑगस्ट-**

राज्यातील महायुती सरकारने सुरु केलेल्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना या योजनेचे पैसे महिलांच्या खात्यावर जमा होत असल्याने महिलांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे. अनेक महिलांनी याबद्दल महायुती सरकारचे आभार मानले आहे.

राज्यातील २१ ते ६५ वयोगटातील महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी राज्यातील महायुतीच्या सरकारने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरु केली आहे. या योजनेअंतर्गत या योजनेसाठी पात्र ठरलेल्या महिलांना दर महिन्याला १५०० रुपये देण्याचा एक चांगला आणि क्रांतिकारी निर्णय राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी घेतला. या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यावर दि. १७ ऑगस्ट रोजी जुलै आणि ऑगस्ट या दोन महिन्यांचे ३ हजार रुपये जमा होणार असल्याचे राज्य सरकारने जाहीर केले होते मात्र १७ ऑगस्ट पुर्वीच दि. १५ ऑगस्ट रोजी राज्यातील अनेक महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाले आहेत.

> महायुती सरकारने राज्यातील महिलांसाठी सुरु केलेली मुख्यमंत्री माझी लाडकी बहीणही योजना अतिशय चांगली व महिलांना आर्थिक दृष्ट्या सक्षम करणारी आहे. मला आज पर्यंत कुठल्याच शासकीय योजनेचा लाभ मिळाला नाही. मात्र मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेचे ३ हजार रुपये दि. १५ ऑगस्ट रोजी माझ्या खात्यावर जमा झाल्याचा मेसेज माझ्या मोबाईलवर आला आणि मला अतिशय आनंद झाला. हा क्षण माझ्या दृष्टीने ऐतिहासिक आहे.याबद्दल मी महायुती सरकारचे अभिनंदन करून आभार मानते.
>
> **- सुनयना बनसोडे, नळदुर्ग**

तुळजापुर तालुक्यासह नळदुर्ग शहरातील अनेक महिलांच्या खात्यावर लाडकी बहीण योजनेचे ३ हजार रुपये जमा झाले आहेत. थेट महिलांच्या खात्यावर ३ हजार रुपये जमा झाल्यामुळे महिलांनी आनंद व्यक्त केला आहे. मात्र ज्या महिलांच्या खात्यावर अद्याप हे पैसे जमा झाले नाहीत त्यांची मात्र आमच्या खात्यावर पैसे का जमा झाले नाहीत याची विचारपुस करण्यासाठी पळापळ सुरु होती मात्र येत्या १९ ऑगस्ट पर्यंत या योजनेतील सर्व पात्र महिलांच्या खात्यावर पैसे जमा होणार आहेत. राज्यातील महायुती सरकारने महिलांसाठी एक चांगली आणि महिलांच्या आर्थिक उन्नतीसाठी योजना जाहीर करून हे सरकार थांबले नाही तर बोलल्या प्रमाणे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवार यांनी दिलेल्या तारखेच्या आत या योजनेतील पात्र महिलांच्या खात्यावर दोन महिन्याचे ३ हजार रुपये जमा करण्यास सुरुवात केली आहे त्यामुळे महिलांनी महायुती सरकारचे आभार मानले आहे.


या योजनेमुळे खऱ्या अर्थाने सामान्य महिला आज आर्थिक दृष्ट्या सक्षम होणार आहेत. कारण या योजनेतील पैसे थेट महिलांच्या बँक खात्यावर जमा होत आहेत. त्यामुळे या योजनेचे महिलांनी स्वागत केले आहे.

## श्री शिवपूराण कथा सप्ताहाची रविवारी काल्याने सांगता

**तभा वृत्तसेवा**

**मंगरुळ, दि.१७ ऑगस्ट-**

पवित्र श्रावण महिन्यानिमित्त मौजे मंगरूळ ता. तुळजापूर येथे आयोजित श्री शिवपूराण कथा सप्ताहाचे रविवार १८ ऑगस्ट रोजी काल्याच्या संगीतमय सादरीकरणाणे सांगता होणार आहे




ग्रामदैवत कंचेश्वर मंदिरात रविवार ११ ऑगस्ट पासून चालू असलेल्या या सप्ताहात दररोज कंचेश्वरास अभिषेक, शिवपिंडीस बेलपत्र वाहने, शिवपाठ, शिवस्त्रोत, शिवकथा, भजन शिवजागर असे कार्यक्रम संपन्न होत आहेत. हभप अच्युत पुरी महाराज गावडी दारफळ यांच्या संगीतमय श्री शिवकथा किर्तनाने या सप्ताहाची सांगता होणार आहे. या सप्ताहात शिवपूराण महात्म्य, सृष्टीखंड, सती खंड, पार्वती खंड, कुमारी खंड, युध्द खंड, शतरुद्र, कोटीरुद्र, यासारखे कथा वाचन करण्यात येत आहे यासाठी भजनी मंडळ व समस्त ग्रामस्थ परिश्रम घेत आहेत. काल्याच्या कीर्तनाचा लाभ परिसरातील भाविकांनी घ्यावा, असे आव्हाहन भजनी मंडळ मंगरूळ यांनी केले आहे.

# श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेटच्या सभासदांना १० टक्के लाभांश : संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांची वार्षिक सर्वसाधारण सभेत घोषणा

### ठेवींपेक्षा संस्थेचा स्वनिधी वाढवण्यासाठी प्रयत्न करणार

**तभा वृत्तसेवा**

**धाराशिव, दि.१७ ऑगस्ट-**

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीच्या सभासदांना १० टक्के लाभांश देण्याची घोषणा श्री सिध्दीविनायक परिवारचे संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांनी केली. ठेवींपेक्षा स्व-भाग भांडवल वाढवीण्यार भर देणार असल्याचे यावेळी सांगितले.

श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटीची १३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली शनिवार, १७ ऑगस्ट रोजी पार पडली. यावेळी ते बोलत होते. सभेस प्रमुख अतिथी म्हणून प्रगती नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष प्रशांत पाटील, श्री विठ्ठल सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष विक्रम पाटील, विधिज्ञ मंडळाचे माजी अध्यक्ष रवींद्र कदम, मधुकरराव जाधव, श्री सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटीचे अध्यक्ष दिनेश कुलकर्णी, नागेश नाईक, ॲड.नितीन भोसले, योगेश कुलकर्णी, बालाजी कोरे, गणेश कामटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी बोलताना संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी म्हणाले की, सिध्दीविनायक मल्टीस्टेट सोसायटी ही ११ शाखांमार्फत ग्राहकांना बँकिंग सेवा पुरवित असून २६ हजार सभासद बँकेच्या सेवेने समाधानी आहेत.

मागील वर्षात संस्थेला ३ कोटी ६४ लाख रुपयांचा नफा झाला असल्यामुळे सभासदांना या आर्थिक वर्षात १० टक्के लाभांश वाटप करण्यात येणार असल्याची घोषणा त्यांनी यावेळी केली. त्याचबरोबर संस्थेचा स्वनिधी वाढविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहनही त्यांनी संचालक मंडळाला केले.




सभेत उपस्थित मान्यवरांनीही संस्थेच्या कार्याचे अभिनंदन करुन संस्थापक दत्ताभाऊ कुलकर्णी यांच्या कार्यकुशलतेचे कौतुक केले. प्रारंभी बँकेचे अध्यक्ष दिनेश कुलकर्णी यांनी अहवाल वाचन केले. सभेत मांडलेल्या ठरावांना सभासदांनी टाळ्यांच्या गजरात मंजुरी दिली. सर्वसाधारण सभेचे प्रास्ताविक राजकुमार जाधव यांनी केले. सूत्रसंचालन प्रतिक देवळे यांनी तर आभारप्रदर्शन देवीदास कुलकर्णी यांनी केले. वार्षिक सर्वसाधारण सभेस सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार ज्ञानराज चौगुले यांचा भावसार समाजाच्या वतीने सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लोहारा, दि.१७ ऑगस्ट-**



लोहारा शहरातील भावसार समाजाला सभा मंडपचे बांधकाम करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात यावा, अशी मागणी भावसार समाजाच्या वतीने दि.१७ ऑगस्ट २०२४ रोजी

आ.ज्ञानराज चौगुले यांच्याकडे केली. निधी देऊ असे आ.चौगुले यांनी आश्वासित केले. यावेळी भावसार समाजाच्या वतीने आ.ज्ञानराज चौगुले यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी शिवसेना जिल्हा प्रमुख मोहन पणुरे, शिवसेना तालुका प्रमुख जगन्नाथ पाटील, माजी गटनेते अभिमान खराडे, माजी सरपंच अरुण (आबा) माळवदकर, प्रताप लोभे, राजेंद्र माळी, तालुका उपप्रमुख परमेस्वर साळुंके, नगरसेवक विजयकुमार ढगे, नगरसेवक अविनाश माळी, नगरसेवक अमिन सुंबेकर, नगरसेवक गौस मोमिन, भाजपा तालुका सरचिटणीस इकबाल मुल्ला, नगरसेवक आरिफ खाणापुरे, शहर प्रमुख श्रीकांत भरारे, मेडिकल असोसिएशन तालुकाध्यक्ष प्रमोद बंगले, ओम कोरे, गगन माळवदकर, शिवराज झिंगाडे, सुरेश दंडगुले, दत्तात्रय माळवदकर, सुधीर झिंगाडे, अक्षय माळवदकर, प्रशांत माळवदकर, मेघराज हंबीरे, अमोल झिंगाडे, सौरभ झिंगाडे, सुरेश झिंगाडे, नागेश माळवदकर, प्रशांत अबुरे, संतोष झिंगाडे, दिगंबर भिंगे, सुमित झिंगाडे, यांच्यासह समाज बांधव उपस्थित होते.

# नालगाव येथे धनंजय सावंत यांची जनसंवाद बैठक संपन्न

### गावाच्या विकासासाठी राजकीय गट तट विसरुन एकत्र या, एक कॉल आणि गावचा प्रॉब्लेम सॉल

**तभा वृत्तसेवा**

**परंडा, दि.१७ ऑगस्ट-**

राजकारणाच्या ठिकाणी राजकारण, तर समाजकार्यच्या ठिकाणी समाजकारण हे उद्दिष्ट डोळ्यांसमोर ठेऊन सामाजिक बांधिलकी जपत जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी धनंजय सावंत यांच्या वतीने परंडा तालुक्यातील नालगाव येथे गावभेट व जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

दि.१७ रोजी नालगाव येथील मारुती मंदिर येथे जनसंवाद बैठकीचे आयोजन करण्यात आले. या बैठकीत गावातील नागरिकांच्या अडीअडचणी व विविध समस्या जानुन घेण्यात आल्या.

यावेळी गावात तलाठी, ग्रामसेवक, शासकीय दवाखान्यात कर्मचारी उपस्थित राहत नसल्याचे नागरीकांनी तक्रार धनंजय सावंत यांच्या समोर मांडली सावंत यांनी



संबंधित कर्मचाऱ्यांच्या वरीष्ठांना लागलीच तात्काळ फोनवरून संपर्क साधून उपस्थित राहत नसलेल्या कर्मचाऱ्यांच्या वरिष्ठांची चांगलीच कान उघडणी करुन जे कर्मचारी उपस्थित राहु शकतात अशाच कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्या नालगाव येथे करण्याचे सांगितले.

गावाच्या विकासासाठी राजकीय गट तट विसरुन एकत्र या अशी साद सावंत यांनी ग्रामस्थाना घातली. त्याच बरोबर शेतकऱ्यांच्या शिवारातील अनेक शेतरस्त्याची कामे तात्काळ मार्गी लावण्याच्या सूचना भैरवनाथ उद्योग समूहाच्या यंत्रणेस दिल्या. यावेळी गावातील शक्य तेवढ्या समस्या भैरवनाथ उद्योग समूहाच्या वतीने सोडवू असे त्यांनी नागरिकांना आश्वासन दिले.

यावेळी सरपंच महेश करळे, अंगद करळे, सचिन करळे, सुशिल करळे, बालाजी करळे, अरूण करळे, सिद्धेश्वर करळे, जिल्हा समन्वयक गौतम लटके, नागा पाटील आदीसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

IN THE COURT SHRI. P. H. KRVE, DHOC DIST. COURT-1
MOTOR CCIDENT CLIM$^{2}$ TRIBUNL T OSMNBD

Notice to show cause
(General form)
(Sch. I..H. Form 4)
CLIM$^{2}$ RS. Rs. 7,00,000/-

Exh. 19
M..C.P No. 135/2022

**Vasant Shrirang Jadhav, ....Claimant.**
**V/s**
**Naresh Tour, ... Respondents.**

**To,**
3- Pankaj Shridhar Zirmire, ge Major Occ- Business, R/o Kanheri, Po. Sarola Tq. usa, Dist. Latur Mob No. 9565224912. (Owner of Car No. MH 06 BM$^{2}$ 4833)
**Respondent**

WHERES the above named Claimant - Vasant Shrirang Jadhav, ge 47 yrs., Occ- Service R/o. Samudrawani, Tq. and Dist. Osmanabad Mob No. 8975886959. has made an application to this court U/sec. 166 of M.V. ct regarding the compensation of Motor ccident, that copy of application sent herewith.

You are hereby summons to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the 24.10.2024 at 10.30 a. m. in the forenoon, to show cause against the application failing wherein the said application will be heard and determined Ex-parte.

lso take notice that in default to your failing to show cause on or before the date mentioned, you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the Court.

Date:-06/08/2024

**Superintendent,**
**dhoc District Court 1, Osmanabad**
**(By Order)**

---

IN THE COURT SHRI. P. H. KRVE, DHOC DIST. COURT-1
MOTOR ACCIDENT CLAIM$^{2}$ TRIBUNAL T OSMANABAD

Notice to show cause
(General form)
(Sch. I..H. Form 4)
CLAIM$^{2}$ RS. Rs. 7,00,000/-

Exh. 18
M..C.P No. 135/2022

**Vasant Shrirang Jadhav, ....Claimant.**
**V/s**
**Naresh Tour, ... Respondents.**

**To,**
2- Ulhas Yeshwant Palkar, ge Major Occ-Business R/o Raigad, Tq. Dist. Raigad (previous owner of Car No. MH-06 BM$^{2}$ 4833)
**Respondent**

WHERES the above named Claimant - Vasant Shrirang Jadhav, ge 47 yrs., Occ- Service R/o. Samudrawani, Tq. and Dist. Osmanabad Mob No. 8975886959. has made an application to this court U/sec, 166 of M.V. ct regarding the compensation of Motor ccident, that copy of application sent herewith.

You are hereby summons to appear in this Court in person or by a pleader duly instructed on the 24.10.2024 at 10.30 a. m. in the forenoon, to show cause against the application failing wherein the said application will be heard and determined Ex-parte.

lso take notice that in default to your failing to show cause on or before the date mentioned, you are liable to have your defense struck out.

Given under my hand and the seal of the Court.

**Date:-06/08/2024**

**Superintendent,**
**dhoc District Court 1, Osmanabad**
**(By Order)**

# केंद्रात व राज्यात महिला-भगिणींचे हीत बघणारे सरकार कार्यरत : गिरीश महाजन

**तभा वृत्तसेवा**
**भोकर,१७ ऑगस्ट -**

केंद्रात व राज्यात महिला भगिनींचे हित बघणारे त्यांचे बळकटीकरण सक्षमीकरण व सामाजिक मानसन्मान वाढवून मुख्य प्रवाहात आणणारे सरकार कार्यरत आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही त्यातीलच एक अभियान आहे, असे प्रतिपादन राज्याचे ग्रामविकास, पर्यटन मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी आज येथे केले.

राज्य शासनाच्या मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेच्या राज्यस्तरीय शुभारंभ पुणे येथून मुख्यमंत्र्यांनी केले. त्याचवेळी नांदेड जिल्ह्याचा जिल्हास्तरीय मुख्य कार्यक्रम जिल्ह्यातील भोकर येथे आज थाटात संपन्न झाला. हजारो महिलांच्या उपस्थितीतील या कार्यक्रमांमध्ये राज्यातील शासन हे विविध योजनांच्या माध्यमातून दृश्य स्वरूपात महिला भगिनींच्या पाठीशी आहे. राज्यात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महिला संदर्भात नवीन आर्थिक क्रांती असून यामुळे महिलांच्या सामाजिक सन्मानामध्ये वाढ झाली आहे, प्रतिपादन त्यांनी यावेळी केले.

या कार्यक्रमाला पालकमंत्र्यांसह माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार डॉ. अजित गोपछेडे, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मिनल



करणवाल, अतिरिक्त जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, माजी आमदार अमर राजूरकर, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष मंगाराणी अंबुलगेकर, श्रीजया चव्हाण, उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा कदम, महिला व बालविकास अधिकारी रूपाली रंगारी, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाला आपल्या परंपरागत बंजारा पेहराव मध्ये आलेल्या महिला लक्ष वेधून घेत होत्या. ज्या महिलांना तीन हजार रुपये मिळाले त्यांना प्राथमिक स्वरूपात प्रमाणपत्र ही यावेळी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी प्रतिनिधी स्वरूपात महिलांनी राज्य शासनाच्या या योजनेबद्दल आपल्या प्रतिक्रिया व्यक्त केल्या.

यावेळी पालकमंत्री म्हणाले, केंद्र व राज्यातील सरकारने महिलांच्या सन्मानार्थ विविध योजना सुरू केल्या आहे. केंद्रात आलेल्या शासनाने दहा वर्षापूर्वी घरातील महिलांना स्वयंपाकाच्या धुराचा त्रास होऊ नये यासाठी उज्वला गॅस योजना सुरू केली. केंद्र सरकारने २० कोटी महिलांना गॅस उपलब्ध करून दिला आहे. आम्ही राज्य सरकारने आणखी त्यामध्ये भर घातली असून आता महिलांना तीन सिलेंडर मोफत दिले जाणार आहेत.महिलांना एसटी भाडे ५० टक्के माफ करण्यात आले आहे. राज्यातील मुलींना मोफत उच्च शिक्षण दिले जाणार आहे. बचत गटाच्या बळकटीकरणाकडे अधिक लक्ष देण्यात येत असून सोळा हजार कोटींचा पतपुरवठा करण्यात आला आहे. हक्काचे घर, प्रत्येकाला घर,प्रत्येक घरात शौचालय आणि आता प्रत्येक घरात पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यासाठी सरकार कटीबद्ध आहे.

यावेळी उपस्थित महिलांना संबोधतांना त्यांनी मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेतून ज्या महिलांना अद्याप पैसे मिळाले नसतील त्यांनाही ते मिळतील याबद्दल आश्वस्त केले.३१ ऑगस्टपर्यंत अर्ज दाखल करण्याची मुदत ठेवण्यात आली आहे. ही योजना कायमस्वरूपी असेल. त्यामुळे या संदर्भात कोणी काही गैरसमज पसरवत असेल तर त्याला बळी पडू नका, असे आवाहन केले.मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजनेचा लाभ महिलांनी घ्यावा,बचत गट स्थापन करावेत असे आवाहनही केले. यावेळी त्यांनी सगळ्यांच्या खात्यात पैसे जमा झाले की नाही अशी उपस्थित महिला समुदायाला विचारणा केली. ज्यांनी आतापर्यंत अर्ज केला नसेल त्या सर्व महिलांना अर्ज करायला सांगा असेही त्यांनी स्पष्ट केले.

माजी मुख्यमंत्री खासदार अशोक चव्हाण यांनी यावेळी संबोधित केले. केंद्र व राज्य शासन महिलांसाठी नवनवीन योजना आणत असून त्या सर्व योजनांचा वापर भोकर पासून तर नांदेड पर्यंत सर्वांना मिळेल याची खात्री बाळगा. आपल्या जीवनामध्ये बदल करण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी खासदार अजित गोपछडे श्रीजया चव्हाण यांनीही यावेळी संबोधित केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीनल करणवाल यांनी केले. तर आभार प्रदर्शन उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा कदम यांनी केले.

## संक्षिप्त वृत्त



### खरीप अनुदान वाटपासाठी तहसीलदार यांना निवेदन

**देगलूर-**देगलूर तहसील कार्यालय येथे सन २०२३ च्या खरीप हंगामातील ई पीक पाहणी करून सुद्धा सोयाबीन अनुदान वाटपासाठी गाव पातळीवर प्राप्त ई पीक पाहणी यादीमध्ये नावाची नोंद नसल्यामुळे अनेक शेतकरी बांधव अनुदानापासून अपात्र ठरलेले आहेत त्यामुळे त्या शेतकऱ्यांना योग्य चौकशी करून अनुदान द्यावे असे निवेदन तहसीलदारांना कुरूडगी गावकऱ्यांच्या वतीने देण्यात आले. यावेळी कुरूडगी नगरीचे सरपंच सदाशिवराव पाटील, सरपंच प्रतिनिधी शंकरराव पाटील, ग्रामपंचायत सदस्य रमेश कोकले व तसेच शाहीर कोकले उपस्थित होते. यावेळी तहसीलदार नागमवाड यांनी निवेदन स्वीकारून अपात्र झालेल्या शेतकऱ्यांची नावे शासनाला कळविण्याचे आश्वासन दिले.

### हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराच्या विरोधात ईस्लापूर बाजारपेठ बंद

**नांदेड-**सध्या बांगलादेशातील हिंदूंची परिस्थिती अत्यंत चिंताजनक आहे. बांगलादेशातील हिंदू अत्याचार, भेदभाव, आणि हिंसाचाराचा सामना करत आहेत. त्यांच्या अस्तित्वासाठी लढा देत आहे. त्यांच्या सुरक्षेसाठी आणि हक्कांसाठी जागतिक स्तरावर आवाज उठवण्याची आवश्यकता आहे आणि त्यासाठीच आज दि.१७ ऑगस्ट रोजी ईस्लापूर येथे बांगलादेशमध्दे हिंदूवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात आणि कत्तली विरोधात निषेध करण्यासाठी ईस्लापूर बाजारपेठ बंद ठेवून निषेध व्यक्त करण्यात आला . या बंद मध्ये अनेक राजकीय नेते,कार्यकर्ते तसेच सामान्य जनतेनेही खूप मोठ्या संख्येने सहभाग घेऊन त्यांच्या मनातील असंतोष आणि दु:ख व्यक्त केले. बांगलादेशात हिंदूवर होणारे अत्याचार अत्यंत भयंकर आहेत. त्यांच्या घरांची लूटमार, मंदिरांचा विध्वंस, महिलांवर होणाऱ्या अत्याचारांमुळे तिथला संपूर्ण हिंदू समाज भयभीत झाला आहे. या मोर्चाच्या माध्यमातून आम्ही जागतिक समुदायाला आवाहन केले की, हिंदूवर होणाऱ्या अत्याचारांच्या विरोधात कठोर पाऊले उचलावीत जेणेकरून तिथल्या हिंदूंना योग्य न्याय आणि सुरक्षा मिळेल.या बंद मधील सर्व व्यापारी वर्गाचा सहभाग पाहून ईस्लापूर येथील एकजूट आणि शक्तीचे दर्शन घडले.



### यशवंत पॅरामेडिकल कॉलेज येथे स्वातंत्र्य दिवस साजरा.

**नांदेड-** येथील वाघी वाघी रोड हसापूर ,नांदेड येथील यशवंत पॅरामेडिकल कॉलेज, येथे १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनानिमित्त ध्वजावंदन समारोह साजरा करण्यात आला यावेळी राष्टध्वजाचे ध्वजारोहण हे समाजसेवक मो.झकीयोद्दिन अजिजोदिन सिद्दीकी (एक्स.आर्मी) यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी यशवंत परॉमेडीलक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सय्यद नौशिन उपाध्यक्ष शहनाज सय्यद चांद, सचिव तथा व्यवस्थापक लोटस हॉस्पिटल शाहेद सय्यद चांद व यशवंत पॅरामेडिकल कॉलेजचे संपूर्ण शिक्षक व स्टाफ उपस्थित होता.

## नागरिकांच्या हिताच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात :आशाताई शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१७ ऑगस्ट -**

भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त सामाजिक कार्यकर्त्या सौ .आशाताई श्यामसुंदर शिंदे व लोहा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती विक्रांत पाटील शिंदे यांनी लोहा तहसील कार्यालयातील ध्वजावंदनास उपस्थित राहून प्रशासनाला सर्वसामान्य जनतेच्या हिताच्या योजना प्रभावीपणे राबवाव्यात अशा सुचना केल्या.

यावेळी तालुक्यातील माजी सैनिकांचा शाल, श्रीफळ, पुष्पहार देऊन सन्मान करण्यात आला. लोहा पंचायत समिती कार्यालयाला नुकताच खडज मानांकन प्राप्त झाल्यामुळे पंचायत समिती कार्यालयाची पाहणी करून समाधान व्यक्त केले.

लोहा पंचायत समितीचे गटविकास अधिकारी डि .के.आडेराघो व कार्यालयीन प्रशासन अधिकारी सतीश चोरमले, कनिष्ठ कार्यालयीन प्रशासन अधिकारी प्रियदर्शन वाघमारेसह टीमचे कौतुक केले. प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या मेहनतीमुळे पंचायत समितीला आय.एस.ओ मानांकन मिळाल्यामुळे सर्वांचे आभार मानले.तहसीलदार विठ्ठल परळीकर यांनी पीक पाहणी रद्द करावे व सरसकट शेतकऱ्यांना आर्थिक मदत द्यावे असे सांगितले. यावेळी उपसभापती श्यामअण्णा पवार, समन्वय समिती सदस्य सिद्धू वडजे, बोरगावचे पुंडलिक बोरगावकर, बाजार समितीच्या संचालिका पूनमताई क्षिरसागर, चेअरमन नागेश हिलाल, संचालक सुधाकर सातपुते, संजय गांधी निराधार योजना समिती सदस्य अशोक सोनकांबळे, व्यंकटी आढाव, अजय हंकारे, भरत गायकवाड, प्रसाद जाधव, अमोल गोरे , माजी नगरसेविका पुष्पलता कापुरे यासह कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

## उमरी शहर कडकडीत बंद

**तभा वृत्तसेवा**
**उमरी,१७ ऑगस्ट -**

बांग्लादेशात हिंदूवर क्रुर पद्धतीने अन्याय अत्याचार तेथिल धर्मांध लोकांनी करीत दंगली घडवून अनेक हिंदू मंदिरे उद्धस्त करीत महिलावर आत्याचार होत असल्याच्या निषेध म्हणून उमरी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले.

जिल्हातील हिंदू संघटनांनी बांग्लादेशातील हिंदू वर क्रुर अन्याय झाल्याने त्या घटनेचा निषेध करण्यासाठी दि १७ ऑगस्ट रोजी जिल्हा बंद ची हाक दिली होती. त्या अनुषंगाने. उमरी शहरातही १७ ऑगस्ट रोजी सकाळ पासुनच कोणीच दुकाने , हॉटेल , पानपट्टी , बाजारपेठ , व्यापार पेठ, बियर अन्ड बॉर , खानावळ , शाळा महाविद्यालये उघडलेच नाहीच उमरी शहर कडकडीत बंद ठेवण्यात आले आहे. विशेषता उमरी शहरात हिंदू - मुस्लीम ऐक्य असल्याने मुस्लीम समाज बांधव सर्व दुकाने बंद करून निषेधात सहभाग नोंदवला शहरात कांही अनुचित प्रकार घडू नये कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावे म्हणून पोलिस निरीक्षक अंकुश माने यांनी पोलिस फोर्सचा घेवून चोक बंदोबस्त ठेवला होता.

## सिडकोत स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा ;ठिकठिकाणी ध्वजारोहण

**तभा वृत्तसेवा**
**नवीन नांदेड,१७ ऑगस्ट -**

सिडको येथील सिडको कार्यालय व मनपा क्षेत्रीय कार्यालय येथे ७८वा स्वातंत्र्य दिन सोहळा उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते तर सिडको क्षेत्रीय कार्यालयाचे क्षेत्रीय अधिकारी संभाजी कास्टेवाड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

सिडको येथे सिडको म्हणाप्पा कार्यालय येथे दिनांक १५ ऑगस्ट २०२४ रोजी सकाळी ठीक सात वाजता राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण सहाय्यक आयुक्त संभाजी कास्टेवाड यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी कार्यालयाची कार्यालयीन अधीक्षक विलास गजभारे कर पर्यवेक्षक संजय नागापूरकर, प्रकाश दर्शनी, मारुती सारंग, स्वच्छता निरीक्षक किसन वाघमारे, अर्जुन बागडी यांच्यासह मालूम यनफळे, महेंद्र पठाडे, चौरे नथुराम, दीपक नागरे, दीपक जोंधळे, राहुल पाईकराव,यशवंतकर रमेश विठ्ठल आंबटवार, बालाजी लोहगावकर, लोखंडे विवेकानंद, पवळे रवींद्र, अशोक भंडारे, नरेंद्र सिंगे प्रशांत चावरे ,सौ.अर्चना जोंधळे,सौ. मिनाताई आडबलवार, मुक्ताबाई धर्मेकर, मदन बैस त्यांची उपस्थिती होती.तर सिडको कार्यालय येथे सिडको कार्यालयाचे प्रशासक भुजंगराव गायकवाड यांच्या हस्ते राष्ट्रध्वजाचे ध्वजारोहण सकाळी सात वाजता करण्यात आले यावेळी कार्यालयाचे कर्मचारी संकेत गिरी, विलास जोशी यांच्यासह सुरक्षारक्षक यांची उपस्थिती होती.

## रक्षाबंधन निमित्त 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' महिला मेळावा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड,१७ ऑगस्ट -**

अल्पावधीतच महिलांच्या पसंतीस उतरलेल्या 'मुख्यमंत्री लाडकी बहिण' योजनेअंतर्गत 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' (रक्षाबंधन) महिला मेळावा शहरातील कौठा भागातील मातोश्री मंगल कार्यालय येथे आयोजीत करण्यात आला असुन या मेळाव्याची जबाबदारी माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर, महिला मोर्चाच्या प्रदेश उपाध्यक्षा प्रणितातार्ई देवरे-चिखलीकर यांच्यावर रक्षाबंधन निमित्त देण्यात आली आहे. हा मेळावा रविवार (दि.१८) रोजी सायं.४.०० वाजता पार पडणार आहे. या मेळाव्यामध्ये राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे ऑनलाइन सहभागी होणार आहेत. यासंदर्भाने नियोजनाची बैठक माजी खा.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या वसंतनगर नांदेड येथील संपर्क कार्यालयात पार पडली.



यावेळी भाजपा नांदेड दक्षिण ग्रामीण जिल्हाध्यक्ष डॉ.संतुकराव हंबर्डे, महानगराध्यक्ष दिलीप कंदकुर्ते, भाजपा उत्तर ग्रामीण जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, माजी महानगराध्यक्ष प्रवीण साले, भाजपा महानगर सरचिटणीस डॉ. शितलताई भालके,भाजपा युवा मोर्चा महानगराध्यक्ष बंटी मल्होत्रा, भाजपा प्रदेश कार्यकारिणी बाळू खोमणे, माजी महिला मोर्चा महानगराध्यक्ष वैशालीताई देशमुख, धनश्रीताई देव, सरचिटणीस अमोल कदम, युवा मोर्चा प्रदेश सचिव अनिल बोरगावकर, मंडळाध्यक्ष मारुती वाघ,सुरेश लोट, जसबीरसिंघ धुपीया, महादेवी मठपती यांच्यासह आदिजण उपस्थित होते.

या योजनेमुळे लाखो भगिणींना दिलासा मिळाला आहे. या योजनेचा निधी जिल्ह्यातील असंख्य महिलांच्या बँक खात्यात जमा झाल्यानंतर भाजपा प्रदेश कार्यालयाच्या वतीने 'लाडक्या बहिणीचा देवाभाऊ' (रक्षाबंधन) निमित्त महिला मेळावे राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात आयोजित करण्यास प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे व महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्ष चित्राताई वाघ यांनी सांगितले होते.

या बैठकीत भाजपाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी या महिला मेळाव्याची नांदेड जिल्ह्याची जबाबदारी माजी खासदार प्रतापराव पाटील चिखलीकर, महिला आघाडीच्या श्रद्धा चव्हाण व प्रणितातार्ई देवरे-चिखलीकर यांच्याकडे सोपविली आहे.

## निवघ्यात स्मशानभूमीसाठी गावकऱ्यांचा एल्गार



**तभा वृत्तसेवा**
**मुदखेड,१७ ऑगस्ट -**

निवघा तालुका मुदखेड गावातील प्रमुख समाजाच्या स्मशानभूमीच्या जागेचा प्रश्न निकाली निघत नसल्याने तसेच स्मशानभूमी जाण्यासाठी रस्ता नसल्याने मरणानंतरही यातना सोसाव्या लागत असल्यामुळे गावकऱ्यांनी आता प्रमुख मागण्यांसाठी एल्गार पुकारला असून प्रशासन तसेच लोकप्रतिनिधींचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते तथा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे तालुका अध्यक्ष प्रमोद व्यंकटराव पवार यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे.

गेल्या अनेक वर्षापासून प्रलंबित असलेला प्रश्न सुटेल का याची आस गावकऱ्यांना लागली आहे. या गावात मराठा, बौद्ध, लिंगायत, मुस्लिम या समाजाचे मोठ्या प्रमाणात वास्तव्य आहे. मराठा व बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीस जागा उपलब्ध असली तरी जाण्या येण्यासाठी रस्ताच नसल्याने पावसाळ्यात अंत्यसंस्काराचा शेवटचा प्रवास सुद्धा चिखलातून होत आहे. यासाठी गावकऱ्यांनी अनेक वेळा निवेदन देऊनही प्रशासन व लोकप्रतिनिधीनी टोलवाटोलवीच केलेली आहे. निवडणुकीच्या तोंडावर मुरूम टाकून थातुर मातुर डागडुजी केली जाते पुन्हा या प्रश्नाकडे ढुंकूनही बघितले जात नाही. यासोबतच लिंगायत व मुस्लिम समाजाच्या स्मशानभूमीच्या दफन विधीचा प्रश्न मोठा आहे. स्थानिक प्रशासनाकडे गावठाण जागा असूनही जागेचा प्रश्न सोडविला जात नाही याबाबत प्रशासनाला अनेक वेळा निवेदन देऊनही गांभीर्याने घेतली जात नाही असा ग्रामस्थांचा आरोप आहे.

गावातील विविध समाजाच्या स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यांसाठी सातत्याने दुर्लक्ष केले जात आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी याबाबत तातडीने निर्णय घ्यावा या संदर्भात सन २०१८ मध्ये तहसीलदार यांना आदेश देऊन ग्रामस्थांचा प्रशांत भूमीचा प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात पत्र दिले होते परंतु यावर प्रशासनाने कुठलाही निर्णय घेतला नसून गेल्या अनेक वर्षापासून स्मशानभूमीच्या रस्त्याचा व जागेचा प्रश्न अजूनही प्रलंबितच आहे. एक वर्षापूर्वी स्वातंत्र्यदिनी आमरण उपोषण केले असता संबंधित प्रशासनाच्या प्रमुख अधिकाऱ्यांनी तोंडी व लेखी आश्वासन देऊन स्मशानभूमीचा रस्ता व जागेचा प्रश्न निकाली काढण्याचे आश्वासन दिले होते परंतु आजपर्यंत यावर कोणताही ठोस निर्णय घेतलेला नसून मृतदेहाची विटंबना सुरूच आहे. दफनविधी जागेच्या सुरक्षीर भिंतीचा प्रश्न मार्गी लावण्यासाठी प्रशासन व लोकप्रतिनिधीचे लक्ष वेधण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते प्रमोद व्यंकटराव पवार यांनी ग्रामस्थांच्या एलगारातून ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे उपोषणाचा आजचा चौथा दिवस असूनही संबंधित अधिकारी तसेच लोकप्रतिनिधींनी कुठलीही दखल घेतली नाही. मृतांच्या होणाऱ्या विटंबनेचा प्रवास केव्हा थांबणार हेच पहावे लागणार आहे.

**तोडगा न निघाल्यास प्राण त्याग करणार :प्रमोद पवार**

गावातील लिंगायत तसेच मुस्लिम समाजाच्या जागा उपलब्ध नसल्याने गेल्या अनेक वर्षांपासून या समाजाच्या लोकांना आपापल्या सोयीनुसार दफनविधी क्रिया करावी लागते. मुस्लिम समाजाच्या दफनविधीसाठी जागा नसल्याने त्यांचा प्रश्न एरणी आला आहे. मराठा व बौद्ध समाजाच्या स्मशानभूमीकडे जाणारा रस्ता पावसाळ्यात चिखलमय झाला असून अजूनही हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यांसाठी आमरण उपोषण सुरू असून याबाबत तोडगा न निघाल्यास समाजाच्या हितासाठी प्राण त्याग करण्याचा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटना तालुका अध्यक्ष प्रमोद पवार यांनी दिला.

**रस्त्याचे काम लवकर पुर्ण करण्याच्या सुचना : तहसीलदार आनंद देऊळगावकर**

विविध समाजाच्या स्मशानभूमीच्या प्रमुख मागण्यासंदर्भात सुरू असलेल्या आमरण उपोषणाबाबत तहसीलदार यांना विचारणा केली असता स्मशानभूमीकडे जाणाऱ्या रस्त्याचा मजबुती करण्यासंदर्भात संबंधित गुत्तेदार यांना काम लवकरात लवकर पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय प्रशासनाच्या वतीने स्थानिक प्रशासनास जागेचा प्रश्न निकाली काढण्यासंदर्भात पत्रव्यवहारही करण्यात आलेला असल्याची माहिती तहसीलदार आनंद देऊळगावकर यांनी दिली.

# किनवट शहरासह ग्रामिण भागात आ. केराम यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

**तभा वृत्तसेवा**
**देगलूर,१७ ऑगस्ट -**

किनवट- माहूर विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस किनवट शहरासह ग्रामीण भागात प्रचंड उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला असून यानिमित्त हुतात्मा गोंडराजे मैदानात हजारोच्या उपस्थितीत आ.भीमराव केराम यांना क्रेनमशीनद्वारे ४०० किलोचा भव्यहार घालून अभिष्टचिंतन करण्यात आले. वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती तसेच ग्रामीण भागातील सर्वसामान्य नागरिकांनी सकाळपासून हार तुरे घेऊन अलोट गर्दी केली होती.किनवट मतदारसंघात कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे केल्यामुळे भीमराव केराम हे आतार्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत अशा भावना या यावेळी कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्या आहेत.

किनवट विधानसभेचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांचा वाढदिवस दि १५ ऑगस्ट२०२४ रोजी किनवट व माहूर तालुक्यातील गाव,वाडी व तांड्यात विविध उपक्रम राबऊन उत्साहात व जल्लोषात साजरा करण्यात आला.

सकाळी ५ वा पेंदा येथील प्रसिद्ध नागढव मंदिरात आमदार भीमराव केराम यांनी मनोभावे विधिवत पूजा अर्चना करून दिवसाची सुरुवात केली. यावेळी नागढव देवस्थानचे मुख्य पुजारी बाळू महाराज,विधानसभा निवडणूक प्रमुख बाबुराव केंद्रे युवानेते विवेक केंद्रे व नागनाथ कराड यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते. त्यानंतर साई मंदिरात जाऊन त्यांनी दर्शन घेतले असून यावेळी गुरुस्वामी पवार तसेच माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार यांनी त्यांचा सत्कार करून अभिष्टचिंतन केले. अभिष्टचिंतनाचा मुख्य कार्यक्रम किनवट येथील हुतात्मा गोंडराजे मैदानात आयोजित केला होता.यावेळी हजारो नागरिकांच्या उपस्थितीत व फटाक्यांची जोरदार आतिशबाजी करत, ढोल ताशाच्या गजरात आमदार भीमराव केराम यांना ४०० किलो वजनाचा भव्य दिव्य हार मोठ्या क्रेनमशीनद्वारे घालून कार्यकर्त्यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या.भाजपाचे युवानेते कुलदीप चिकाटे,सचिन आठवले संभाजी सोनकांबळे व त्यांच्या मित्र परिवाराने या कार्यक्रमाचे आयोजन केले.त्यानंतर पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने जिल्हाध्यक्ष विनोद भरणे यांनी महात्मा फुले चौक येथे वाढदिवसानिमित्त आ भीमराव केराम यांचा भव्य सत्कार करून शुभेच्छा दिल्या तसेच यानिमित्त भोजनदान दिले. समता नगर येथील तक्षशिला बौद्ध विहारात महिला मंडळाच्यावतीने वाढदिवस साजरा केला असून यावेळी तालुक्यातील विकासकामाबद्दल कौतुक केले वाढदिवसानिमित्त आ. भीमराव केराम यांना पेढे भरूऊन शुभेच्छा



दिल्या. भाजपा ओबीसी आघाडीच्या वतीने तालुका अध्यक्ष शेखर चिंचोळकर यांनी सारखणी येथे वाढदिवस आयोजित केला होता. यावेळी आ. भीमराव केराम यांचे आगमन होताच त्यांच्यावर जे सी बी मशीनद्वारे पुष्पवृष्टी करण्यात आली व भव्य हार घालून वाढदिवस जल्लोशात साजरा केला. तालुक्यातील सावरगाव, बोधडी घोटीफाटा, सारखणी, चिखली खुर्द,बेल्लोरी धा.पालाईगुडा,थारा, गोकुदा पंचायत समिती कार्यालय गोकुंदा येथील आदिवासी संशोधन केंद्र यासह ठीक ठिकाणी वाढदिवस साजरा करण्यात आला. यानिमित्त सकाळपासून किनवट येथील लोकार्पण जनसंपर्क कार्यालयात तसेच त्यांच्या निवासस्थानी विविध क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती, कार्यकर्ते हितचिंतक चाहते व नागरिकांनी शुभेच्छा देण्यासाठी हार तुरे घेऊन दिवसभर अलोट गर्दी केली होती. विशेष म्हणजे सोशल मीडियावर दिवसभर सर्वचस्तरातून शुभेच्छाचा वर्षाव झाल्याचे दिसून आल्यामुळे भीमराव केराम हे कमी कालावधीत सर्वाधिक विकासकामे करणारे आतापर्यंतचे सर्वात यशस्वी व लोकप्रिय आमदार ठरले आहेत.

**मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्र्यांसह अनेकांनी दिल्या शुभेच्छा**

दरम्यान वाढदिवस असल्याचे कळतात राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अध्यक्ष अजितदादा पवार, भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, ग्रामविकास मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन, राज्यसभेचे खासदार अशोक चव्हाण, माजी खासदार प्रताप पाटील चिखलीकर यांनी भ्रमणध्वनीद्वारे संपर्क करून आमदार भीमराव केराम यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

CMYK

लातूर दिनांक

लातूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केल

# विद्यार्थी सहाय्यक मंडळास डॉ. कुंभार यांची २५ हजारांची देणगी

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १६ ऑगस्ट-**

माजी प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लातूरच्या विद्यार्थी सहाय्यक मंडळास २५ हजार रुपयांची देणगी देवून गरीब होतकरू विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी सहकार्य केले केल्याबद्दल त्यांचा मंडळाच्यावतीने सत्कार करण्यात आला.



डॉ. नागोराव कुंभार यांनी शिक्षण क्षेत्रातही अनमोल कार्य केल्याची दखल घेवून सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्थेच्यावतीने समाजभूषण पुरस्कार देवून खा. शरद पवार यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले होते. या सन्मानाबद्दल विद्यार्थी सहाय्यक मंडळाचे अध्यक्ष डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते शाल,पुष्पहार देवून सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी मंडळाचे सचिव प्राचार्य डॉ. नागनाथ मोटे, उपाध्यक्ष प्राचार्य डॉ. कुसुम मोरे, कोषाध्यक्ष प्रा.बालाजी पळसकर, सहसचिव विक्रम कदम, संचालक प्रा. फ. म. शहाजिंदे, ग्रंथमित्र पांडुरंग अडसुळे,प्रा.सुधीर साळुंके आदि उपस्थित होते.



## संक्षिप्त वृत्त



### मनपा शाळांतील ११०० विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी

**लातूर, दि. १७ ऑगस्ट-**

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने चालविल्या जाणाऱ्या शाळांमधील ११०० हून अधिक विद्यार्थ्यांची पालिकेच्या वतीने आरोग्य तपासणी करण्यात आली. यात ९७ विद्यार्थ्यांना काही समस्या असल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांच्यावर उपचार करण्यात आले. मनपाच्यावतीने लातूर शहरात १६ शाळा चालवल्या जातात. या शाळांमध्ये शेकडो विद्यार्थी शिक्षण घेतात.या विद्यार्थ्यांचे आरोग्य निरोगी रहावे, या हेतूने मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे आणि उपायुक्त (आरोग्य) डॉ.पंजाब खानसोळे यांच्या निर्देशानुसार वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. शंकर भारती यांच्या नियंत्रणाखाली आरोग्य विभागात कार्यरत असणारे वैद्यकीय अधिकारी डॉ. सुनीता कदम, डॉ. प्रकाश मुडपे, डॉ. श्यामा जाधव, डॉ. स्वाती मजगे,डॉ. शर्वरी महाजन, डॉ. आकांक्षा वाडेकर, डॉ. सारा सय्यद, डॉ. कविता काबरा आणि विशेष वैद्यकीय तज्ञामार्फत आरोग्य तपासणी करण्यात आली. या तपासणी अंतर्गत विद्यार्थ्यांचे उंची, वजन सोबतच रक्त (हिमोग्लोबिन, अनेमिया), कान, नाक, घसा, डोळे, दात यांच्या विविध वैधकीय तपासणी करण्यात आले. यातील कांही विद्यार्थ्यांना आरोग्य विषयक समस्या असल्याचे लक्षात आले. काही विद्यार्थ्यांना कान,नाक व घसा या संदर्भातील आरोग्य समस्या निष्पन्न झाल्या. तर ४६ विद्यार्थ्यांना दंतचिकित्सा गरजेची असल्याचे निदर्शनास आले. तर १६ विद्यार्थ्यांना डोळ्यांचे समस्या असल्याचे स्पष्ट झाले.



### विलास कारखान्याच्या रोलरचे पूजन

**लातूर, दि. १७ ऑगस्ट-**

वैशालीनगर निवळी येथील विलास सहकारी साखर कारखान्याच्या हंगाम २०२४-२५ च्या गळीत हंगाम रोलरचे पूजन कारखान्याच्या चेअरमन वैशाली देशमुख यांच्या हस्ते १६ ऑगस्ट रोजी करण्यात आले. यावेळी रेणा कारखान्याचे चेअरमन सर्जेराव मोरे, व्हाईस चेअरमन अनंत देशमुख, डॉ. सारीका देशमुख, विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्याचे कार्यकारी संचालक पंडित देसाई, रेणा कारखान्याचे कार्यकारी संचालक भिमराव मोरे, संत शिमोमणी मारुती महाराज सहकारी साखर कारखान्याचे प्र. कार्यकारी संचालक रविशंकर बरमदे, जागृती शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीजचे जनरल मॅनेजर गणेश येवले यांची प्रमुख उपस्थिती होती. विलास सहकारी साखर कारखान्याने स्थापनेपासून आजपर्यंत सर्वच गळीत हंगाम यशस्वतीपणे पार पाडले आहेत. आगामी गळीत हंगामाची तयारी सुरु करण्यात आली आहे. शुक्रवारी कारखान्याच्या चेअरमन वैशाली देशमुख यांच्या हस्ते रोलर पूजन झाले. कार्यक्रमास व्हाईस चेअरमन रविंद्र काळे, संचालक बंकट भिसे, गोविंद बोराडे, अनंत बारबोले, भैरवनाथ सवासे, गुरुनाथ गवळी, बाळासाहेब बिडवे, अमर मोरे, रजीत पाटील, गोविंद डुरे, अमृत जाधव, रामदास राऊत, सुभास माने, भारत आदमाने, संजय पाटील खंडापूरकर, ज्ञानोबा पडिले, कार्यकारी संचालक संजीव देसाई यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



### लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात

**उदगीर, दि. १७ ऑगस्ट-**

लाल बहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात स्वातंत्र्य दिन उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे अध्यक्ष मधुकरराव वट्टमवार तर प्रमुख पाहुणे संतोष गजलवार उपस्थित होते. मुख्याध्यापक अनंतराम कोपले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी शिष्यवृत्ती, नवोदय परीक्षेत गुणवंत ठरलेल्या तसेच एनसीसी विभागातील ए ग्रेड मध्ये उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. निकाल वाचन सुनील पुलकुर्ते विष्णू तेलंग यांनी कले. याशिवाय सहावी, पाचवी या वर्गातल्या विद्यार्थिनींने देशभक्तीपर नृत्य गीते सादर करून उपस्थितांची मने जिंकली. व्यासपीठावर स्थानिक समन्वय समितीचे कार्यवाह शंकराव लासुणे परमानंद निलंगे भगवानराव पाटील मुख्याध्यापक अनंतराम कोपले उपमुख्याध्यापक अरुण पत्की उपस्थित होते. प्रास्ताविक अरूण पत्की सूत्रसंचालन व आभार मीनाक्षी कस्तुरे तर बालाजी पडलवार यांच्या कल्याण मंत्रांनी सांगता झाली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पर्यवेक्षक कृष्णा मारावार यांच्यासह सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विरोधकांनी 'लाडकी बहिण' चे श्रेय घेऊ नये

## आ. रमेश कराड; मुरुड येथे ११ कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

**तभा वृत्तसेवा,**
**लातूर, दि. १७ ऑगस्ट-**

केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध विभागाच्या माध्यमातून लातूर तालुक्यातील मौजे मुरुड येथील १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामांचा लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले. महायुती शासनाने मंजूर केलेल्या निधीचे आणि लाडकी बहीण यांसह विविध योजनांचे श्रेय लाटण्याचा प्रयत्न निष्क्रिय काँग्रेसच्या आमदारानी करू नये असा इशारा या कार्यक्रमात बोलताना आ. कराड यांनी दिला.

लोकार्पण आणि भूमिपूजन कार्यक्रमाच्या निमित्ताने संपूर्ण मुरुड शहर ढवळून निघाले या विकास कामामुळे ग्रामस्थांतून मोठे समाधान व्यक्त केले जात आहे.

मुरुड ग्रामपंचायत भाजपाच्या ताब्यात आल्यापासून भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या माध्यमातून मुरुड शहराच्या विकासाला गती मिळाली. मुरुड ग्राम पंचायतीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या घर तेथे झाड या वृक्षारोपण योजनेचा शुभारंभ, २ कोटी ९५ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचे लोकार्पण आणि ३ कोटी ९८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामाचे भूमिपूजन आणि




६२ सिंचन विहिरी व १७५ गायगोठा मंजूर असलेल्या शेतकऱ्यांना धनादेशाचे वाटप असे १० कोटी ७८ लक्ष रुपये खर्चाच्या विकास कामांचे भूमिपूजन आणि लोकार्पण मुरुड शहरातील सर्वच जिल्हा परिषद शाळेला टीव्ही स्क्रीन व संगणक संचाचे वितरण शुक्रवारी मोठ्या उत्साहाच्या वातावरणात भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते पार पडले. याप्रसंगी मुरुडच्या सरपंच अमृता नाडे, उपसरपंच हनुमंतबापू नागटिळक, संगायो समितीचे अध्यक्ष वैभव सापसोड, जीपचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी दत्तात्रय गिरी, सां. बा. विभागाचे उपअभियंता तांबोळी, डॉ. सरोजनी राऊत, बन्सी भिसे, भागवत सोट, संभाजी वायाळ, सुरज शिंदे, भैरवनाथ पिसाळ, प्रताप पाटील, लता भोसले, श्रुती सवयी, महेश कणसे, अनंत कणसे यांची प्रमुख उपस्थिती होती. आ. कराड म्हणाले की, गेल्या पाच वर्षात काँग्रेसचे निष्क्रिय आमदार कुठे होते असा प्रश्न उपस्थित करून निवडणूक जवळ आली की जनता आठवते. आपल्या गावचा, परिसराचा, कुटुंबाचा विकास करण्यासाठी महायुती शासन पुन्हा सत्तेवर आले पाहिजे असे बोलून दाखविले. सूत्रसंचालन वैजनाथ हराळे यांनी केले. या कार्यक्रमास भैरवनाथ पिसाळ, सूर्यकांत नाडे, मेघराज अंधारे, अंजली शिंदे, फुलाबाई इटकर, सुरज सूर्यवंशी, पल्लवी घोडके, रवी माकोडे,अशोक सावंत, बालासाहेब कदम, लहू सव्वाशे, बालाजी पठाडे, सुरत सुरवसे, तात्या ईटकर, विशाल कणसे, उषा शिंदे दिनेश अंधारे, अभय सोनपेठकर, पंकज गायकवाड, राजाभाऊ नाडे, नागराज बचाटे, श्याम करपे, गणेश स्वामी, अनिल टेळे, दत्ता गोरे, शैलजा सगर, सचिन घोडके, रेखा उबाळे, योगिता काटे उपस्थित होते.

## इतर मागास बहुजन कल्याण मेळाव्यास उत्स्फूर्त प्रतिसाद

**तभा वृत्तसेवा,**
**निलंगा, दि. १७ ऑगस्ट-**

इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या विविध योजनांच्या प्रचार व प्रसार करण्यासाठी निलंगा येथे आयोजित मेळाव्यास ओबीसी व भटक्या विमुक्त समाजाचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. पारंपारिक वेशभूषेतील भटके मुक्त समाजाने उपस्थितांचे लक्ष वेधून घेतले. विविध योजनेच्या लाभार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र वाटप करण्यात आले.

इतर मागास बहुजन कल्याण विभाग लातूरच्या वतीने शनिवारी निलंगा येथे इतर मागास, भटक्या विमुक्त समाजाचा मेळावा आयोजित करण्यात आला होता. अध्यक्षस्थानी माजी मंत्री आमदार संभाजीराव पाटील-निलंगेकर होते. मुख्य अतिथी म्हणून जिल्हाधिकारी श्रीमती वर्षा ठाकूर घुगे, प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे प्रादेशिक उपसंचालक दिलीप राठोड, सहाय्यक संचालक शिवकांत चिकुर्ते, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, जिल्हा परिषद ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक श्रीमती कल्पना शिरसागर, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, निलंगा गटविकास अधिकारी सोपानराव अकेले, देवणी गटविकास अधिकारी किरण कोळपे, शिरूर अनंतपाळ गटविकास अधिकारी बळीराम चव्हाण आदी मंचावर उपस्थित होते. महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करून दिप प्रज्वलन करून मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले.



सर्वसामान्य जनतेच्या विकासासाठी शासनाकडून अनेक नावीन्यपूर्ण योजना राबविण्यात येत असून जनतेने या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी केले. अध्यक्षीय समारोप करताना आमदार संभाजीराव पाटील निलंगेकर म्हणाले, वंचित उपेक्षित समाजाला न्याय देण्यासाठी व विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी राज्यातील महायुतीचे सरकार प्रयत्नशील आहे. राज्यातील महायुतीचे सरकार बहुजन समाजाच्या विकासासाठी अनेक योजनांची घोषणा करून प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरू केली आहे. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेचा पैसा लाभार्थ्यांच्या खात्यावर जमा झाला असून या पैशाचा उपयोग आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणासाठी करावा. भटक्या विमुक्त व इतर मागास समाजाने शिक्षणाची कास धरून विकासाच्या मुख्य प्रवाहात यावे असे आव्हान आमदार निलंगेकर यांनी केले. प्रास्ताविक बहुजन कल्याण विभागाचे सहाय्यक संचालक शिवकांत चिकुर्ते यांनी केले. कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत व राज्य गीत घेऊन करण्यात आली. सूत्रसंचालन कपिल नरवाडे, श्रीशैल बिराजदार यांनी केले. आभार राजेंद्र सास्तुरकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनात भटक्या विमुक्त विकास परिषदेचे नरसिंग झरे, दत्ता पांढरे, सुधा वाघमारे, राजू कडमींचे, दिलीप कलमुळे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डी. एच राजेमोड , भगवान केंद्रे, मोमीन शेख, कमलाकर चव्हाण, युवराज कवाले गणेश कणजे यांच्यासह आश्रम शाळेच्या कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## सेवानिवृत्त शिक्षक कुलकर्णी यांच्याकडून शालेय साहित्याची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. १७ ऑगस्ट-**

(येरोळ ता.शिरूर अनंतपाळ) येथील जिल्हा परिषद शाळेतील गरजू विद्यार्थ्यांना सेवानिवृत्त शिक्षक गोविंदराव कुलकर्णी यांच्या वतीने पंधरा हजार रुपयाचे सालेय साहित्य भेट दिली या साहित्याचे मुख्याध्यापक धर्मपाल निचळे यांच्या हस्ते वाटप करण्यात आले.

शाळेकडून शैक्षणिक साहित्य पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांना सालेय बॅग, वह्या, पेन, कंपास, भौगोलिक नकाशे आदी साहित्य गरजू विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक धर्मपाल निचळे, शालेय समिती अध्यक्ष तानाजी दाडगे, गुडेराव चौसष्ठे, सेवानिवृत्त शिक्षक प्रभाकर चोचंडे, नंदकुमार वनकुत्रे-पाटील, अमर माडजे-पाटील, शिक्षक टी.डी. बिरादार, एम.एस. बिरादार, हामीद शेख, प्रकाश नागटिळक, चॉद मुजेवार, हाबीब पठाण यांच्यासह विद्यार्थी पालक ग्रामस्थ उपस्थित होते. सामाजिक बांधिलकी विद्यार्थी प्रिय सेवानिवृत्त शिक्षक गोविंदराव कुलकर्णी हे तीन वर्षांपासून शैक्षणिक साहित्य विद्यार्थ्यांसाठी देतात. त्याबद्दल ग्रामपंचायत उपसरपंच सतीश सिंदाळकर यांनी अभिनंदन ठराव मांडला.

## शिरुर अनंतपाळ येथे रयत क्रांती संघटनेची बैठक

**तभा वृत्तसेवा,**
**शिरुर अनंतपाळ, दि. १७ ऑगस्ट-**

आरीमोड (ता.शिरुर अनंतपाळ) येथील सभागृहात रयत क्रांती संघटनेची निलंगा विधानसभा निवडणूक निमित्त मतदारसंघ आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती.

यावेळी रयत क्रांती संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष दिलीपराव भोसले व प्रदेश प्रवक्ते ज्ञानराज चौगुले यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली यावेळी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे यांना निलंगा विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढविण्यासाठी अधिकत आदेश प्रदेश कार्याध्यक्ष दिलीप भोसले यांनी दिले.

दिलीप भोसले म्हणाले, रयत क्रांती संघटना ही येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महाराष्ट्रात पंधरा जागांवर निवडणूक लढविण्यासाठी आम्ही मित्र पक्षाकडे मागणी करणार आहोत. त्यासाठी आम्ही विधानसभा निवडणूक मतदार संघ कार्यकर्ते व नागरिक यांच्या भेटी घेत असून निलंगा विधानसभा मतदारसंघातून लातूर जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे यांना आगामी विधानसभा निवडणूक लढविण्यासाठी तयारीला लागा असे आदेश दिल्याचे सांगितले.

यावेळी रयत क्रांती संघटनेत नवीन प्रवेश व पदाधिकारी निवड करण्यात आली. शिरूर अनंतपाळ तालुका अध्यक्षपदी गुडेराव चौसष्ठे, उपाध्यक्ष अरविंद गोडपटले, कार्याध्यक्ष श्रीरंग पवार, सचिव संजय माळी, शहराध्यक्ष संजय सोपान माळी, उपाध्यक्ष परमेश्वर कामगुंडा, तालुका युवा अध्यक्ष तुकाराम काळे, येरोळ शाखा अध्यक्ष तुकाराम कोकरे यांच्या निवडी करुन नियुक्ती पत्र देऊन प्रदेश कार्याध्यक्ष दिपकराव भोसले व प्रदेश प्रवक्ते ज्ञानराज चौगुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

यावेळी रयत क्रांती संघटनेचे जिल्हाध्यक्ष शिवाजी पेठे, निवत्ती गुंठे, भानूदास धुमाळ, रयतचे युवा जिल्हाध्यक्ष गणेश सूर्यवंशी, देवणी अध्यक्ष बिभीषण भोसले यांच्यासह सिताराम कांबळे, हणमंत कांबळे, रोहिदास सोनवणे, राजकुमार खांडेकर, सचिन गुरमे, हरिणंदन मोगरगे, भागवत ऐकुरगे, आनंद लिबांपुरे, संभाजी भोसले, रमाकांत लिंबापुरे, सचिन गुरमे, विनोद कुंभार उपस्थित होते. व तसेच दैठणा येथील एक अभ्यासू शेतकरी म्हणून माधवराव तुकाराम गुडे या कार्यक्रमासाठी यांच्याकडून या ठिकाणी उपस्थिती लावण्यात आली.

## व्हॉइस ऑफ मीडियाच्या प्रदेश सरचिटणीसपदी वामन पाठक

**लातूर, दि. १७ ऑगस्ट-**



व्हॉइस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंग साठी नुकतीच निवडणूक घेण्यात आली यामध्ये प्रदेश अध्यक्षपदी रोहित जाधव उत्तर प्रदेश सरचिटणीसपदी वामन पाठक यांची निवड झाली आहे.

व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगच्या झालेल्या निवडणुकीमध्ये चौघांनी उमेदवारी दाखल केली होती. यातून प्रदेश अध्यक्ष पदासाठी सांगलीचे रोहित जाधव यांना सर्वाधिक मते पडल्यामुळे त्यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष पदाबरोबरच कार्याध्यक्ष आणि प्रदेश सरचिटणीस या पदासाठी ही निवड जाहीर करण्यात आली. २८ जुलै रोजी झालेल्या मतदानाचा निकाल पाच ऑगस्ट रोजी जाहीर करण्यात आला. यामध्ये प्रदेशाध्यक्ष म्हणून रोहित जाधव सांगली, प्रदेश सरचिटणीस म्हणून वामन पाठक लातूर, प्रदेश कार्याध्यक्ष म्हणून अब्दुल कय्युम छत्रपती संभाजी नगर, तर प्रदेश उपाध्यक्ष म्हणून विकासकुमार बागडी जालना यांची निवड जाहीर करण्यात आली आहे. व्हाईस ऑफ मीडियाच्या साप्ताहिक विंगची निवडणुकीमध्ये नव्याने निवडून आलेले सर्व पदाधिकारी कार्यक्षम आहेत. त्यांच्याकडून आगामी काळात अधिक सक्षम पणे काम होईल असा विश्वास संघटनेचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष संदीप काळे यांनी व्यक्त केला आहे. निवडणुकीच्या माध्यमातून चौघाची राज्य कार्यकारणीवर निवड झाली आहे. उर्वरित कार्यकारिणीची लवकरच निवड जाहीर करण्यात येईल असे प्रदेशाध्यक्ष रोहित जाधव यांनी सांगितले.

**सर्व विभागांना न्याय देऊ : वामन पाठक**

व्हॉइस ऑफ मीडियाच्या उर्वरित कार्यकारणी मध्ये राज्यातील सर्व विभागांना समान न्याय देण्याच्या प्रयत्न करू असे प्रदेश सरचिटणीस वामन पाठक यांनी सांगितले आहे.

.............................................................................

## 'शिवलीतील देवस्थानास 'ब' दर्जा मिळवून देणार'

**तभा वृत्तसेवा,**
**औसा, दि. १७ ऑगस्ट-**

गेल्या पंधरा वर्षात निवडून आलेल्या तिन्ही काँग्रेस आमदारांनी भादा सर्कलचा कसलाही विकास केला नाही. महायुती शासनाच्या काळात विविध योजनेतून मोठ्या प्रमाणात निधी मिळवून देऊन दुर्लक्षित असलेल्या या भागाला खऱ्या अर्थाने विकासाच्या हायवेवर आणण्याचे काम केले आहे.तसेच शिवली येथील जागृत ग्रामदैवत श्री हनुमान मंदिर देवस्थानास तीर्थक्षेत्र विकास योजनेतून 'ब' दर्जा मिळवून या मंदिर परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी पाच कोटी रुपयांचा निधी मिळवून देवू, असे आश्वासन देऊन संभ्रम आणि दिशाभूल करणारे विरोधक काँग्रेसपासून आतातरी जनतेने सावध राहावे . असे आवाहन भाजपाचे नेते आ. रमेश कराड यांनी केले.

लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील व औसा तालुक्यातील भादा जिल्हा परिषद सर्कल मधील भाजपा पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ता संवाद मेळावा शिवली येथे झाला. त्यावेळी भाजपा नेते आ. रमेश कराड बोलत होते. सरपंच लिंबाबाई खडके अध्यक्षस्थानी होत्या. भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रम शिंदे, लातूर तालुका अध्यक्ष बंन्सी भिसे,माजी जिल्हा परिषद सदस्य सोमनाथ पावले, विजय काळे, पद्माकर चिंचोलकर, गुणवंत कारंडे, बालाजी शिंदे, फुलचंद अंधारे, महादेव मुळे, राजकिरण साठे, उद्धव काळे, महादेव गुरुशेटे, अच्युत इरपे, श्रीनाथ बंडगर, दत्तगिरी पवार, बालाजी साळुंखे, श्रीपती आळणे, सुधीर मोहिते यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. रमेश कराड म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशाची सुत्रे हातात घेतल्यापासून जागतिक स्तरावर सर्वांगिण विकासाची उंची गाठली आहे. विविध योजनांचा लाभ देताना जात, धर्म पाहिला नाही. याच विकासाच्या धारेतून भादा सर्कलमधील सर्वच गावात केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनेतून रस्ते-पूल, पाणीपुरवठा योजना, नॅशनल हायवे, पंतप्रधान ग्राम सडक योजना, मुख्यमंत्री ग्रामसडक योजना, धार्मिक स्थळांचा विकास, सभागृह यासह विविध सार्वजनिक विकासाबरोबरच वैयक्तिक लाभाच्या योजनेचा मोठ्या प्रमाणात लाभ मिळवून दिला आहे. कोट्यावधी रुपयांची तरतूद करून मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महायुती शासनाने सुरू करून महिलांना दरमहा दीड हजार रुपये देण्याचे घोषित केली. या योजनेमुळे विरोधकांच्या पायाखालची वाळू घसरत असून विरोधक खोटे आरोप करून संभ्रम निर्माण करून जनतेची दिशाभूल करण्याचा प्रयत्न करीत आहेत. अशा भुलथापांना जनतेने बळी पडू नये, असे आवाहन आ. कराड यांनी यावेळी केले यावेळी विक्रम शिंदे, सोमनाथआप्पा पावले, पद्माकर चिंचोलकर, राजकिरण साठे यांची भाषणे झाली.

## मालमत्ता करावर आकरण्यात आलेल्या व्याजामध्ये १०० टक्के सवलत

लातूर/प्रतिनिधी:

लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताकराची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होणे बाकी असल्याने व वसुलीस चालना देण्याच्या दृष्टीने तसेच मालमत्ताकर हा महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत असल्याने लातूर शहर महानगरपालिकेमार्फत स्वातंत्र्य दिंनाचे औचित्य साधुन शहरवाशीयांना दि. १५ ते १९ ऑगस्टपर्यंत थकबाकीसह एकरक्कमी कर भरणाऱ्या करदात्यास एक आनोखी भेट म्हणून शास्तीमध्ये (व्याजामध्ये) १०० टक्के माफी देण्यात येत आहे. तरी लातूर शहर महानगरपालिका,हद्दीतील मालमत्ताधारकांनी या सूवर्णसंधीचा लाभ घेऊन आपल्याकडे देय असलेल्या कराचा भरणा वरील देण्यात आलेल्यां मुदतीमध्ये करून लातूर शहर महानगरपालिकेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक बाबासाहेब मनोहरे तसेच उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी केले आहे.